UNIVERSAL LIBRARY
OU_192451
UNIVERSAL LIBRARY

OSMANIA UNIVERSITY LIBRARY

Call No. M83.1/P98P Accession No. M4687

Author पुनर्वसु, आडिगांल.

Title पुष्करिणी. 1955

This book should be returned on or before the date last marked below.

# पुष्करिणी

( कथासंग्रह )

शशिकांत पुनर्वसु

किंमत दीड रुपया

: प्र का श क :

**दयार्णव रघुनाथ कोपर्डेकर**

५२९ सदाशिव पेठ, पुणें २.

● ● ●

सर्व हक्क लेखकाधीन

● ● ●

प्रथमावृत्ति : जानेवारी १९५५

पुनर्मुद्रण : सप्टेंबर १९५५

● ● ●

: मु द्र क :

**हरि महादेव गद्रे**

जनवाणी प्रिंटिंग प्रेस

४५ बुधवार पेठ, पुणें २

# कथानुक्रम


| | | |
|---|---|---|
| १ | एक सकाळ | १ |
| २ | अंकुर | ९ |
| ३ | हिऱ्याच्या बांगड्या | १२ |
| ४ | झुमराव पाटील | १८ |
| ५ | त्रास देणारे मित्र | २६ |
| ६ | टांगेवाला | ३४ |
| ७ | चार भिंतींत | ३८ |
| ८ | निढळाच्या घामावर | ४९ |
| ९ | घर आणि शाळा | ६९ |
| १० | हिंदी नौकादलांतील एक | ८० |
| ११ | आंदोलन | ९३ |
| १२ | एक संध्याकाळ | १०८ |
| १३ | बाबा राजहंस | ११४ |
| १४ | एक दुपार | १२७ |

## याच लेखकाचीं इतर पुस्तकें

- **कथासंग्रह**

  संध्याकाळच्या सावल्या

  शांति

- **बालवाङ्मय**

  उल्काफुलें

  अशोक आणि मंजिरी



**शशिकांत पुनर्वसु,** (ज. २०-१-१३ मृ. १३-७-५५)

श्री. शशिकांत पुनर्वसु (मो. शं. भडभडे) B. A. B. T., हे नामवंत विद्यार्थी व शिक्षक होते. विषयप्रभुत्व, अध्यापन कौशल्य, व्यवसायनिष्ठा व विद्यार्थ्यी-विषयींचा जिव्हाळा इ. त्यांच्यामधील गुणांनीं त्यांना शिक्षक म्हणून चांगला लौकिक संपादन करतां आला त्यांचा संस्कृत, हिंदी, जर्मन, बंगाली इ. भाषांशीं चांगला परिचय होता. याखेरीज चित्रकला व संगीत यांचीहि त्यांनीं उपासना केली होती. तरीपण साहित्य हेंच त्यांचें जीवन-सर्वस्व होतें. श्री. शशिकांत पुनर्वसु यांनीं बाल-वाङ्मयांत जरी अल्पशी भर घातली असली तरी लघुकथेच्या क्षेत्रांत अल्पावधींतच त्यांनीं भरीव कामगिरी करून दाखवली आहे हें त्यांच्या 'संध्याकाळच्या सावल्या', 'शांति' व प्रस्तुतची 'पुष्करिणी' ह्या कथासंग्रहांवरून दिसून येईल. त्यांच्या लघुकथा या त्यांच्या परोक्ष वा अपरोक्ष अनुभवांचा परिपाक असून त्यांत रेखीवपणाची कोशीस केलेली आढळते. लघुकथांखेरीज त्यांचीं रंगतदार प्रवास-वर्णनेंहि त्यांच्या मुशाफिरी वृत्तीचीं साक्ष पटवितात.

# पुष्करिणीच्या कांठावरून—

शाळांमधून मातृभाषा शिकवण्यासाठीं शिक्षणखात्यानें आंखून दिलेल्या अभ्यासक्रमानुसार ठराविक पुस्तकें नेमलेलीं असतात. त्यांत निरनिराळ्या नामवंत लेखकांच्या लिखाणांतील विविध उतारे निवडून एकत्र केलेले असतात. त्यांच्या आधारें भाषेचें शिक्षण दिलें जातें. त्या उताऱ्यांचा अभ्यास व्याकरणाच्या संबंधांत जागरूकता ठेवून तपशीलवार होत असतो.

भाषेची तयारी चांगली करायची तर व्याकरणाला डावलून चालायचें नाहींच. मनोगत चांगल्या रीतीनें व्यक्त करतां येण्यासाठींच व्याकरणाचा अभ्यास हवाच. पण व्याकरणाकडे अवधान ठेवायचें म्हणजे वाङ्मयकृतींतील रसास्वाद अनिर्बंधपणें घेतां येण्याचा संभव कमी होण्याची शक्यता असते. शिवाय वाचनाच्या गतीलाहि पायबंद बसतो. वाचन भरपूर व्हावें आणि त्यायोगें भाषेचें ज्ञान वाढावें, मनावर चांगले संस्कार व्हावेत, यासाठीं आणखीहि पुस्तकें मुलांनीं वाचणें आवश्यक असतें. स्थूल वाचनासाठीं पुस्तकें नेमायचीं तीं यासाठींच. कथा ऐकणें, कथा वाचणें याची आवड सर्वांनाच असते, पण ती शाळेच्या वयांत असतांना जास्त असते. ती पुरी व्हावी आणि वाढीस लागावी ही या संग्रहांतील कथा निवडतांना ठेवलेली दृष्टि.

या संग्रहांतील कित्येक कथा मुलांच्या अगदीं रोजच्याच जगांतल्या आहेत. एक सकाळ, चार भिंतींत, घर आणि शाळा इत्यादि कथांतील घटना शाळेंतच घडतात. तर त्रास देणारे मित्र, अंकुर ह्यांसारख्या कथा शाळा-कॉलेजांतून शिकणाऱ्या विद्यार्थ्यांची मैत्री, त्यांच्या आशा, आकांक्षा यांविषयीं आहेत असें दिसून येईल.

पण मुलें मुख्यतः शाळेच्या विश्वांत वावरत असलीं, तरी बाहेरचें जगहि खूपच मोठें असतें. त्यांतहि त्यांचा संचार व्हावयास हवा. तेथील परिस्थिति, त्यांत घडून येणारे संघर्षाचे प्रसंग, धाडसाचे व धैर्याचे अनुभव, व्यक्ती-व्यक्तींतील भलेबुरे संबंध, मानवी मनाचा मोठेपणा आणि क्षुद्रपणाहि—अशा

कितीतरी गोष्टी आहेत, कीं त्यांचा परिचय जेवढा होईल तेवढा थोडाच. हिंदी नौकादलांतील एक, झुमराव पाटील, निढळाच्या घामावर यांसारख्या कथांनीं तो होण्यास साह्य व्हावें.

रामदाससारख्या सालस व भाबड्या मुलावर चोरी करण्याची आपत्ति येते, हलकें काम करण्यांत वाईट कांहींच नाहीं हें घनश्यामहि जाणतो आणि बाळ सप्ताश्वहि जाणतो; तरी पण...परंतु अधिक स्पष्टीकरण कशाला ? या व्यक्ति ज्या प्रसंगांतून गेल्या, ते वाचून त्या तेव्हां अशा अशा कां वागल्या याचा विचार करून मुलांनीं चिंतनशील बनावें, भोंवतालच्या परिस्थितीचें आकलन करावें, हा हेतु आहे. तो साध्य व्हावा अशी आशा वाटते.

अशी ही पुष्करिणी. पुष्करिणींत कमळें असतात आणि हंस पण असतात. हंस त्या कमळांचा रसास्वाद घेतात. मुलांनीं हेंच करावें. याखेरीज दुसरी कोणती इच्छा हें पुस्तक मुलांच्या हातीं देणाऱ्याच्या मनांत असणार ?

# एक सकाळ : : १

केवळ योगायोगच म्हणायला पाहिजे, पण गेलीं दोन वर्षे मला शनिवारचा पहिला तास मोकळा मिळत गेला आहे. दिवस एकूण चार तासांचा, तेव्हां मला तो मोकळा तास पचला आहे क्वचितच. अर्थातच चिडत कां होईना, मनांतल्या मनांत त्याच्यावर मीं पाणी सोडलेलेंच असतें. त्यामुळेंच क्वचित् एखाद्या प्रसंगीं तो पचला, तर मनाला विलक्षण आनंद होतो. गोष्ट कांहीं विशेष महत्त्वाची नसते, तेव्हां खरें पाहिलें तर इतका आनंद होऊं नये. पण होतो. बुडीत खातीं टाकलेलें येणें न मागतां अचानक घरीं आणून दिलें म्हणजे होतो, तसा.

निदान त्या दिवशीं तरी मला तसा आनंद झाला.

आणि आश्चर्य हें, कीं माझ्याप्रमाणेंच आणखी चौघां जणांनाहि तो पचला असला पाहिजे. कारण, आमच्या बैठकींत माझ्याबरोबर चौघे जण होते. दिवाळीची किंवा उन्हाळ्याची मोठी सुट्टी होण्याच्या आधींचा किंवा ती संपल्यानंतरचा पहिला दिवस नसूनहि हें झालें होतें, त्यामुळें कुणाला तें अद्याप पूर्णपणें खरें वाटत नव्हतें आणि मनांत सांचत आलेल्या आनंदावर आतां विरजण येऊन पडणार आहे कीं काय ही धास्ती करीत सारेजण वाट पाहत बसले होते.

सुमारें पांचसात मिनिटें गेलीं तरी कुणाला कुठें जावें लागलें नाहीं,

तेव्हां सारेजण निश्चित झाले. मग पित्रे 'सकाळ' चघळूं लागले, गायन-गुरुजी दाते येरझाऱ्या घालीत नवीन ऐकलेल्या रागदारींतली 'अमर भूपाळी' गुणगुणूं लागले, भावे अंगांतला कोट काढून लोडाशीं आडवे झाले आणि साठे सिगरेट ओढीत तोंडांतून बाहेर पडणाऱ्या धूम्रवलयांना दृष्टिक्षेपांनीं कुरवाळीत गुदगुल्या करूं लागले....

कांहीं तरी तऱ्हेवाईकपणा हातून घडल्याखेरीज आनंदाला चांगली चव येत नाहीं. वेळ सकाळची होती, तरी मीं एक पान आणवून खाल्लें आणि त्याचबरोबर चुना चोळलेल्या जर्द्याचाहि बार भरला. मग थोड्या वेळानें तोंडांत सांचलेला मुखरस, कधीं नव्हे तो, आज मीं हळुहळू गिळून टाकला, तशी छातींत मस्तपैकीं कळ निघूं लागली आणि लागलीच उचक्यांची उतरंड सुरू झाली. तत्काळ डोकीची टोपी खालीं ओढून मी जोरजोरांत हुंगूं लागलों, तेव्हां उचक्या थांबल्या आणि मग थोडा वेळ पाठीच्या मणक्यांत दणदण घाव बसल्यागत होऊं लागलें.

आतां एखादी सुरेखशी कथा वाचायला मिळाली तर काय बहार होईल, असा विचार माझ्या मनांत आला. पण हाताशीं पुस्तक नव्हतें किंवा चटकन् मिळण्यासारखेंहि नव्हतें. म्हणून मग, जिची गोडी मला आजपर्यंत अवीट वाटत आलेली आहे, त्या बाणाच्या कादंबरीचें कथानक मी क्रमाक्रमानें मनाशीं घोळवूं लागलों. मीं डोळे मिटून घेतले, माझ्या मनांतला चंद्रापीड इंद्रायुधावर स्वार होऊन किन्नरमिथुनाचा पाठलाग करीत कैलास-पर्वताच्या पायथ्याशीं वाट चुकला आणि परत फिरतां फिरतां अच्छोद सरोवराच्या कांठाशीं येऊन शिवालयांतल्या महाश्वेतेचें गायन ऐकूं लागला. तेवढ्यांत आमच्या बैठकीच्या दाराशीं कांहीं तरी धावपळ झाल्यासारखी वाटली म्हणून मी डोळे उघडले. शेंबेकर आंत धांवत आले आणि कांहीं न बोलतां नुसते इकडे तिकडे पाहून तसेच गेले.

मीं पुन्हा डोळे मिटले. आतां महाश्वेतेनें आपलें गाणें संपवलें आणि चंद्रापीडानें तिच्याविषयीं चौकशी करून तारुण्यांत स्वीकारलेल्या तिच्या त्या घोर तपश्चर्येचें कारण विचारलें, तशी ती ओक्साबोक्शीं रडूं लागली...

पुन्हा दाराशीं कांहीं तरी खजबज झाली· आणि शेंबेकर संथपणानें पाठीकडून आंत आले. त्यांच्या पाठोपाठ अगदीं सावकाश तीन मुलें आंत

आलीं. त्यातल्या कडेच्या दोघांनीं मधल्याला आधार दिला होता. त्याचे डोळे मिटलेले होते, चेहरा पांढरा फटक पडला होता आणि मान सैल पडून कलती झाली होती.

शेंबेकरांचा चेहरा तर अधिकच पांढरा फटक पडला होता.

मग त्यांनीं त्या दोघां मुलांच्या मदतीनें त्या मधल्या मुलाला अलगद एका रिकाम्या लोडाजवळच्या गादीवर निजवलें. मग शेंबेकर विचारूं लागले, " भिसे, कुठं आहेस लक्षांत येतं आहे का? आतां बरं वाटतं आहे का?"

तो भिसे कांहीं न बोलतां छातीवर हात ठेवून नुसता आढ्याकडे पाहत होता...पाहत तरी होता कीं नाहीं कुणास ठाऊक!

बैठकींतले सारे जण आपापल्या समाधींतून जागे होऊन एकदम बसते झाले आणि म्हणाले, " अरे! काय झालं तरी काय? मारलं झोडलंत कीं काय त्याला?"

शेंबेकरांनीं नुसतीच मान हलवली. आणि तेवढ्यांत शाळेचा शिपाई धावत आला, त्याला ते म्हणाले, " सखाराम, इथून सर्वांत जवळ कोणते डॉक्टर राहतात?"

सखाराम म्हणाला, " केदारी."

" त्यांना आत्तांच्या आत्तां बोलावून घेऊन ये. म्हणावं, असाल तसे या! अंगांत सदरा घालीत असलांत तर गुंड्या इकडे येऊन लावा!"

सखाराम गेल्यावर इतरांनीं पुन्हा जिज्ञासा प्रकट केली तेव्हां शेंबेकर म्हणाले, " हा भिसे. नववींतला. माझा तास चालू होता आणि एकदम कसंसंच करायला लागला. माझं लक्ष गेलं तों छातींत कळ निघते आहे म्हणत आडवा झाला. शुद्ध गेलेली दिसत नाहीं त्याची, पण बोलत मात्र कांहीं नाहीं. काय आहे, ईश्वर जाणे!"

" ईश्वर कशाला? डॉक्टर येतोच आहे, तो सांगेलच आतां!" पित्रे म्हणाले.

" पण तो घरीं नसला तर?" भाव्यांनीं शंका काढली आणि म्हटलें, " मला वाटतं, शेंबेकर, आपण आपल्या बाजूनं सावध असावं आणि दुसऱ्याहि डॉक्टरला बोलावणं पाठवावं. प्रकरण कांहींच्याबाहीच असलं

तर वेळ वायां घालवला, हयगय केली, असा दोष पालकांनीं शाळेला द्यायला नको. दोघेहि आले तरी बिघडायचं नाहीं. एकसे दो भले!"

बाकीच्यांनीं या म्हणण्याला दुजोरा दिला तेव्हां भावे म्हणाले, "तुम्ही इथंच थाबा, मी दुसऱ्या शिपायाला घेऊन येतों आणि अधिकाऱ्यांच्याहि कानावर घालतों."

दुसरा शिपाई आला. रस्त्याच्या त्या अंगाला सरळ गेल्यानंतर सुमारें पांचसात मिनिटांनीं जो चौक लागतो, तो ओलांडला कीं तेथल्या कोपऱ्या-वरच डॉक्टर हिवरे राहतात अशी माहिती त्यानें दिली. लागलीच त्यांना घेऊन येण्यासाठीं शेंबेकरांनीं त्याला सांगितलें.

भिसे तसाच पहुडला होता. शेंबेकरांनीं मग त्या दोघां मुलांपैकीं ज्याला भिसेची अधिक माहिती होती आणि जो त्याच्या घराजवळच राहतहि होता, त्याला थांबवून घेतलें आणि दुसऱ्यापाशीं वर्गचिटणिसाला निरोप देऊन परत पाठवलें.

एवढें होत आहे तोंच सखाराम झपाझपा आला आणि विजयाच्या चर्येनें म्हणाला, "सर, काम झालं! डॉक्टर बाहेर जायलाच निघत होते, त्यांना तसेच इकडे घेऊन आलों"

सगळ्यांना छातीवरचें एखादें ओझें उतरल्यासारखें वाटलें

डॉक्टर केदारी आले. हास्यमुखी, वयानें पस्तिशीच्या जवळपास. जिच्याकडे बघितल्याबरोबर कुणाहि चिंताक्रांत माणसाला सोसाट्याच्या पावसाच्या माऱ्यांतून उबदार निवाऱ्यांत आल्यागत वाटावें अशी व्यक्ति. त्यांनीं भिसेचें पोट तपासलें, नाडी बघितली आणि नेहमीं तपासण्याच्या वेळीं करतात त्या आनुषंगिक क्रिया केल्या आणि म्हटलें, काळजी करण्याचं, मंडळी, कांहीं म्हटल्या कांहींसुद्धां कारण नाहीं! अगदीं साधी बात आहे! कांहीं तरी अबरसबर खाल्लेलं असलं, म्हणजे त्याचा आणि त्याच्याबरोबर पोटांत वायु निर्माण होतात त्यांचा दाब काळजावर येऊन अशी कळ पुष्कळ वेळां येते. प्रथम नुसतं जिंजर प्यायला द्या, दुसरें कांहीं नको. लागलीच आराम पडला पाहिजे."

सखाराम ऐकत उभा होताच. तो आपण होऊन समोरच्या दुकानांतून जिंजर आणण्याकरतां धावला.

पित्रे म्हणाले, " लागलीच म्हणजे किती वेळानं ? "

डॉक्टर हंसले आणि म्हणाले, " पांच ते दहा मिनिटांनीं ! तथापि मी हें एक औषध लिहून देतों. बहुतेक जरूरी पडूं नये, पण तयारी ठेवल्यानं कांहीं बिघडायचं नाहीं. हें घ्या. द्रवरूपांत मिळेल. दोन दोन थेंब घ्यायला सांगा. दिवसांतून तीन वेळां. पाण्यांतून. मात्र एक तासानंतरहि आराम नाहीं पडला तरच हा उपाय..."

जाण्यासाठीं डॉक्टर उठले तेव्हां शेंबेकरांनीं त्यांचे मनापासून आभार मानले आणि म्हटलें, " दोन मिनिटं आपण थांबा, आपल्याला कचेरींतून पैसे आणून देतों. किती आणूं. "

" छे छे ! पैसे कसचे देतां ! द्यायचं घ्यायचं कांहीं नाहीं ! "

" असं कसं म्हणतां ? आपला हा व्यवसाय आहे. "

" तें ठीक आहे. पण ही शाळा आहे आणि हा शाळेंतला विद्यार्थी. शाळेंत अभ्यास करणाऱ्या विद्यार्थ्यांबद्दल पैसे कसले घ्यायचे ? "

हे अनपेक्षित शब्द ऐकून सगळे जण थक्क झाले. काय बोलावें तें कुणालाच सुचेना. इतका वेळ मी हें सारें केवळ प्रेक्षकाच्या नात्यानें पाहत, ऐकत होतों. सारें कांहीं व्यवस्थित होत होतें, माझी कुठेंच जरूरी भासत नव्हती. पण आतांचे हे शब्द ऐकून माझा अलिप्तपणा नाहींसा झाला आणि जिथें व्यापारी वृत्ति अगदीं शिगेला पोंचली आहे अशा, भोंवतालच्या साऱ्याच जगाच्या वातावरणांत, तपोवनांतल्या संस्कृतीला साजेसा असा हा माणूस कल्पना नसतांना वावरतांना आढळून आल्यामुळें माझ्या काळजांत खोल कुठें तरी कळ येईल इतक्या जोरजोरानें तारा थरारल्याचा मला भास झाला आणि माझ्या डोळ्यांत पाणी सांचून आलें.

डॉक्टर गेल्यावर भावे म्हणाले, " माणूस चांगला होता. असलीं भलीं माणसं आजकाल आढळणं कठीण...पण . पण हल्लींचीं पोरं म्हणजे रत्नं आहेत एकेक ! यांची सारी काळजी इतरांना ? यांना कशाचं कांहींच नाहीं ! यांनीं वाटेल तेव्हां, वाटेल तिथं, वाटेल तें आणि वाटेल तितकं खावं ! "

यावर पित्रे हंसले आणि म्हणाले, " त्यापेक्षां असं कां नाहीं म्हणत, कीं या कार्ट्यांनीं वाटणार नाहीं तेव्हां...वाटणार नाहीं तिथं...वाटणार नाहीं तें आणि वाटणार नाहीं तितकं खावं ? "

जिंजर प्यायल्याबरोबर मिसेला तीन चार सणसणीत ढेकर आले आणि मग तो नीट बसता होऊन थोड्याच वेळांत हंसायलाहि लागला. एखाद्या बाहुलीसारखा. सर्वांच्या चिंता दूर झाल्या. थांबवून घेतलेल्या मुलाला शेंबेकरांनीं परत वर्गांत पाठवून दिलें आणि मिसेला जरा वेळ स्वस्थ पडून राहायला सांगितलें.

आतां दुसरा शिपाई डॉक्टर हिवऱ्यांना घेऊन आला.

या वेळपावेतों सर्वांचीं ताणलेलीं मनें सैल झालीं होतीं. पित्रे 'सकाळ'-मध्यें डोकें खुपसून बसले होते, गायनगुरुजी दाते पुन्हा येरझारा घालूं लागले होते. साठ्यांनीं नवीन सिगरेट पेटवून ओढायला देखील सुरुवात केली होती.

शेंबेकरांनीं डॉक्टरांना निवांतपणें तपासूं दिलें. त्यांचे वय पंचेचाळीसच्या आसपास, अंगांत गरम कोट आणि डोळ्यांवर चपट्या कांचांचा सोनेरी काडीचा चष्मा. त्यांना सारी माहिती शेंबेकरांनीं सांगितली आणि त्यावर केलेला उपायहि सांगितला.

"अगदीं बरोबर! जिंजरच द्यायला पाहिजे होतं त्याला!" डॉक्टर हिवरे म्हणाले.

शेंबेकरांनीं औषधाचें नांव लिहिलेला कागद त्यांच्यापुढें केला, तेव्हां ते म्हणाले, "कोरॅमिन ना? बरोबर! हेंहि औषध बरोबर आहे. मीं देखील हेंच घ्यायला सांगितलं असतं."

डॉक्टर हें जसजसें बोलत होते, तसतसें सर्वांना विलक्षण उकडल्यासारखें होत होतें. त्यांना बोलावणें गेलें होतें, ते आले होते. त्यांचा काहींच दोष नव्हता हें सर्वांना समजत होतें. पण त्यामुळें मनांतील विचित्र अवस्था मात्र दूर होत नव्हती. गरज सरो आणि वैद्य मरो ही म्हण असल्या एखाद्या क्षणींच निर्माण झाली होती कीं काय कुणास ठाऊक? मला तर या डॉक्टरांविषयीं सहानुभूति वाटायला लागली.

डॉक्टर जाण्याची तयारी करूं लागले तेव्हां पित्र्यांनीं शेंबेकरांना खूण केली. तिचा अर्थ ओळखून ते पैशाची गोष्ट काढणार इतक्यांत डॉक्टर म्हणाले, "माझी व्हिजिट फी पांच रुपये आहे!"

या अपेक्षित शब्दांना परिस्थितीनें अनपेक्षित केलें होतें व तिचा धक्का

सर्वांना जाणवल्यावांचून राहिला नाहीं. शेंबेकर उठून म्हणाले, " कचेरींतून आणून देतों."

तेवढ्यांत पित्र्यांनीं खिशांतून नोट काढली आणि म्हटलें, " एवढ्याशा पांच रुपयांकरितां ह्यांचा खोळंबा कशाला ? नाहीं म्हटलं, तरी बिल तयार करायचं, त्यावर सह्या व्हायच्या आणि मग कारकुनाकडून पैसे मिळायचे. त्यापेक्षां हे त्यांना देऊन टाका आणि सगळं सव्यापसव्य संपून तुम्हांला मिळाले कीं मला द्या. घ्या हे !"

पित्रे हें बोलले त्याचें सर्वांना बरें वाटलें. त्यांच्या शब्दांना उपरोधाचा कळत न कळत इतका वास येत होता, तोहि सर्वांना सुखदायक वाटला...

थोड्या वेळानें या डॉक्टरांना पोंचवून शिपाई वर परत आला आणि म्हणाला, " सर, डॉक्टरांच्या घरापाशीं एकच टांगा होता. त्यानं जातां येतां सव्वा रुपया घेतला. ऐकेनाच तो. आत्तां आपल्या हवालदाराकडून घेऊन मीं पैसे दिले आहेत. बिल एकत्रच करणार कीं वेगळं करून त्याला परस्पर कचेरींतून पैसे घ्यायला सांगूं ? "

भलतीकडून प्रकाश पडला म्हणजे एखादी धड वस्तुदेखील कांहींच्या-बाहीच दिसूं लागावी तशी या सरळ घडलेल्या प्रसंगाची अवस्था झाली. पित्रे म्हणाले, " काय मजा आहे पहा ! जो खरा उपयोगी पडला त्याला आपण हात हलवीत परत जाऊं दिलं. आणि ज्याचा या गादीलोडाइतका देखील उपयोग झाला नाहीं, त्याच्यापायीं मात्र सव्वा सहा रुपये जाताहेत ...जाताहेत कसले ? गेले ! कुठं तरी, कांहीं तरी चूक होते आहे खास !"

दाते म्हणाले, " मला वाटतं, आपल्याला खटकतं आहे, तें त्या भल्या माणसाला पैसे न मिळाल्याचं. आपण कचेरींतून सव्वा सहा रुपये घेऊन त्यांच्याकडे पोंचते करावेत. "

" अधिकारी हें मान्य करतील ? " शेंबेकरांनीं शंका काढली.

"त्याचं कांहीं विशेष नाहीं. खर्च झाले आहेत म्हणून बिल तयार करावं आणि सही मागावी."

तेवढयांत माझ्याकडे शेंबेकरांचें लक्ष गेलें आणि ते मला म्हणाले, " अरे, तुम्ही आहांत कीं इथं ! दूर आरामखुर्चीत बसलां होतां म्हणून दिसलां नाहीं. तुम्ही पाहिलंत ना सगळं ? तुम्हांला काय वाटतं ? "

मी म्हणालों, " पैसे द्यायचेच असले तर त्यासाठीं अशी वाकडी युक्ति काय म्हणून ? सरळ सांगायला कसली हरकत आहे ? फार फार तर काय करतील ? पैसे द्यायची जरूरी नाहीं म्हणतील. आपण पांच जणं आहोंत. सारखे वांटून घेऊन आपल्याला देखील देणं कठीण नाहीं. . . "

" चालेल ! " पित्रे म्हणाले.

" पण माझा मुद्दा निराळा आहे. त्या माणसाचं मन मोठं, आणि तो माणूसहि मोठा—त्याला पैसे घ्यायचा आग्रह करून त्याच्या त्या श्रेष्ठ स्थानावरून भ्रष्ट करायचा प्रयत्न आपण करायचा कीं काय, एवढ्याचा मात्र नीट विचार व्हायला हवा. "

यावर कुणीच कांहीं बोलले नाहीं.

भिसे आतां चांगला उभा राहून कपडे झटकीत सारखे करीत होता. शेंबेकर त्याला वर्गांत पोंचवायला त्याच्याबरोबर गेले.

तेवढ्यांत मग पहिला तास संपल्याची घंटाहि झाली आणि आम्ही आपापल्या वर्गावर जाण्यासाठीं उठलों.

१९५१

## अंकुर : : २

पुण्याचा मुक्काम असल्यामुळें 'गंधर्व मंडळी' किर्लोस्कर नाटकगृहांत आपले खेळ करीत होती.

शनिवारच होता बहुतेक त्या दिवशीं. 'स्वयंवर' नाटक लागलें होतें. त्या मानानें गर्दी कांहीं फारशी नव्हतीच. चवदा आण्यांच्या दरवाजावर होतों मी. नानावाड्याच्या बाजूचा दरवाजा मला मिळाला होता.

पहिला अंक सुरू होऊन गेला होता. रुक्मिणीची 'मम आत्मा....' वगैरे पदें होऊन गेलीं होतीं. नुकतीच 'स्वकुलतारकसुता...'ला सुरुवात झाली होती. मी कोंपऱ्यांतल्या दाराजवळ माझ्या लोखंडी खुर्चीवर सारंगीच्या आवाजाकडे लक्ष देत ऐकत बसलों होतों.

दार लावलेलें होतें, तें कोणी तरी किंचित् किलकिलें केल्याचा मला भास झाला. मी खुर्चीवरून उठलों आणि दरवाजाबाहेर आपलें डोकें काढलें.

बाहेर पाऊस झिमझिम पडत होता. पावसाचे थेंब स्पष्ट दिसत नव्हते. परंतु अगदीं वरच्या छप्परावरून खालीं पडणाऱ्या पाण्याचे टपोरे थेंब एकेका रांगेनें खालीं पडत होते. तुटलेल्या मोत्यांच्या माळेचे सरच ओघळल्यासारखे दिसत होते ते. ओली झालेली फरशी विजेच्या दिव्यांमुळें चकाकत होती.

माझ्याजवळ एक सुमारें तेरा वर्षांचा गोरटेलासा मुलगा आला. फार

गोड दिसत होता तो. साधासाच एक सदरा, एक काळी टोपी आणि एक पांढरी अर्धी विजार, एवढाच त्याचा पोषाख.

माझ्याजवळ तो येऊन म्हणाला, "अहो,.. अहो, मला स्वयंवर नाटकांतलीं गाणीं ऐकायचीं आहेत हो!... ऐकूं देतां का मला? ...अं... देतां का?...मी तुम्हांला दोन आणे देईन. माझ्या आईनें एवढेच मला दिले."

त्याच्या हातांत चांदीची गोल चवली मला दिसली.

त्याच्या बोलण्याची मला गंमत वाटली म्हणून असो, त्याच्या आवाजांत एक प्रकारची माधुरी होती म्हणून असो, किंवा त्याला बघितल्याबरोबर मला त्याच्याविषयीं एक प्रकारची आपुलकीची भावना वाटली म्हणून असो, पण मला तो इतका आवडला, कीं—फार फार आवडला. त्याला कांहीं 'नाहीं' म्हणतां येईना मला!

मीं आजूबाजूला बघितलें. सगळीकडे शांत होतें. पावसाचा आवाज आणि वरून टपोरे थेंब पडत त्यांचा आवाज आंतल्या सारंगी-ऑर्गनच्या आवाजांबरोबर ऐकूं येत होता. उजव्या बाजूला 'फक्त कुलीन स्त्रियांकरितां' च्या दरवाजांतून समोरच्या रस्त्यावरील पानपट्टीवाल्याच्या दुकानांतील बत्तीच्या प्रखर उजेडांत कुणी तरी पानपट्टीवाल्याकडून कांहींतरी घेत होता तें दिसत होतें.

मीं त्या मुलाचा हात धरून त्याला आंत घेतलें आणि माझ्या जवळच्याच बाकावर त्याला बसवलें. आणि मग पुन्हा त्याच लोखंडी खुर्चीवर बसून मघांचेंच गाणें ऐकूं लागलों.

अंक संपला म्हणजे लोक माझ्याकडून पास घेऊन बाहेर जात आणि पुन्हा पुढचा अंक सुरू व्हायच्या सुमारास ते परत देऊन आंत येत. नेहमीं-प्रमाणें मीसुद्धां गाणीं ऐकत होतों आणि प्रेक्षकांच्याबरोबर मधून मधून हंसतहि होतों.

नाटक संपेपर्यंत त्या मुलाकडे मधून मधून माझें लक्ष जात होतें. रुक्मिणीचीं पदें तो अगदीं लक्षपूर्वक ऐकत होता. मला फार कौतुक वाटलें त्याचें.

चवथा अंक संपला होता. पांचवा अंक अगदींच थोडक्यांत आटपत

असल्यामुळें बाहेर जाणारे फारसे कुणी नव्हतेच. त्या मुलाजवळ मी गेलों आणि त्याच्याजवळचे दोन आणे मागितले. त्यानें चटकन् जवळची चवली काढून मला दिली. ती मीं घेतली आणि माझ्याजवळचे निराळे दोन आणे "असूं देत हे तुजजवळ" असें म्हणून त्याला दिले.

नाटक संपलें आणि मला नमस्कार करून तो निघून गेला. तो गेला तरी गाणें लक्षपूर्वक ऐकणारी त्याची चिमुकली आकृति कितीतरी वेळ डोळ्यांपुढें येत होती.

पण त्याचें नांव विचारून घ्यायला मी विसरलों.

आणि त्याबद्दल पाठीमागून फार हळहळ वाटली.

* * *

आज कितीतरी दिवस होऊन गेले आहेत त्या गोष्टीला. 'गंधर्व मंडळी' एक दोन वर्षांनीं येथें येते. दर मुक्कामाला मी डोअरकीपर असतोंच. पण तशा प्रकारची गोष्ट मात्र त्यानंतर पुन्हा कधीं झाली नाहीं. ती चांदीची चवली मात्र मीं जपून ठेवली आहे.

* * *

त्याचें नांव प्रभाकर हें मला कितीतरी दिवसांनीं कळलें. हल्लीं तो एक उत्तमपैकीं गवई झाला आहे. एके दिवशीं त्याचें कुठेंसें गाणें चाललें होतें. त्याच्या आवाजावरून मीं त्याला ओळखलेंसें मला वाटलें आणि बघितल्यावर तर खात्रीच पटली. मीं त्याला ओळख दिली नाहीं.

कशाला उगीच ! आणि त्यानें नाहीं ओळखलें म्हणजे स्वतःला मात्र वाईट वाटायचें ! त्यापेक्षां झांकली मूठ बरी नव्हे का ?

तो गातो मात्र चांगलाच. ती त्याच्या आवाजांतली माधुरी अजून कायम आहे. कधीं तरी त्याचें गाणें ऐकलें म्हणजे समाधानाचा एक दीर्घ सुस्कारा मी सोडतों. त्या दिवशींचा तो सर्व प्रसंग माझ्या डोळ्यापुढें चक्क उभा राहतो आणि कांहीं का होईना, माझ्या हातून त्याच्या कलाविकासाला थोडीशी तरी मदत झाली आहे असा विचार मनांत येऊन माझें मलाच समाधान वाटतें.

१९३३

## हिऱ्याच्या बांगड्या : : ३

मंडईतून परत येत होतों. रविवार होता. घरीं परत जाण्याची विशेष घाईहि नव्हती. वाटेंत दिनकरपंताचें घर लागलें. म्हटलें, बरेच दिवसांत भेटले नाहींत. जरा आंत जाऊन यावें.

वाटेंतूनच मग हाक मारली मीं त्यांना—

" अहो दिनकरपंत ! "

आंतूनच उत्तर आलें, " या हो हरिभाऊ ! "

मी आंत गेलों. ते भगवद्गीता कीं कायसेंसें वाचीत बसले होते. मी दिसतांच माझ्याकडे वळून ते म्हणाले,

" हरिभाऊ, वर बसा हं जरा वेळ; एका क्षणांतच मी आलों ! "

मी वर गेलों आणि कोपऱ्यांतल्या बाजुला एक टेबल होतें त्याच्याजवळ खुर्चीवर जाऊन बसलों. दिनकरपंतांची व्यवस्थितपणाविषयींची आवड प्रत्येक वस्तूंत दिसून येत होती. सहज चाळा म्हणून तिथें एक लहानशी वही होती ती मीं उघडली. तों उघडलेल्या पानावरच एक गमतीचें वाक्य दृष्टीस पडलें—

" कांहीं शब्द, कीं ज्यांचें ओझरतें दर्शनसुद्धां डोळ्यांपुढें आठवणींचे डोंगर उभे करील ! "

आणि त्याच्याच खालीं लिहिलें होतें—

" हिऱ्याच्या बांगड्या."

मी जरा चकितच झालों व एक प्रकारची तीव्र जिज्ञासा माझ्या मनांत जागृत झाली.

परंतु दिनकरपंत म्हणजे पहिल्या प्रतीची आंतल्या गांठीची व्यक्ति ! कधीं स्वतःच्या मनांतली गोष्ट दुसऱ्यास सांगणारी नव्हे. म्हणूनच मीं जर कांहीं विचारलें, तर ते सांगतील कीं नाहीं याविषयीं माझ्या मनांत दाट शंका आली.

कांहीं वेळानें अंगांत सदरा घालीत ते वर आले व म्हणाले,

" हं, काय हरिभाऊ ? बरेच दिवसानीं फिरकली इकडे स्वारी ? "

" अहो कुठलं ! गेल्या पौर्णिमेला तर भेटलों नव्हतों का तुम्हांला ? त्यानंतर मधें पंधरा दिवस मी गांवालाच होतों. आणखीन् हे गेले दहा बारा दिवस मला कुठं जायला जमलंच नाहीं. बरं, तुमची शाळा काय म्हणतीय ? "

" कांहीं नाहीं ! ठीक चाललीय ! "

एवढें झाल्यानंतर थोडा वेळ आम्ही स्तब्धच बसलों होतों. माझें दिनकर- पंतांकडे लक्ष होतें आणि ते खिडकींतून बाहेर कुठें तरी पाहत होते.

त्या स्तब्धतेचा भंग मींच केला.

" दिनकरपंत, एक विचारूं का तुम्हांला ? "

" खुशाल ! विचार कीं ! " ते म्हणाले.

" पण आधीं मला हें सांगितलं पाहिजे, कीं मीं एक तुमचा अपराध केला आहे. तुम्हांला न विचारतां या तुमच्या वहीला मीं हात लावला. तर..."

ते स्तब्धपणें ऐकतच होते. टेबलावरची वही त्यांना दाखवून मीं म्हटलें,

" या हिऱ्याच्या बांगड्या म्हणजे काय ? बांगड्या हिऱ्याच्या असतात कीं नाहीं मला माहीत नाहीं. पण तुमच्या वरच्या वाक्यावरून कांहींतरी गोष्ट याच्या पाठीमागं आहेसं दिसतं. म्हणून म्हटलं..."

पण एवढें मी म्हणतों न म्हणतों तोंच दिनकरपंतांच्या कपाळावर एक आठी स्पष्ट दिसली आणि मग कांहीं अपेक्षा नसतांना आभाळ एकदम

ढगांनीं भरून यावें, त्याप्रमाणें त्यांचे दोन्ही डोळे एकाएकीं अश्रूंनीं भरून आले.

मला कसेंसेंच वाटलें.

" सांगतों तुम्हांला ! " गद्गदून आलेल्या आवाजानें ते म्हणाले व मग सर्कसमधें तारेवरील कसरत करणाऱ्या कलावंताच्या कौशल्यानें स्वतःला सांवरून घेऊन ते पुढें म्हणाले,

" पांच वर्षांपूर्वींची गोष्ट आहे ती ! "

" म्हणजे तुम्ही ' बी. ए.' त असाल त्या वेळीं ! " माझें त्यांच्या बोलण्याकडे पूर्ण लक्ष आहे हें सुचविण्यासाठीं मीं म्हटलें.

" हो, तेव्हांच ! माझी थोरली बहीण माहीत आहे तुम्हांला ? शकुन्तला नांव होतं तिचं. पण आम्ही आक्काच म्हणत होतों तिला. साताऱ्याला गर्दे म्हणून एक आहेत त्यांच्याकडे ती दिलेली होती. "

नंतर थोडा वेळ दिनकरपंत स्तब्धच होते. जणूं काय आतां पुढील भाग कोणत्या शब्दांत सांगावा, याविषयीं ते विचार करीत होते. कां कुणास ठाऊक, कदाचित् वरील ठिकाणीं भूतकाळ असल्यामुळेंहि असेल, परंतु ती स्तब्धता मला किती भीषण वाटत होती पण ! नंतर भिंतीवर वरच्याच बाजूला रविवर्म्याची 'उषास्वप्ना'ची तसबीर होती, तिच्याकडे विमनस्कपणें पाहत ते भरभर बोलूं लागले—

" इथल्या सदाशिव पेठेंत चाफेकर आहेत ना ? त्यांच्याकडे आक्का इथं आली असतांना एकदां मी आणि ती जेवायला गेलों होतों. जेवायला बोलवायचं तसं कांहीं कारण नव्हतं विशेष ! पण आक्का इथं आली होती आणि चाफेकरांची सरला तिची मोठी मैत्रीण, म्हणूनच ! सरलेचा भाऊ शांताराम, त्याची आणि माझी चांगली ओळख. बोलवायच्या वेळीं तोहि आपल्या बहिणीबरोबर आला होता. तेव्हां अर्थात् ओघानंच मला बोलावणं आलं. तेव्हां आम्ही मग गेलों होतों त्यांच्याकडे जेवायला."

आगगाडी भर वेगांत धावून विश्रांतीसाठीं स्टेशनच्या आवारांत येऊन थांबावी तसे दिनकरपंत थांबले. त्यांची दृष्टि ' उषास्वप्ना ' वरून निघून ते आतां खिडकीबाहेर कुठें तरी पाहत होते. लक्ष कुठें आहे तें पाहण्यासाठीं मींहि तिकडे दृष्टि वळवली. बाहेर विशेष असें कांहीं नव्हतेंच

विजेच्या तारा एका तांबडा रंग दिलेल्या लोखंडी खांबावरून नेहमींप्रमाणें त्याच्या दोन्ही बाजूंला गेल्या होत्या आणि त्या, दुसऱ्या दोन्ही बाजूंचे खांब दिसत नसल्यामुळें हवेमध्यें अधांतरींच ताणून ठेवल्या आहेत कीं काय अशा वाटत होत्या. सूर्यप्रकाशांत बरेच दिवस राहिल्यामुळें फिकट झालेला एक पतंग त्या तारांमधें अडकून अगदीं मलूल होऊन लोंबकळत होता. जणूं काय आपण होऊनच मृत्यूच्या पाशांत जाऊन, विद्युत्प्रवाहानें स्वर्गाची वाट धरलेलें एक वटवाघूळ लाकूड होऊन त्या तारांत पडलें होतें, तें ओळखूं येण्याजोगें दिसत नव्हतें; आणि त्या तारांच्या खालच्याच बाजूला खांबावर नगरपालिकेचा रात्रीं रस्त्यावर उजेड पडावा म्हणून लावलेला लोलक होता, त्याच्या पाठीमागील परावर्तक बशीवर एक चिमणी बसली होती, तिचा केविलवाणा चिंवचिंवाट चालू होता.

पंत पुन्हा बोलूं लागले—

"तर त्या दिवशीं जेवतांना, आम्ही जिथं बसलों होतों त्या दालनांत स्वयंपाकघरांतून येण्यासाठीं जो दरवाजा होता, त्याच्या वरच्या बाजूला भिंतीवर एक तसबीर होती, ती मला दिसली. मी मनांत म्हणालों, म्हणजे एकूण ही चाफेकर मंडळी या विष्णुमहाराजांच्या शिष्यांपैकीं दिसताहेत. आणि त्याच्याविषयींचा माझा आदरभाव, कां कुणास ठाऊक, थोडासा कमी झाला."

पुन्हा थोडा वेळ स्तब्धता.

"त्या दिवशीं संध्याकाळीं मी घरांतल्या मंडळींना चाफेकरांच्या विष्णु-महाराजांच्या शिष्यत्वाचं प्रकरण सांगत त्यांची टवाळी करीत होतों, तोंच आक्कानं विचारलं,

" 'कशावरून म्हणतो आहेस पण तूं हें ?' "

" 'म्हणजे ? दरवाज्याच्या वर त्यांचा फोटो नव्हता का ?' " मीं विचारलं.

" 'कुणाचा ? विष्णु महाराजांचा ?' "

" 'हो ! कां ?' "

" 'शहाण्या, तो विष्णुमहाराजांचा फोटो नव्हता हो !' आक्का म्हणाली.

" 'मग कुणाचा ?' मीं विचारलं.

" ' कुणाचा तें मला नाहीं माहीत ! पण विष्णुमहाराजांचा तो नव्हता याविषयीं मुळींच शंका नाहीं ! ' "

" ' शक्य नाहीं ! ' " मीहि इरेस पडून म्हणालों.

" आणि अशा प्रकारें बराच वेळ रस्सीखेचींतल्यासारख्या दोन्ही बाग सडकून ताणल्या गेल्यानंतर आमची पैज लागली व तिच्यांत जो कोणी जिंकेल त्यानं दुसऱ्याकडून काय वाटेल तें मागून घ्यावं असं टरलं.

" आक्का म्हणत होती, ' पहा बरं ! पैज लावतो आहेस तूं, पण मीं जिंकलें, तर तुझ्याकडून हिऱ्याच्या बांगड्या घेतल्यावांचून रहाणार नाहीं. हो, आतांच सांग काय तें. पाठीमागून मग म्हणशील... "

" पण तिचं बोलणं पुरं व्हायच्या आधींच, मला पूर्ण विश्वास वाटत असल्यामुळं मीं अगदीं निःशंकपणानं ' देईन ! देईन ! काय वाटलं तुला ? ' असं म्हणून गेलों.

" दुसऱ्या दिवशीं सकाळीं मीं शांतारामकडे जाऊन चैाकशी केली तों काय ? माझा पूर्ण पराभव झाला होता. ती तसबीर दुसऱ्याचकुणा तरी महाराजांची होती. आदल्या दिवशीं माझ्या डोळ्यांवर चष्मा नव्हता, आणि त्या महाराजांची ढब थेट विष्णुमहाराजांच्यासारखी होती म्हणून मी तसा फसलों होतों.

" मी घरीं परत गेलों तरी याविषयीं एक अक्षरहि तोंडावाटे काढलं नाहीं.

" त्या दिवशीं संध्याकाळीं आक्कानं आमच्या धाकट्या बहिणीला सरलेकडे पाठवून चौकशी केली. आणि मग काय ? सारंच प्रकरण फुटलं ! माझ्यावर इथून तिथून सर्वांनीं आरडून ओरडून 'हिऱ्याच्या बांगड्यांचा' वर्षाव केला. सरते शेवटीं मी म्हणालों, ' बाबांनो ! कृपा करा आतां अन् गप्प बसा ! ' व मग आक्काला सांगितलं, ' कांहीं केल्या तुझ्या हिऱ्याच्या बांगड्या दिल्यावांचून मी राहणार नाहीं. काय पडेल साधारणपणें त्यांना ? ' "

" ' साडेतीन हजार ! ' " आक्का हंसत हंसत म्हणाली.

" ' ठीक आहे ! ही बी. ए. ची परीक्षा झाल्यावर नंतर मला मुंबईच्या चित्रशाळेंत जायचंच आहे ! चित्रकार झाल्यावर तुला मी सर्व कांहीं देईन ! मग तर झालं ? ' " मी म्हणालों.

" हरिभाऊ, तुम्हांला ठाऊकच आहे, कीं मला लहानपणापासून चित्रकलेची आवड आहे तें ! माझं चित्रकलेचं शिक्षण मी आक्काच्याच साह्यानं घेणार होतों. तिनंसुद्धां मला पूर्वींच सांगितलं होतं, कीं ' एवढी जर तुझी इच्छा असेल तर तूं खुशाल शीक काय शिकायचं असेल तें. तुला मी लागेल तें...' "

हें म्हणतांना दिनकरपंतांचा गळा अगदीं रुद्ध होऊन शब्द चांचरतच येत होते. चर्या आणि आविर्भाव असे होते, कीं जणुं काय त्यांच्यापुढें त्यांची शकुंतला आक्का उभीच होती आणि तिच्याशींच ते बोलत होते. आणि यापुढचे शब्दसुद्धां स्फुंदत स्फुंदत ते बोलले, ते इतके अस्पष्ट आले, कीं त्यांचा अर्थ समजायला देखील मला जरा वेळच लागला.

" हरिभाऊ, आणखी या प्रकारानंतर दोन महिने सुद्धां हो... आणि तिच्याबरोबरच माझी चित्रकार होण्याची आकांक्षा, तिला हिऱ्याच्या बांगड्या देण्याची इच्छा, सर्व कांहीं पत्त्यांच्या बंगल्याप्रमाणं..."

त्यांना पुढें बोलवेचना.

मीं एक सहानुभूतीचा दीर्घ निःश्वास टाकला एवढेंच

१९३४

## झुमराव पाटील : : ४

पांचगणीला जेव्हां मी पोचलों, तेव्हां माझे मित्र विसुभाऊ तेथें नाहींत हें मला समजून आलें. परंतु ते तेथें नसले तरी त्यांच्या पत्नीनें जें मला सांगितलें, त्याचा मतितार्थ असा होता, कीं कांहीं निकडीच्या कामासाठीं विसुभाऊंना तांतडीनें पुण्याला जावें लागलें होतें. आज-उद्यां इतक्यांत ते येणारच होते आणि मी पांचगणीला याच सुमारास येणार आहें हें त्यांना ठाऊक असून, आपण पुण्याला असतांना जर मी आलों तर मला ठेवून घ्यायला त्यांनीं पत्नीला सांगूनहि ठेवलें होतें.

त्या दिवशीं दुपारीं मला झोंप चांगली आली. त्या वेळीं मी अर्धवट झोंपेंत असलों पाहिजे. कारण कुणी तरी बोलत असल्याचा मला भास झाला. तें कुणी तरी माणूस कुणाला तरी विचारीत होतें, "इसुभाऊ आलेत का?"

त्याला कुणीच उत्तर दिलें नाहीं. पुन्हा प्रश्न ऐकूं आला, "व्हय म्हनलं, इसुभाऊ पुन्याहून आलेत का?" त्यावर मी त्या अर्धवट झोंपेंतून जागा झालों आणि मला दिसून आलें, कीं पन्नाशी उलटलेला एक खेडवळ गृहस्थ उभा आहे आणि तो मलाच प्रश्न विचारतो आहे. मी या कुशीचा त्या कुशीवर वळलों आणि अर्धवट झोंपेच्या धुंदींतच त्या माणसाला उत्तर दिलें, "अजून आले नाहींत ते; पण आज संध्याकाळीं नाहीं तर उद्यां येतील असं म्हणतात."

तो निघून गेला. जातांना तो म्हणाला, " बरं, मग उद्या मी येऊनशान जाईन."

मीं आणखी थोडा वेळ तणावून दिली.

विसुभाऊ त्या दिवशीं संध्याकाळीं दिवेलागणीच्या वेळीं आले. गप्पागोष्टी चालू असतांना मीं त्यांना अशा अशा वर्णनाचा एक गृहस्थ तुमच्याकडे येऊन गेला असें सांगितलें. डोळ्यांतील चमक आणि हिरवा रंग एवढें सांगतांक्षणींच विसुभाऊ म्हणाले, " अरे, तो तर आमचा झुमराव पाटील!"

" झुमराव?" नांव चमत्कारिक वाटल्यामुळें मीं विचारलें. " म्हणजे तेंच त्याचं नांव?"

विसुभाऊ म्हणाले, " त्याचं खरं नांव आहे भीमराव पाटील आणि कागदोपत्रीं त्याचं नांव असतंहि भीमरावच. पण हांक मारतांना लोक त्याला म्हणतात, ' झुमराव पाटील.' भीमरावाचं झुमराव कसं झालं तें मात्र मला ठाऊक नाहीं. पण लहान पोरांपासून सर्वांचा तो आहे झुमराव पाटीलच."

मीं विचारलें, " कोण आहे हा?"

विसुभाऊ म्हणाले, " मोठा विलक्षण मनुष्य आहे तो. कमालीचा धाडसी. आजपर्यंत किती तरी वेळां वाघांच्या शिकारी त्यानं जमिनीवरून समोरासमोर गोळ्या झाडून केल्या आहेत."

" असं!" चकित होऊन म्हटलें.

" हो तर! आणि सर्वांत विलक्षण गोष्ट म्हणजे साऱ्या शिकारी त्यानं दोन नळ्यांच्या ठासणीच्या बंदुकीनं केल्या आहेत."

" कमालच आहे मग! कुठला आहे हा?"

" ह्या डोंगराच्या पश्चिम बाजूला खालीं कृष्णा नदीचं खोरं आहे. तिथल्या चिखली गांवांत हा राहतो."

* * *

दुसऱ्या दिवशीं दुपारीं साडेतीन चारचा सुमार होता. विसुभाऊंनीं पुण्याहून येतांना दोन नळ्यांची चांगली नवी जर्मन बंदूक आणली होती, ती ते मला दाखवीत होते. त्यांनीं परवाना घेतला होता; त्यांत त्यांना

आपल्याजवळ एका वेळीं जास्तींत जास्त शंभर गोळ्या ठेवण्याची परवानगी मिळाली होती आणि त्या त्यांनीं वेगवेगळ्या प्रकारच्या आणल्या होत्या, त्याहि त्यांनीं मला दाखवल्या. बंदुकीचे सगळे भाग समजावून घेतल्यावर विसुभाऊंच्या हातांतून मीं ती घेतली आणि दस्ता खांद्याला टेकवून नेम धरूं लागलों. बंदूक भरलेली नव्हती म्हणून ऐटींत घोडयावर बोट ठेवून तिचें तोंड मी निरनिराळ्या दिशांना वळवीत होतों. मध्येंच एकदां पुढच्या माशीवरून दृष्टि रोखीत फुलझाडावरच्या एका लाल फुलावर मीं नेम धरला आणि न भरलेल्या त्या बंदुकीचा घोडा ओढणार, तोंच झुमराव पाटील त्याच्या नेमांत आलेले मला दिसले आणि बंदुकीचा फट् असा आवाज झाला.

"वा महाराज! मारायबिरायचा इचार हाये का काय आम्हांला?"

झुमराव, विसुभाऊ आणि मी केवळ्यानें हंसलों! विसुभाऊ म्हणाले, "या या! झुमराव पाटील! बसा बसा! या या, असे या! खुर्चीवर बसा ना!"

"कवांशीं आलां?" झुमरावांनीं विचारलें.

"काल संध्याकाळीं आलों. तुम्ही येऊन गेलांत म्हणून कळलं. आमचे हे पाहुणे, त्यांनीं आम्हाला सांगितलं."

विसुभाऊ आंत गेले आणि थोडयाच वेळांत त्यानीं तीन पुडकीं आणून झुमरावांच्या स्वाधीन केलीं. झुमरावांनीं तीं काळजीपूर्वक आपल्याजवळ ठेवून घेतल्यावर विसुभाऊ बंदूक पुढें करीत म्हणाले, "ही पहा पुण्याहून येतांना मीं नवी बंदूक आणली." आणि माझ्याप्रमाणेंच बंदुकीचे सर्व भाग विसुभाऊंनीं त्यांना दाखवले. एखाद्या आवडत्या कुत्र्याच्या अंगावरून हात फिरवावा तसा नळीवरून हात फिरवीत झुमरावांनीं विचारलें, "इसुभाऊ, पर आतां भवानी कधीं व्हायाची?"

"आम्ही नाहीं करणार. या बंदुकीची भवानी आतां व्हायला पाहिजे तुमच्याच हातनं!" विसुभाऊ म्हणाले.

झुमराव विसुभाऊंच्या हातीं बंदूक देत म्हणाले, "आम्हांला नग ही काडतुसाची भानगड! आमचं ठासणीचं खटलं ठीक हाये आमचं आम्हांला!" असें म्हणून मघांचीं तीन पुडकीं झुमरावांनीं शेजारीं ठेवलीं होतीं तीं उचलून मांडीवर घेतलीं.

मीं विचारलें, " या पुडक्यांत काय आहे ? "

झुमरावांनीं सांगितलें, " इसुभाऊंनीं पुण्याहून येतांना आनलेलं आमच्या बंदुकीचं सामान. जातांना त्येंना म्यां सांगितलं व्हतं."

विसुभाऊ अधिक स्पष्टीकरण करीत म्हणाले, " या तीन पुडक्यांत ठासणीच्या बंदुकीला लागणाऱ्या केपा, दारू आणि गोळ्या आहेत. त्या केपांवर घोडा आदळला म्हणजे आंत ठासलेल्या दारूचा भडका होतो आणि नळींतून गोळी जोसांत पुढ जाते. या ठासणीच्या बंदुकींत एक मोठी गैरसोय असते अन् ती म्हणजे प्रत्येक वेळीं दारू पुढून ठासावी लागते. त्यांत पुन्हां, दारू जर नीट नाहीं ठासली गेली, तर भलताच घोटाळा होण्याचा संभव असतो. तरी बरं झुमराव, तुमची बंदूक दोन नळ्यांची आहे ना ? "

" हां ! "

" म्हणजे यांना मग एका वेळीं दोन नळ्यांत दारू भरून गोळी तयार ठेवतां येते. पण त्यामुळं गैरसोय कांहीं फारशी दूर नाहीं होत ! "

विसुभाऊ पुढें म्हणाले, " झुमराव, ठासणीची बंदुक तुमची आवडती असली तरी आमच्या या बंदुकीची भवानी एखाद्या चांगल्या शिकारीनं करा कीं ! अगदीं तुमच्या डालकेटच्या शिकारीसारखी शिकार पाहिजे."

" डालकेटची शिकार कसली ? " मीं विचारलें.

" झुमराव, सांगा सांगा यांना ती प्रसिद्ध हकिकत !" विसुभाऊ म्हणाले.

" न्हाई न्हाई ! इसुभाऊ ! तुम्हींच सांगाया होवीं ती ! " झुमराव म्हणाले.

" छेः छेः ! आपल्याला नाहीं जमायचं तें ! तुम्हीं स्वतः अनुभव घेतला आहे तो. तुम्हांलाच ती चांगली सांगतां येईल."

* * *

उजव्या हातानें दिशा दाखवीत झुमराव पाटील सांगूं लागले, " ह्या पल्याडच्या अंगाला डालकेट हाये न्हवं का ? त्येच्या पल्याडच्या बंगल्या-मधूनशी एक वासरूं एक दिस न्हाईसं झालं ! लोकांची लई घाबरगुंडी उडाली ! लई उडाली घाबरगुंडी ! "

मीं विचारलें, " डालकेट म्हणजे काय ? "

विसुभाऊ म्हणाले, "पांचगणीच्या क्षयरोग्यांच्या सॅनेटोरियमचं नांव आहे तें."

झुमराव म्हणाले, "हां त्येंच ! दुसऱ्या दिसाला अन् तर कमाल झाली! तिनीसांच्या सुमाराला त्ये बाजूलाच कुना तरी सायबाची–काय नांव त्येचं बरं?— एक्केन— एक्केनसायेब पगा —त्येची गाय उघडयावर चरत व्हती तीच वागानं मारली. आरडाओरडा झाला, सायबाला समजलं अन् त्येनं लागलाच पोलिससुप्रिटेणला कळवलं. त्यो जवळ बसलेल्या लोकांस्नी बोलला अन् तवां त्येला लोकांनीं सांगितलं, कीं झुमराव पाटीलबाबा वर आल्याती आन् त्येंच्यापाशीं बंदुकबी हाये !

"आन् मंग काय ! आम्हांस्नी बोलावनं आलं कीं तवांच सुप्रिटेण-सायेबाचं ! आम्हीं इच्यार केला, 'चला, बरंच झालं !' असं पगा, दुपारींच मला वार्ता लागली व्हती, कीं डालकेटाजवळ आदल्या रातींच वाघरूं आलं व्हतं, आनखीन् त्येनं एक वासरूंबी मारलं. म्यां इच्यार केला, आपुन आपलं हत्यार घेऊनशीं वर जावं आन् जमलं तर शिकारीचं कामबी सादावं. म्हून तिनपाराच्या सुमारालाच घरांतनं बाहिर पडलों अन् सारा डोंगर चढून मावळतीच्या येळेला मावळणीचं घर गांठलं माझ्या. सुप्रिटणसायबाचं बोलावनं आलं तवा मी इचारांतच व्हतों काय करावं म्हून !

"निरोप आला आन् लागलीच निघालों. रात फार झाली नव्हती. म्हनलं, मारलेली गाय खायला वाघ ततं यायच्या आंत जवळ कुठं तरी जाऊन बसाया व्होवं. म्हून निघालों लगबग ! मावळणीचा भाऊ व्हता ततं, त्येला म्हनलं, 'चल त्येका !' त्यो म्हनला, 'चलतों !' त्येला घेतला आन सुप्रिटेणसायबाकडं ग्येलों. त्येनं बराबर जागा सांगितली, आन् म्हनला, 'तुझ्याबरोबर मानसं द्येतों, किती देऊं ?'

"तशी म्यां म्हनलं, 'माझ्याबरोबर कुनी बी नग ! भान्या माझ्या-संगं हाये !'

"तवां मग सुप्रिटेणसायबाच्या सांगन्यापिरिमानं गाईच्या मुडद्याजवळच एका झुडुपाआड आडोसा घेऊन वाट पगत बसलों. भानूच्याजवळ धार लावलेला कोयता व्हता. रात काई फार झाली न्हवती.

"पर मानसं काय येडीं असत्यात पगा ! आमी अंधारांत ततं बसलों

व्हतों आन् समोर कुठंतरी दिवा दिसला म्हूनशान मी तिकडं पगाया लागलों, तवां योक सायेब आन् त्येची मडुम अंधारांतनं पाऊलवाटनं ब्याट्रीनं रस्ता सोधीत येत व्हती. कुठं मराया ग्येले व्हते कुनास ठाऊक! म्यां इच्यार केला, आतां यान्ला वाघानं खाल्लं म्हंजी मग ?

"आश्चीर वाटल तुम्हांस्नी पगा इसुभाऊ, पावणे, माझ्यासमोरनं पंध्रावीस पावलांवरनं वळून त्ये दोघं रस्त्याकडं ग्येले आन् मला जानवर दिसल्यागत वाटलं. अंधारांत सगळं काळं व्हतं. म्यां मनाशीं इच्यार केला, थोडी वाट पगूं या. सायबामागून ग्येला वाघ तर बंदूक मारावी; आन् सांच्या मारल्या गाईला खायला आला तर खायला सुरुवात करूं देऊन गोळी झाडावी. पर जराशानं वाटलं, वाघ सायबाच्या मागून जातुया, सायबाची अन् मडमची आतां धडगत न्हाई! तवां उचलली बंदूक, लावली खांद्याला, आन् नेम धरून हानला घोडा अन् काय! पगतां पगतां वाघ अंधारांत पसार झाला. म्यां भानूला म्हटलं, 'भान्या, वाघाला गोळी लागली! त्यो ग्येला कसा त्यें पगितलंस ? गोळी खास लागली! मरलच तो! न्हाईतर जायबंदी तरी व्हइलच. आतां काय तो येत न्हाई! उद्यां त्येला पगाया पाहिजे!'"

"भानू बोलला, 'त्ये खरं; पर आपुन काय करूं या आतां ?'"

"म्या म्हनलं, 'बंदुकीचा आवाज ऐकून त्यो मडुमवाला सायेब आला परत तर जाऊं त्येच्यासंग गप्पा करीत. न्हाईतर घरला जायचं काय अडलंया! देऊं हतंच कांबळं हांतरूनशी आन् देऊं तानून आन् काय!'"

"भानू म्हणतु काय, 'असं कसं झुमरावदादा ? आन् वाघ परत आला म्हंजी ?'"

"म्यां त्येच्या डोईवर टप्पल मारली आन् म्हनलों, 'लेका भान्या, आजपवतर या झुमरावानं वाघ मारले त्ये उगाचच व्हय रे ? त्यो वाघ तर खासच न्हाई येत! त्यो मेलाच! निपानपक्षी जागचा हालायचा न्हाई इक्ता तरी जाया झालाच! उद्यां सकाळीं पग!'"

थोडा वेळ वाट पगूनशी जवा सायेब येईलसं दिसंना, तवा कांबळीं हांतरून टाकलीं ततंच आन् दिलं आंग टाकून! शीण फार आला व्हता,

तवां आंगावर कांबळं लपेटून घेतलं आन् लागलीच नीदबी आली. गायीचा मुडदा व्हता ततंच व्हता ! ”

* * *

“ रातींची कवांतरी कशानशी मला जाग आली म्हून पगतों तवां, ‘ प्मक् प्मक् प्मक् प्मक् ! ’ म्यां वळखलं त्यें ! वाघच ! गायच खात व्हता तो ! न्याळून पगाया लागलों पर नीट दिसतंया कुठं ! धुकाट लई पडल्येलं आन् पाऊसबी थोडाथोडा थुइथुइ पडत व्हता. टक लावून पगितलं, तवां वाटलं, कीं वाघ माना झटकीत मास खातुया ! आन् त्येनं हात दीड हात गाय खाल्ली व्हती !

“ तवां मंग म्यां भान्याला डिवाचलं आन् हळूच म्हनलं, ‘ भान्या, ऊठ, ऊठ वाघ ! ’ ”

“ त्यो उठचना ! पुन्हां डिवाचला तशी म्हणतो. ‘ गप् बस रे पाटील-दादा. वाघ कुठला येतुया या वकताला ? तरस बिरस असल ! ”

“ त्येला दटावून म्यां म्हनलं, ‘ लेका हळू बोल कीं ! का मरायचं हाये ? ’

“ त्यो डोळं चोळाया लागला. म्यां मनांत इचार केला, आतां आलं का वंगाळ काम ! बंदुकबी ठासलेली न्हवती ! बरं तर बरं, बंदूक दोन नळीची व्हती. आन् रातीचा एक बार उडाला व्हता पर आंत दुसरा ऱ्हायला व्हता; आतां त्यो बी पावसानं सर्द झाला असला म्हंजी आटपलं काम ! ”

“ पर म्हनलं, आतां माघार न्हाई घ्यायाची ! भान्याला सांगितलं, ‘ भान्या न्येम हुकला, नाहींपक्षीं बार फुसका निघाला, तर सपकन् झाडावर चढायचं बरं का ! न्हाईतर मरशील ! ’

“ मग द्येवाचं घेतलं नांव, कांबळ्याखालची बंदूक काढली अन् झुडपा-च्या बाजूला होऊन आवाजाच्या रोखानं नेम धरला आन् हानला घोडा !

“ पावणे, इसुभाऊ, तुम्ही ततं पाहिजे व्हतां. बाप रे ! बाप रे ! बार झाल्याबरोबर वाघ हा उच उडाला आन् धापकन् आदळला ! म्हनलं, ‘ भान्या, टाळी दे ! वाघाला डोक्यांत न्हाईतर छाताडांत गोळी बसली ! ’

“ भराभर पुन्हा बंदूक ठासली, पर जरूरच न्हाई पडली. भान्या

म्हणाला, ‘ झुमरावदादा, म्यां न्हवतं सांगितलं, त्यो रातीचा वाघ न्हाई म्येला म्हून ? पर तुमी आपल्याच इचारांत गर्क ! मरायची वेळ आली व्हती ना ! तुमी जागं नसतां झालं म्हंजी ? ’

“ मी बोललों, ‘ भान्या काईतरी घोटाळा हाये खास ! सकाळीं पगूं आतां खरं काय हाये त्यें ! त्यो वाघ तर म्येलाच ! पर आतां आपुन काय करूं या सांग ! हतंच घुरंगट करून झोपायचं का ? ’

“ भान्या म्हनतो, ‘ नगं रे बाबा ! ’

“ तवां मग झुंजूमुंजू होईपावतर हातार्शी बंदूक ठिवली आन् ततंच आंगावर कांबळी घेऊन गप्पा मारीत बसलों...

“ सकाळीं सुप्रिटेणकडं वर्दी दिली अन् मानसं आनलीं. पहाटंचा म्येलेला वाघ नेल्यावर म्यां नेटच लावला आन् सारं रान धुंडाय लावलं. लोक म्हनले, ‘ पाटीलदादा, वाघ घावला, आतां कशापाई तरास घेतां ? ’ त्येनला तवां मी काईबी बोललों न्हाई.

“ पर मग दुसरा वाघ घावला, तशी सव्यांचीं त्वांडं चिमनीवानी झालीं. तवां भान्याच्या पाठीवर थाप मारूनशी म्हनलं, ‘ पग ! लेकाच्या पग ! सांगत न्हवतों तुला ? झुमराव पाटलाचा आदमास चुकायचा न्हाई ! ’ ”

* * *

झुमराव पाटील पुढें सांगूं लागले, “ वाघाचीं दोनी धुडं सायबाला देऊन टाकलीं. भान्या बोलला, ‘ पाटीलदादा, देऊं नगं. लोकाला सायेब सांगल, आपुनच वाघ मारले म्हून ! ’ ”

“ पर म्यां म्हनलं, ‘ आर, त्यें खरं, पर आपुनतरी वाघांच्या मुडद्यांचं काय करनार ? घेऊं दे सायबाला ! आपल्याला तर वाघ मारायला घावले ना ? ’

“ पर सायेब मग माझ्यावर लई खूष झाला आन् त्येनं मला बक्षिशी पन खूप दिली ! ”

झुमराव पाटलांनीं तीं तीन पुडकीं काळजीपूर्वक आपल्या उपरण्यांत बांधून घेतलीं आणि म्हटलें, “ इसुभाऊ, येचं पैसं किती झालं ? ”

विसुभाऊ म्हणाले, “ झुमराव, तुमच्याकडनं बंदुकीच्या सामानाचे पैसे ! संपलंच काम ! आमच्या बंदुकीनं भवानी करा म्हणजे झालं ! ”

झुमराव म्हणाले, “ ठीक ठीक ! ” १९४१

## त्रास देणारे मित्र : : ५

आपल्याकडे शांताराम अशा या विलक्षण वेळीं आलेला पाहून विद्याधरला परमावधीचें आश्चर्य वाटलें. वेळ विलक्षण म्हणजे अनेक दृष्टींनीं विलक्षण होती. रात्रीचे साडेदहा वाजून गेले होते हें एक. आणि दुसरें असें, कीं विद्याधरची परीक्षा चालू होती, ती जवळ जवळ संपत आली होती; आतां उद्यांचे फक्त दोनच पेपर शिल्लक राहिले होते. त्यामुळें तो अभ्यासांत गढून गेला होता. आणखी तिसरी गोष्ट अशी, कीं शांतारामची परीक्षा गेल्या आठवड्यांत आटोपली असल्यामुळें तो मोकळा होता, तरी कामांत गुंतलेल्या माणसावर आपलें अस्तित्व लादण्याचें धाष्टर्य शांतारामनें आजपर्यंत कधीं केल्याचें विद्याधरला आठवत नव्हतें. या सगळ्या विचारांनीं त्याला विस्मयच वाटला.

पण शांतारामची यानंतर वागणूक झाली ती तर त्याहून अधिक विस्मय उत्पन्न करणारी होती.

कारण, दार उघडल्यानंतर शांताराम दिसल्याक्षणीं विद्याधरनें जेव्हां त्याला विचारलें, "हें रे काय? या भलत्याच वेळेला कसा काय उगवलास?"

तेव्हां शांतारामनें उत्तर दिलें, "वेळ भलती असो वा नसो, आलों आहे खरा. एवढंच नव्हे तर मी परतहि जाणार नाहीं!"

" म्हणजे ? "

" म्हणजे काय ? तूर्त दोन तीन दिवस तुझ्याकडेच राहणार आहे."

" आणि मग ? "

" तें अजून ठरवलं नाहीं."

" घरून भांडूनबिंडून बाहेर पडला आहेस कीं काय ? " त्याचे दोन्ही खांदे धरून त्याला आपल्या कॉटवर बसवीत विद्याधरनें विचारलें.

" आत्तां कांहीं एक विचारूं नकोस ! तुझा अभ्यास चालूं दे. मी इथं तुझ्याकडे राहणार असलों, तरी तुझ्या अभ्यासांत एवढासुद्धां व्यत्यय येतां कामा नये. मी काय, माझी परीक्षा झाली आहे, मोकळा आहें. पण म्हणून तुला कां त्रास ? "

" तें सगळं खरं आहे शांताराम ! तरी पण आत्तां सांगण्यासारखं कांहीं असलं, तर तें सांगायला तुला कांहीं हरकत नाहीं."

" आतां सांगण्यासारख्या आहेत पुष्कळ गोष्टी ! पण मी एक अक्षरहि सांगण्याच्या मनःस्थितींत आतां नाहीं ! " आणि आपल्याकडे विद्याधर विस्मित दृष्टीनें पाहत आहे हें दिसल्यावर तो म्हणाला, " माझ्याकडे असं बघण्यांत वेळ घालवत बसूं नको ! मला फक्त आतां एक अंथरूण दे म्हणजे झालं. मी निजतों. तुझा अभ्यास चालूं दे."

विद्याधरनेंहि मग अधिक अंत पाहिला नाहीं. " बरं तर ! " एवढेंच म्हणून त्याच्या अंथरुणाची व्यवस्था केली व तो पांघरूण घेऊन निजल्यावर अभ्यासाचा शीण घालवण्यासाठीं मध्यें थोडा वेळ विद्यार्थी इकडे तिकडे हिंडून येतात तसा तो हवा खाण्यासाठीं खोलीबाहेर आला.

बऱ्याच खोल्यांतील दिवे विझून गेले होते. वसंतवारा वाहत होता. टेकडी, झाडें व इमारती काळ्याकभिन्न दिसत होत्याच. आकाशांत तारकापुंज चमकत होते आणि दूर कुठें तरी एकादशीचें किंवा कसलें तरी भजन चाललें असावें, त्यांतील टाळमृदंगांचा संमिश्र आवाज अगदीं अस्पष्टपणें रेंगाळत कानांवर येत होता.

विद्याधराच्या डोक्याला थंडपणा वाटून मनाला तरतरीहि आली. सोला-पूरला आपले वडील आजारी आहेत असें त्याला पत्र आलें होतें. याबद्दलची त्याला काळजी वाटत होती ती आत्तांच्या या मनाच्या उल्हसित अवस्थेमुळें

पुष्कळच कमी झाली. परीक्षा उद्यां संपणार होती आणि उद्यां रात्रींच सोलापूरला जावयाचें असें त्यानें ठरविलें होतें. पण आत्तांच्या या उल्हसित अवस्थेंत, ' आपण फारच चिंतातुर झालों होतों. इतक्या तांतडीनें सोलापूरला जाण्याचं कारण नाहीं. तीन चार दिवस मित्रमंडळींच्या सहवासांत घालवावेत, परीक्षेच्या अभ्यासाचा मनावर पडलेला ताण सैल करावा आणि मग सोलापूरची वाट धरावी.' असें मनाशीं म्हणून तो बेत त्यानें रहितहि केला.

येणाऱ्या तीन-चार दिवसांतल्या स्वैर आणि अनिर्बंध कार्यक्रमांच्या अपेक्षेनें आतां अभ्यास करण्याची त्याला स्फूर्ति आली व तो खोलींत आला आणि पुस्तकें, वह्या पुढयांत ओढून त्यानें वाचावयाला सुरुवात केली.

पण तेवढयांत टेबलावर वडिलांचा फोटो दिसला. ' रात्रीं जेवण झाल्यानंतर आरामखुर्चींत पडल्या पडल्या चिरूट ओढीत आपले वडील आपल्याशीं गप्पा मारतांना जसे बसलेले असतात, अगदीं तसेच ते या फोटोंत बसले आहेत. त्यांच्या मस्तकाभोंवतीं तरंगणारीं तीं धूम्रवलयं ह्या फोटोंतहि आलीं आहेत.' आणि मनाशीं हा विचार करतांना पहिला पाऊस झाल्यानंतर येणाऱ्या मातीच्या वासासारखा चिरुटाचा उग्र, उन्मादक वास आपल्याभोंवतीं दरवळल्याचाहि विद्याधरला भास झाला. आणि त्या भासांतच त्याच्या मनानें सोलापूरला उड्डाण केलें, आणि इतकेंच नव्हे तर तेथें गेल्यानंतर होणारा भावी संवादहि त्याला ऐकूं आला...

" हं, काय विद्याधर, बरं आहे ना ? जरासा वाळलेला दिसतो आहेस!" वडील विचारतील.

" अंगानं भरलेला मी कधीं तरी दिसलों आहें का तुम्हांला, नाना ?" आपण हंसत हंसत म्हणूं.

यावर वडीलहि हंसतील आणि म्हणतील, " काय पेपर वगैरे ठीक गेले आहेत ना ? "

" हो." आपण उत्तर देऊं.

" छान. बरं, वर्ग-बिर्ग कांहीं ? " वडील विचारतील.

" बघायचं आतां. पण मिळावा अशी अपेक्षा करायला हरकत नाहीं."

" तुमच्या प्रिन्सिपल वर्तकांचं मला पंधरा दिवसापूर्वीं पत्र आलं होतं."

यावर आपण हुंकार देऊं. पण प्रिन्सिपल वर्तकांनीं पत्रांत काय लिहिल होतं तें वडील कधींच सांगायचे नाहींत...तथापि प्रिन्सिपल वर्तकांनीं मुद्दाम बोलावणं पाठवून तें पत्र टाकायच्या आधीं वाचायला दिलं होतं आणि आपल्यावरच्या जबाबदारीची जाणीव करून दिली होती हें विद्याधरला आठवलें. त्यांनीं लिहिलें होतें— "विद्याधर यंदा पहिल्या वर्गांत येईल याविषयीं मला संशय नाहीं. एवढंच नव्हे, तर त्याला 'लालाशंकर ध्रुव' शिष्यवृत्तिहि मिळेल अशी मी अपेक्षा करतों आहें. परवां तर कुणीसं मला सांगत होतं, कीं कॉलेजांतलीं मुलं म्हणतात, लालाशंकर ध्रुव शिष्यवृत्ति यंदा विद्याधरला ठरलेली आहेच. फक्त वृत्तपत्रांतून ती छापून यायला आणि त्याच्या हातीं पडायलाच काय ती परीक्षेची जरूरी आहे! .."

आणि यानंतर आपल्यावर कॉलेजची आणि वडिलांनीं सार्वजनिक कार्य करून मिळवलेली कीर्ति वृद्धिंगत करण्याची केवढी जबाबदारी आहे हें सांगण्यासाठींच तें पत्र वाचायला दिल्याचं वर्तकांनीं सांगितलं होतं...

विद्याधर तत्क्षणींच तंद्रींतून जागा झाला आणि त्यानें अभ्यासाला जोरांत सुरुवात केली.

शांताराम गाढ झोपलेला दिसत होता.

विद्याधरची अभ्यासाची मांडी पहांटे दीड वाजेपर्यंत हलली नाहीं. नंतर त्यानें तीन एक तास झोप घेऊन सकाळचीं आन्हिकें उरकून पुन्हा मांडी ठोकली. बक्षिसें, शिष्यवृत्त्या मिळवून विद्यापीठाला लुटायचें म्हणजे असाच परिश्रमांचा कोट करावा लागतो.

* * *

दुसऱ्या दिवशीं सकाळींहि शांतारामचें वागणें विलक्षणच होतें. त्याचें काय बिनसलें होतें कुणास ठाऊक! त्याच्या त्या वागण्याला चक्रमपणा म्हणावा, कीं हेकटपणा, तऱ्हेवाईकपणा, विक्षिप्तपणा कीं काय म्हणावें तेंच विद्याधरला समजेना.

कारण साडेआठच्या सुमाराला अभ्यासाच्या अतिरेकानें विद्याधरच्या डोक्यांत गरगरूं लागलें, तशी थोडें बाहेर जाऊन यावें असा विचार त्याच्या मनांत आला. म्हणून त्यानें शांतारामला विचारलें, "शांताराम, चल आपण भैया वाडदेकराच्या खोलीवर जाऊन येऊं."

" कशाला ? " शांतारामनें विचारलें.

" कांहीं तरी वाचायला मिळेल तिथं. त्याच्याकडे वृत्तपत्रं येतात. आणखी मलाहि अभ्यासाचा शीण आला आहे."

" खरं सांगायचं म्हणजे मला कुठं बाहेर जावंसंच वाटत नाहीं."

• " कां ? "

" तें मात्र मला विचारूं नकोस. कारण, मला तें सांगतां यायचं नाहीं."

" सांगतां यायचं नाहीं म्हणजे काय ? कधींच नाहीं का सांगतां येणार ? "

" तसं नाहीं म्हणत मी. आत्तां नाहीं, एवढंच सांगतों."

" बरं. तुझ्या भानगडींविषयीं मी अधिक चौकसपणा नाहीं दाखवीत. पण मी जाऊन येतों भैयाच्या खोलीवर. तूं थांब इथंच."

विद्याधराचा हात शांतारामनें धरला आणि विलक्षण दृष्टीनें त्याच्याकडे पाहात म्हटलें, " विद्याधर, मी सांगितलेलं ऐकशील ? "

" काय ? "

" या क्षणीं तूं सुद्धां मला एकटा सोडून बाहेर जाऊं नकोस."

" कां ? "

" तेंहि मला सांगतां यायचं नाहीं."

त्याच्या पाठीवर थाप मारीत विद्याधर म्हणाला, " काय लेका, तुला झालं आहे तरी काय ? जीवबीव द्यायचा विचार आहे कीं काय तरी तुझा ? "

उत्तरादाखल शांतारामनें त्याच्याकडे मघांच्याच विलक्षण दृष्टीनें बघितलें.

विद्याधर म्हणाला, " काय झालंय् कांहीं कळतच नाहीं. काल रात्रीं एकाएकीं आलास. घरून भांडून बिंडून आलास कीं काय म्हणून विचारलं तर म्हणालास, कीं आत्तांच कांहीं विचारूं नकोस. तुझं हें आत्तांच कांहीं विचारूं नकोस अन् सांगतां येत नाहीं संपणार तरी केव्हां ? "

एक क्षणभरच शांताराम अस्वस्थ झालेला दिसला. पण मग स्वतःला सांवरून घेऊन तो म्हणाला, " विद्याधर, रागावूं नकोस. उद्यां सकाळीं, किंवा जमलं तर आज संध्याकाळींसुद्धां, सारं कांहीं सांगेन तुला."

यानंतर त्यांनीं मग तेथेंच कांहीं वेळ अवांतर विषयांवर गप्पा माराव्यात, मग विद्याधरनें थोडा वेळ अभ्यास करावा, अशा रीतीनें जेवायची वेळ होईपर्यंत वेळ काढला.

जेवण्यासाठीं ते क्लबांत गेले तेव्हां त्यांना तेथें कधींहि न आढळणारी शांतता आढळली. त्यांच्याबरोबर जेवायला कुणीच नव्हतें. विद्याधरानें चमकून शांतारामला हंसत हंसत विचारलें. "आज मुलांनींसुद्धां विचित्र-पणानं वागण्याच्या बाबतींत तुझ्याशीं संगनमत केलेलं दिसतंय् !"

शांतारामची मान खालीं झाली होती. त्यानें कांहींच उत्तर दिलें नाहीं.

विद्याधर ओशाळून म्हणाला, "शांताराम, रागावलास? मीं आपली तुझी सहज चेष्टा केली. तुला दुखवायचं माझ्या मनांत मुळींच नव्हतं."

विद्याधरनें मग वाढप्यास विचारलें, "ही काय भानगड आहे रे शंकर?"

शंकर म्हणाला, "सगळे लोक जेवून गेले साहेब. तुम्हांला आज बराच उशीर झाला यायला."

परंतु शांताराम मघाशीं वरमला असला तरी आपल्या वागण्याच्या तऱ्हेंत यत्किंचितहि खंड त्यानें पडूं दिला नाहीं. विद्याधरचा पिच्छा त्यानें परीक्षेच्या मंडपांत दुसरी घंटा होऊन पर्यवेक्षकांनीं प्रश्नपत्रिका वाटायला प्रारंभ करीपर्यंत सोडला नाहीं. आणि तो पेपर संपल्यानंतर आळोखेपिळोखे देत विद्याधर अंग मोकळें करतो आहे तोंच त्याच्यासमोर शांतारामची मूर्ति पुन्हां हजर ! तेव्हां मात्र विद्याधर अगदीं थक्क झाला. एक क्षणभरच त्याच्या मनांत आलें, "ही काय साडेसाती माझ्यामागं लागली आहे! एखाद्या माणसाला समंधाप्रमाणं झपाटणारे हे असले त्रास देणारे मित्र असण्यापेक्षां—"

पण तेवढ्यांत त्याला शांतारामची आजपर्यंतची वागणूक आठवली आणि तो मनाशीं म्हणाला, "असं कधीं आजपर्यंत शांतारामनं केलं नाहीं. कांहीं तरी अतिशय चमत्कारिक संकट त्याच्यावर गुदरलं असलं पाहिजे. तें जोंपर्यंत आपल्याला समजलं नाहीं, तोंपर्यंत त्याच्यावर चिडणं अगदीं अनुचित. एवढंच नव्हे तर आपल्या मोठ्या संकटाच्या प्रसंगीं त्यानं माझ्या आश्रयाला यावं ही मोठ्या मानाची गोष्ट समजून मीं त्यांत धन्यता मानायला पाहिजे. आणखी पुन्हा माझी ही परीक्षेची धांदल चालू आहे म्हणून कदाचित्—कदाचित् कशाला बहुतेकच—त्यानं आपली मनोव्यथा मला सांगितली नसावी. हा त्याचा केवढा समंजसपणा, मनाचा मोठेपणा !"

आणि या विचारामुळेंच शांतारामनें जेव्हां मागच्या बाजूला विस्तीर्ण पटांगणाच्या पलीकडे मोकळ्या जागेंत एकच एक मोठा पिंपळाचा वृक्ष

होता तेथें जाण्याची गोष्ट काढली, तेव्हां तो त्याच्याबरोबर निमूटपणें गेला आणि तितक्याच निमूटपणानें दुसऱ्या पेपराच्या सुरुवातीपर्यंत त्याची पाठ शांतारामनें सोडली नव्हती, तरी तो त्रासला नाहीं किंवा त्याच्यासंबंधीं वावगा विचारहि त्यानें मनांत येऊं दिला नाहीं.

परंतु संध्याकाळीं पेपर संपल्यानंतर मात्र सगळी परीक्षा संपल्याच्या आनंदांत त्यानें घाईघाईनें सभोंवार दृष्टि टाकून बघितलें तर त्याला शांताराम कुठें दिसला नाहीं. मनाशीं परमावधीचा विस्मय करीत त्याची गांठ घेण्याच्या हेतूनें त्यानें घाईघाईनें आपली खोली गांठली. पण खोलीला कुलूप लागलेलें त्याच्या दृष्टीस पडलें, तेव्हां तर त्याच्या मनांतून एक विलक्षण शंका तरळून गेली. "शांतारामनं कांहीं भलतं सलतं तर केलं नसेल ना? मला भेटायला तो मंडपांत नाहीं आला तर निदान खोलींत तरी तो असायला पाहिजे होता."

स्वतःजवळच्या दुसऱ्या किल्लीनें त्यानें दार उघडलें आणि तो आंत गेला. खोलीचें स्वरूप होतें तसेंच होतें. टेबलावर पुस्तकें अस्ताव्यस्त पडून त्यांचा भला मोठा ढीग झाला होता. या ढिगावर विजेचा टेबलदिवा आला होता तो वारुळावर फणा उगारून राहिलेल्या नागासारखा दिसत होता. सुटे कागद इकडे तिकडे विखुरले होते. दौत उघडी होती, तिचें बूचहि आडवें पडलें होतें आणि पश्चिमेकडची खिडकी उघडी होती, तींतून सूर्याचे किरण आले होते, त्यांनीं सर्व खोलीला एक विलक्षण स्वरूप प्राप्त झालें होतें.

शांतारामची भानगड काय आहे त्याचा छडा लावलाच पाहिजे असा विचार करीत विद्याधर टेबलाजवळ गेला, तोंच त्याला शांतारामच्या हस्ताक्षरांत स्वतःचें नांव वर लिहिलेली चिठ्ठी दिसली.

आतां या चिठ्ठींत काय भयंकर वाचायला मिळणार आहे अशा विलक्षण उत्कंठेनें आणि धडधडत्या काळजानें त्यानें ती चिठ्ठी वाचायला सुरुवात केली :

**विद्याधर,**

काल रात्रीपासूनच्या माझ्या वागण्याचं तुला आश्चर्य वाटलं असेल, तूं माझ्यावर चिडला असशील. असशील कशाला, चिडला होतासच. पण मीं जें कांहीं केलं तें एका विशिष्ट हेतूनं केलं, मला

करावं लागलं. कारण, तसं करण्यावर तुझा परीक्षेतील निकाल, आणि पर्यायानं तुझा भविष्यकाळहि अवलंबून होता. ही पदवी-परीक्षा, यांत कोणतंहि विघ्न येणं अनिष्ट होतं. आणखी दुसरी एक गोष्ट गौण होती तरी सांगतों, तसं करण्यांत आपल्या कॉलेजच्या कीर्तीचाहि प्रश्न होता.

माझी ही सगळी यातायात एक बातमी तुला कळूं नये यासाठीं होती. तो हेतु पार पाडण्यासाठीं तुझ्या हातीं वर्तमानपत्र पडूं न द्यायची खबरदारी मला घ्यावी लागली. आपल्या क्लबांतल्या सगळ्या मुलांना आपण जेवायला जाण्याच्या आधीं जेवणं उरकून घेऊन जायला सांगावं लागलं. फार कशाला, तुझ्या राशीला सबंध दिवसभर बसून तुझी कुणाशींहि भेट होणार नाहीं अशी व्यवस्था करावी लागली. ती बातमी कळल्यानंतर तूं परीक्षेला बसला नसतास, किंवा बसला असतास तरी तुझे पेपर चांगले गेले नसते, तुला नुसतंच पास व्हावं लागलं असतं. ही सगळी खटपट अर्थातच मीं प्रिन्सिपल वर्तकांच्या आणि आपल्या मित्रमंडळीच्या सल्ल्यानंच केली.

ती बातमी म्हणजे परवांच्या आजारांत तुझ्या वडिलांचा काल सकाळीं सोलापूरला झालेला मृत्यु !

शांताराम

ता. क.—हें पत्र हातीं पडल्याक्षणींच प्रिन्सिपल वर्तकांच्या बंगल्यावर ये. मी तिथंच आहें.

शांताराम

१९४४

## टांगेवाला : : ६

हे: ! थंडी कसली भयंकर पडली होती ! गारठ्यानें सारी सृष्टि गोठून जाणार कीं काय असा भास होत होता, आणि रात्रीच्या प्रशांत वेळांत सर्व वस्तु निश्चल असल्यामुळें तर तो क्षण यायला सुरुवात झाली कीं काय अशी शंका येत होती. धुकें आधींच दाट पडलें होतें, पण तें चंद्रप्रकाशामुळें विशेषच दाट वाटत होतें. चंद्राचा प्रकाश निळा होता, तो थंडीची तीव्रता अधिकच वाढवीत होता. पोटाच्या आंतून कुठून तरी थंडीचे आघात शरीरावर होऊन सर्वांग थडथडत होतें आणि हातांपायांच्या बोटांना सहस्रावधि टांचण्या विलक्षण वेगानें कोणीतरी टोंचीत आहे असा भास होत होता.

वाटेंत कुठेंतरी स्टेशनवर जाणारा टांगा गांठावा या हेतूनें त्याच दिशेनें मी चालत होतों. पण अद्याप टांग्याचा मागमूसहि नव्हता.

सरतेशेवटीं फडक्यांच्या हौदापुढें गेल्यावर कसब्यांतून एक टांगा येत असतांना मला दिसला, म्हणून मी थांबलों. टांग्यांत एक ‘ स्वारी ’हि होती. आतां टांगा स्वस्त मिळणार म्हणून मी आनंदित झालों.

“ काय ! स्वारी आहे का टेसनची ! ” टांगेवाल्यानें विचारलें.

“ होय ! काय घेणार ! ”

“ बारा आणे घेईन ! ”

“ नक्की सांग ! ”

" वेळ रात्रीची आहे साहेब ! "

" ठाऊक आहे मला ! "

" अजून बरंच लांब जायचं आहे साहेब ! "

" तेंहि ठाऊक आहे मला ! "

" गाडीचा टाईम होत आला ना साहेब ! टांगा दामटावा लागेल ! "

" संथपणानं चालत जाऊन देखील गाडी गांठायची हिंमत आहे माझी ! "

" बरं मग— दहा आणे द्या साहेब ! "

" पांच आणे देईन ! चलणार असलास तर चल ! "

" पांच आण्यांत ओझेवाला तरी नेईल का तुम्हांला डोक्यावरनं साहेब ?"

टांगेवाल्याच्या या खट्याळ बोलण्यावर मी खूष झालों. तरी पण तो दहा आण्यांहून आणखी खालीं उतरणार याविषयीं मला शंकाच नव्हती. मीं म्हटलें, " चालूं लाग ! "

त्यानें टांगा चालू केला. पांचदहा पावलें गेल्यावर त्यानें तो थांबवला आणि ओरडून सांगितलें, " बरं चला साहेब, तुमचं नको, माझं नको, आठ आणे द्या ! "

" ठीक आहे." थंडीला वैतागल्यानें मी कबुल झालों.

मी टांग्यांत बसलों. टांग्याबरोबरच टांगेवाल्याची वटवट करणारी जीभहि चालू झाली.

त्यानें मालाचे आणि जीवनोपयोगी वस्तूंचे भाव भरमसाट वाढल्याचें गाऱ्हाणें गाइलें. मोटार बशी आणि आतांशा बरेचसे बोकाळलेले रिक्शे यांनीं टांगेवाल्यांच्या पोटावर पाय आल्याची तक्रार मांडली. रिक्शाला भांडवल कमी लागतें आणि एकाच माणसाच्या उदरनिर्वाहाचा प्रश्न असतो, त्यामुळें थोडया पैशांत ते ' भाडीं ' घेऊं शकतात, यावरून आपल्याला अर्थशास्त्रहि थोडथोडें कळत असल्याची जाणीव त्यानें आम्हांला करून दिली.

एवढ्यांत टांगा दारूवाल्याचा पूल ओलांडून पोलिस चौकीसमोर आला होता.

धुक्यांतून तेवढ्यांत आरोळी उमटली, " ए ऽ टांगेवाला ! "

लगाम खेंचून टांगेवाल्यानें टांगा आवरला, तशी घोडयाच्या टापांचा खडखडाट झाला आणि टांगा थांबला. जवळ येऊन पोलिसानें टांगेवाल्याकडे पाहत विचारलें, " बिल्ला कुठं आहे ? "

" कसब्यांतल्या पोलिसानं काढून घेतला, नाईकसाहेब ! "

" अन् नंबरपट्टी ? "

" ती पण काढून घेतली पोलिसानं नाईकसाहेब ! "

एवढ्यांत रस्त्यावरून जाणारे चारपांच जण काय गडबड आहे ती पाहण्यासाठीं टांग्याजवळ जमा झाले.

" लायसन बघूं ! "

टांगेवाल्यानें खिशांत हात घातला. त्यांतून काढून दुसऱ्या खिशांत घातला. नंतर तो काढून बऱ्याच जवळ आलेल्या पोलिसाला म्हटलें, " च्या मारी नाईकसाहेब ! मी खिशांत कशाला धुंडाया लागलों लायसन ! तें पण काढून घेतलन् माझं कसब्यांतल्या पोलिसानं ! "

" या लोकांना दुसरा टांगा गांठून दे अन् तूं गेटावर थांब इथं. चला नांवं सांगा तुमचीं ! "

आम्ही आपलीं नांवें सांगूं लागलों. तेवढ्यांत टांगेवाल्यानें पोलिसाच्या हाताला हात लावीत म्हटलें, " वा वा ! असं कसं नाईकसाहेब ! आतां या वखताला या लोकान्‌ला टांगा कुठून मिळणार ? मी यांना ठेसनावर पोंचवून लागलीच परत येतों. हा आत्तां आलोंच बघा ! "

तेवढ्यांत नाईकसाहेब गरजले, " तुम्ही तमाशगीर लोक कशाला थांबलां आहांत ? तमाशा आहे का इथं ? कांहीं कामंबिमं नाहींत का तुम्हांला ? चला, चालूं लागा आपापल्या रस्त्यानं ! नाहीं तर वहातुकीला अडथळा केल्याबद्दल फिर्याद ठोकीन ! "

आणि त्या आवाजांतच टांगेवाल्यानेंहि आपला मोठा आवाज काढला, " चलो, हटो बाजूसे ! लई उशीर झाला ! गाडी चुकेल आमची ! "

लोक बाजूला सरकले आणि टांगा भरधाव चालू झाला.

मग चाकांच्या धडधडाटांत टांगेवाल्याच्या गप्पा पुन्हा चालू झाल्या. कुठलं लायसन नि कुठलं काय ? एक होतं, तें हरवलं. गांवीं गेलेल्या दुसऱ्या एकाचं मिळवलं, पण तें फोटोमुळं ओळखूं आलं. म्हणून पूर्वीच पोलिसांनीं काढून घेतलं. आतां लायसनबिगरच टांगा चालवायची पाळी आली होती. पण रात्रीच्या वेळीं टांगा चालू ठेवला म्हणजे फारशी कटकट होत नाहीं. झालीच तर पोलिसाच्या 'हाताला हात लावून' निसटतां येतं!...

टांगेवाल्याच्या एकंदरींत अघळपघळ गप्पा आणि पोलिसाच्या हातावर चिरीमिरी देऊन सहीसलामत सुटण्याचें त्याचें कौशल्य पाहून मी आणि माझा सहप्रवासी त्याच्यावर खूष झालों होतों.

स्टेशनच्या आवाराशीं आल्यावर टांगेवाल्याला मीं आठ आणे दिले. माझ्या सहप्रवाश्यानेंहि आठ आणे दिले. टांगेवाला निघून गेला.

मीं विचारलें, "तुम्हांला कुठं जायचं ?"

सहप्रवाशानें उत्तर दिलें, "मिरजेला ! तुम्हांला ?"

"मुंबईला ! दुसरी गाडी !"

तिकिट काढण्यासाठीं तो पलीकडच्या बाजूला जात होता. त्याला मीं म्हटलें, "आजचा टांगेवाला मात्र भला भेटला बुवा ! एवढं देखील न गांगरता त्यानं कसल्या शिताफिनं पोलिसाला गप्प केलं !"

"तर काय !"

मी म्हणालों, "पण असला लटपट्या माणूस बघितल्यानंतर मनांत शंका येते, आपण इतका वेळ याच्या संगतींत होतों, तेव्हां आपल्याला तर यानं लुंगवलं नसेल ! होय कीं नाहीं ?"

माझा सहप्रवासी कांहींच बोलला नाहीं.

"तुम्हांला नाहीं तसं वाटत ?" मीं पुन्हा विचारलें.

माझ्या सहप्रवाशानें उत्तर दिलें, "इतर वेळचं मला ठाऊक नाहीं, पण या वेळीं तरी तुमची शंका खरी आहे !"

"म्हणजे ? ती कशी काय ?" अत्यंत चकित होऊन मीं विचारलें.

"कारण, त्यानं तुमच्याकडून आठ आणे घेतले, पण तुमच्या आधीं मी बसलों होतों तरी पांच आण्यांतच इथपर्यंत आलों मी !"

"म्हणतां काय ! अहो, पण तुम्ही तर त्याला माझ्यादेखत आठ आणे दिलेत."

"होय, ते खरं ! पण तुमच्याशीं आठ आणे ठरून तुम्ही टांग्यांत बसायला येत होतां, तेवढ्यांत त्यानं माझ्या हातांत तीन आणे सारले नि सांगितलं, 'साहेब, ठरलेलं गिऱ्हाईक आतां घालवूं नका !' मला त्याला 'नाहीं' म्हणवेना."

१९४४

## चार भिंतींत : : ७

शाळेच्या आवारामध्यें अंगण असल्यास अंगणांत, चौक असल्यास चौकांत, मधल्या सुट्टीच्या वेळीं शाळेंतील मुलें दंगामस्ती, धक्काबुक्की, पडापड, धावपळ यांची धामधूम उडवून खूपच दंगल माजवून देतात. या वेळची मुलांची अतिशय वेगांत होणारी ती हालचाल पाहून त्यांना कुणी जगड्व्याळ अदृश्य प्राणी आपल्या प्रचंड हातांनीं जणूं एके ठिकाणीं भराभरा कालवीत आहे असें वाटतें.

तथापि, मधल्या सुट्टींतला हा गलगा मधल्या चौकांतच किंवा अंगणांतच चालतो असें समजण्याचें कारण नाहीं. शिक्षकांच्या बैठकींतहि तेवढाच गलगा चालू असतो. फरक फक्त एवढाच, कीं चौकांत गलगा करतांना मुलें धडपडत कोलमडत असतात, तर शिक्षकांच्या बैठकींत मात्र जवळजवळ सारे जण आरामखुर्चीत किंवा लोडाशीं ऐसपैस पसरलेले असतात आणि त्या अवस्थेतच त्यांचा आरडाओरडा चालू असतो.

७ सप्टेंबर १९२९ या दिवशींहि शिक्षकांच्या बैठकींत अशाच प्रकारें गलगा चालू होता.

"विष्णुपंत, आतां तास किती आहेत रे तुला?" सामंत मास्तर विचारीत होते.

"काय करूं रे! चांगली सुरेखशी झोप काढायचं मनांत होतं! पण

तिन्ही तास आहेत ना पुढचे कोटाच्या कॉलरसारखे मानगुटीवर बसलेले! आणि तुला?" विष्णुपंत खरे म्हणाले.

"खरं म्हणजे मला दोन तास मोकळे होते, पण बागेंत आराम करीत बसलं असतांना डोक्यांत कावळ्याची शीट पडावी, त्याप्रमाणं 'चट' येऊन पडला ना हातांत! चौथी–सी. कांहीं संबंध नाहीं बघ त्या वर्गाचा. अनोळखी वर्गावर तास घ्यायला जायचं म्हणजे आपली भाषा येत नसलेल्या बायकोशीं लग्न झाल्यागत वाटतं बघ! काय, जमताहेत कीं नाहींत तुझ्या-सारख्या उपमा?" सामंत हंसत हंसत म्हणाले.

"जमताहेत म्हणजे काय! अगदीं उत्तमच!" करीत विष्णुपंत खरे डोळे मिचकावीत पुढें कांहीं बोलणार होते, पण तेवढ्यांत त्यांच्या डोक्यावर शहाणे मास्तरांनीं आपल्या हातांतलें पुस्तक हाणलें आणि म्हटलें, "लेको, युरोपांत युद्ध सुरू होऊन रोज हजारों माणसांची आहुति रणकुंडांत पडायला सुरुवात झाली आहे अन् तुम्हांला इथं आचरट कोट्या सुचताहेत. शरम वाटली पाहिजे!

विष्णुपंत एकदां खदखदून हंसून म्हणाला, "महाराज, युद्ध सुरू झालं असलं तरी तें युरोपांत. इथं त्याचा आमचा, मास्तर आणि श्रीमंती यांच्या-प्रमाणंच, अर्थाअर्थीं काडीइतकाहि संबंध नाहीं."

"असं कसं म्हणतोस विष्णुपंत! अरे, तिकडे दिल्लीला बड्या लाट-साहेबांनीं हिंदुस्थानच्या वतीनं युद्ध पुकारलं सुद्धां!"

"अरे! या शहाण्याचं डोकं कुणी तरी तपासा रे! हा तर राजकारण बडबडूं लागला! राजकारण हा आपला विषय नव्हे म्हटलं राजश्री! विद्यार्थ्यांनीं ज्याप्रमाणं राजकारणाचा विचार करणं वर्ज्य मानायचं असतं त्याप्रमाणं मास्तरांनींहि! काय शेंबेकर?" विष्णुपंत खऱ्यांनीं शाळेंत यंदा नवीनच आलेल्या शिक्षकाला विचारलें.

"शेंबेकर नव्हे, जांभेकर!" शहाणे म्हणाले.

"बरं, जांभेकर तर जांभेकर, पण माझ्या प्रश्नाचं उत्तर द्या!"

"या व्यवसायांत मी नवीनच आलों आहें, मला काय उत्तर देतां येणार यावर? त्यांतून राजकारण हा माझा विषयहि नव्हे नि त्याचा अभ्यास करण्याची मला जरूरीहि वाटली नाहीं."

" तुम्ही विषय कोणते शिकवतां ? " शहाण्यांनीं विचारलें.

" त्यांच्या विषयांचं नको विचारूंस ! कांचेचं सामान खोक्यांत भरलं म्हणजे उरलेल्या जागेंत गवतपेंढा भरतात त्याप्रमाणं बाकीच्या लोकांचीं वेळापत्रकं तयार झाल्यावर उरलेल्या विषयांचं भरताड उरलेल्या तासांच्यावरून यांच्या माथीं मारलं आहे ! बरोबर आहे ना ? नवीन आलेल्या शिक्षका, हाय ! " विष्णुपंत खरे म्हणाले.

" अरे, परंतु त्याला तर बोलूं दे ! " शहाणे म्हणाले.

" पण मी कुठं त्याला अडवतों आहें ? बोलूं दे कीं तो ! हं, बोल रे बाबा, आंबेकर, बोल ! " विष्णुपंत खरे म्हणाले.

" आंबेकर म्हणजे जांभेकर ! " शहाणे म्हणाले.

" अरेच्या ! माझी जीभ छापखान्यांतल्या जुळाऱ्याप्रमाणं भलभलत्या चुका करायला लागली कीं ! " विष्णुपंत खरे म्हणाले.

" पण हें नवीन आहे का आम्हांला ? वांकड्या वाहणाऱ्या नदीला कांठाकांठांनीं बांधीव तट उभे करून ती सरळ वाहती करतां येईल, पण वांकड्या वाहणाऱ्या जिभेवर कांहीं उपाय नाहीं ! " सामंत म्हणाले.

" विष्णुपंत, तुम्ही असं करा, दररोज तुमच्या जिभेला दहा दहा पट्ट्या, विड्यांचीं दोन बंडलं आणि भरपूर तमाखू चारीत जा म्हणजे तिच्यावर एखादा त्रस्त समंध बसला असला तर तो शांत होईल." जोशी मास्तर म्हणाले.

विष्णुपंत खरे एकदां अगदीं खदखदून हंसले, त्या वेळीं कुठल्यातरी यंत्रांतली फिरवून ताणलेली कमान सुटून उलगडल्याचा भास झाला. ( ही त्यांची स्वतःचीच उपमा. ) नंतर ते म्हणाले, " सारेच गाढव आहांत लेको तुम्ही ! गाडी सांधा चुकून भलत्याच रुळावर गेली तरी भान नाहीं तुम्हांला ! तुमचं चाललं होतं काय, नि तुम्ही वळलां आहांत कुठं ! "

सामंत म्हणाले, " पण अकलेच्या कांद्या, गाडी भलतीकडे वळवलीस तूंच ! आणि पुन्हा तूंच बोलतो आहेस हें ! "

" अर्थात् ! मुद्दामच वळवली मीं ती ! हा शहाणे राजकारणाच्या गोष्टी करायला लागला. शाळेच्या चार भिंतींत राजकारणाची चर्चा होऊं नये असं माझं प्रामाणिक मत आहे." विष्णुपंत खरे म्हणाले.

"कां होऊं नये राजकारणाची चर्चा ?"

"अरे कसलं राजकारण घेऊन बसलांत ? निर्जन आणि रुक्ष माळावर आरडत राहावं त्याप्रमाणें शाळेंत दिवसभर किंचाळून किंचाळून कंठशोष करून घ्यायचा नि जो कांहीं उरलासुरला वेळ असेल तेवढ्या वेळांत मठ्ठ मुलांच्या पुढं उरस्फोड करीत सांगायचं काय, तर कधींच न बघितलेल्या 'तंद्रा' प्रदेशाचं हवामान, परक्या भाषेच्या व्याकरणाचे अनियमित नियम किंवा पोरांना कधींच उपयोगी न पडणाऱ्या परोक्षभूत, भविष्यकाळ, संकेतार्थ असल्या चमत्कारिक कालार्थांचीं रूपं...चरकांत पुढचं टोक सांपडलेल्या उसाला आपला शेवट कसा होणार आहे याची कल्पना कधींच..."

शहाणे म्हणाले, "खरे, स्वतःच्या आयुष्याबद्दल तुला काय वाटत असेल तें वाटो, पण असं कडू बोलून या नवीन आलेल्या लोकांना तूं नाउमेद करावंस हें चांगलं नाहीं !"

विष्णुपंत खरे उद्विग्न हास्य करून म्हणाला,

"नाउमेद ! अरे, आपण उमेदीचे लोक असतों, राजकारणांत भाग घ्यायची आपली हिंमत असती, तर आपण शाळेंतले मास्तर कशाला झालों असतों ?"

शहाणे म्हणाले, "छे छे ! विष्णुपंत, तुझ्याशीं आतां अधिक बोलण्यांत अर्थ नाहीं !" नंतर जांभेकरकडे वळून ते म्हणाले, "जांभेकर, आमचा विष्णुपंत खरे आहे तसा चांगला. पण आयुष्याकडे पाहण्याची त्याची दृष्टि वृथावाद्याची आहे. त्याच्या बोलण्यावर तुम्ही जाऊं नका. पण तुम्हांला दसलाखाची एक गोष्ट सांगतों. राजकारणांत भाग घ्या किंवा न घ्या, कारण, तो प्रत्येकाच्या घरच्या परिस्थितीचा, स्वतःच्या हिंमतीचा, किंवा आपल्या उराशीं जतन करून ठेवलेल्या ध्येयनिष्ठेचा प्रश्न आहे. परंतु भोंवतालच्या जगांत राजकारण कोणत्या प्रकारचं शिजतं आहे, आपल्याला कोणत्या प्रकारची समाजरचना हवी आहे आणि तें राजकारण त्या दिशेनं जातं आहे कीं नाहीं हें समजून घेणं मात्र प्रत्येकाला आवश्यक आहेच आहे."

जांभेकर म्हणाला, "पण खरंच सांगतों, शहाणे, राजकारण कशाशीं

खातात त्याची मला मुळींच माहिती नाहीं ! आणि त्याचा विचार करण्याची मला कधीं जरूरहि भासली नाहीं."

"आजच्या तरुणानं असं म्हणून चालत नाहीं, जांभेकर ! माहिती नसेल, तर ती करून घेतां येईल. आपण शिक्षक आहोंत. विष्णुपंतानं शिक्षकाला जितकं कःपदार्थ लेखलं तितकं आपण लेखतां कामा नये."

विष्णुपंत म्हणाले, "अरे चल ! तुला काय सांगतो तो ! शिक्षक आहोंत म्हणे शिक्षक ! शिक्षक म्हणजे काय ? ठाऊक आहे ? शिक्षक म्हणजे डबकं, शिक्षक म्हणजे निरुपयोगी ज्ञानाची पोई, शिक्षक म्हणजे खिडक्या नसलेलं घर, शिक्षक म्हणजे तळघरांतली अडगळ, शिक्षक म्हणजे समाजाच्या सायकलींची चिखलपट्टी, शिक्षक म्हणजे दगड, माती कचरा..."

सामंत एकदम म्हणाले, "अरे अरे अरे ! जीव गुदमरून गेला ! विष्णुपंत, उपमांची तूं ही एवढी आतषबाजी कशाकरतां चालवली आहेस ? लोकांनीं आपल्याला प्रति वि. स. खांडेकर म्हणावं अशी अपेक्षा आहे कीं काय तरी तुझी ?"

विष्णुपंत म्हणाले, "खांडेकर ! तो कसल्या देतो उपमा ! त्याचा खाक्या म्हणजे समोर दिसेल त्या वस्तूची उपमा ठोकून द्यायची आधीं ! आणि पाठीमागनं मग साम्य हुडकीत बसायचं !"

विष्णुपंताच्या ह्या विलक्षण बोलण्यावर सगळे जण खदखदून हंसले.

हंशा ओसरल्यावर सामंत म्हणाले, "पण हें करायचं म्हणजे सुद्धां सोपं काम नाहीं. त्यांत सुद्धां एक प्रकारचं विशेष कौशल्य आहे म्हणूनच..."

सामंतांचें वाक्य अर्धवट चालू असतांनाच मधली सुट्टी संपल्याची घंटा झाली आणि वाङ्मयाच्या प्रांतांत शिरूं लागलेली त्यांची गाडी अडवली गेली. चौकांत दंगा करणारी मुलें आपापल्या वर्गांत निघून गेलीं. इतका वेळ त्यांचा जो गलगा चालू होता त्याऐवजीं आतां मधमाशांच्याप्रमाणें एक प्रकारचा विशिष्ट गुंजारव सबंध शाळेंतून ऐकूं येऊं लागला. थोडयाच वेळांत सकाळच्या वेळीं झाडांतून बाहेर पडणाऱ्या पक्ष्यांप्रमाणें आपापल्या वर्गांवर जाण्यासाठीं शिक्षक बैठकींतून बाहेर पडूं लागले.

जांभेकरला हा तास मोकळा होता. आरामखुर्चीवर पडून विष्णुपंत खरे आणि शहाणे यांच्या बोलण्याचा विचार करीत तो रेलला होता.

राजकारणाचा अभ्यास करावयाची जरूरी आहेच का? आपले शिकवायचे विषय संस्कृत आणि मराठी. ते चांगले शिकवतां आले कीं पुरे झालें! राजकारणाच्या माहितीवांचून त्यांत कांहीं अडथळा येण्याचा संभव नाहीं. आणि समजा राजकारणाचा अभ्यास करायचाच असला, तर तो करायचा म्हणजे काय करायचें? त्यासाठीं इतिहास आणि भूगोल यांचें ज्ञान आवश्यक असणार, पण आपले ते विषय तर आपण स्वतः शाळेंत असल्यापासून कच्चे!

विद्यार्थिदशेंत असतांना जांभेकर याच शाळेंत होता. हेच विष्णुपंत खरे तो सहावींत असतांना त्याचे वर्गशिक्षक होते आणि प्रत्येक परीक्षेनंतर त्यांना त्याचा इतिहास-भूगोल हा विषय कच्चा असलेला दिसून येई आणि याच विष्णुपंतांकडून त्याबद्दल त्याला बोलणीं खावीं लागलेलीं होतीं.

पण कोणत्याहि विषयाचा अभ्यास करायचा म्हणजे त्याची आवड तरी पाहिजे! आणि ती या ठिकाणीं आणायची कुठून? कीं कोणतीहि आवड आरंभीं प्रयत्नांनीं निर्माण करावी लागते, हा सिद्धान्त राजकारणाच्या बाबतींतहि खरा धरायचा?

परंतु जांभेकरला याप्रमाणें विचार करायला फारसा वेळ मिळाला नाहीं. कारण, तेवढ्यांत शाळेचा गडी धावत धावत आला आणि त्यानें त्याच्या हातीं एक छोटी चिठ्ठी आणून दिली. त्याला 'चटा' वर जाणें भाग होतें. त्या चिठ्ठीवर त्यानें एकदां दृष्टि टाकली. कोऱ्या जागा हातानें लिहून भरलेली ती छापील चिठ्ठी होती.

रा. रा. जांभेकर यांस—

आज ५ व्या तासाला ६ वी–डी या वर्गावर श्री. वाळिंबे यांच्याऐवजीं कृपा करून कांहीं पाठ घेणें.

ता. ७–९–३९ प्रमुख

हा वर्ग जांभेकराच्या परिचयाचा नव्हता, एवढेंच नव्हे तर सहावी-सातवीच्या वर्गावर अद्याप कधीं तो गेला नव्हता. त्याला मघांची सामंत मास्तरांची उपमा आठवली आणि हंसूं आलें.

पांचवा तास केव्हांच सुरू झाला होता, तेव्हां वर्गावर ताबडतोब जायला हवें होतें. वर्गात गेल्यावर एखाद्या मुलाजवळून मराठीचें पुस्तक मागून घेऊन एखादी कविता, नाहीं तर न झालेला एखादा सुरेखसा गोष्टीरूप धडा घ्यावा असा विचार करीत जांभेकर वर्गात गेला. सहावीच्या मानानें मुलें वयानें मोठीं असावींतसें दिसत होतें. लहान मुलें अपवादात्मक एकदोनच दिसत होतीं आणि वर्गात शांतता असावी तेवढी नव्हती.

" सर, नांव सांगा ! " सर्व मुलांनीं एकमुखानें मागणी केली.

" हरिचंद्र जांभेकर ! " जांभेकरानें उत्तर दिलें.

" अस्सं, अस्सं ! " एक खोंचक आवाज आला.

हास्य करून जांभेकरनें त्या ' अस्सं ' ची खोंच कमी करायचा प्रयत्न केला. नंतर सर्व वर्गाला उद्देशून तो म्हणाला, " तुमच्यापैकीं कुणीतरी मराठीचं पुस्तक द्या ! "

" नको, नको सर, आम्ही आपले स्वस्थच बसतों ! " एक मुलगा म्हणाला.

" आणखी सर, आज मराठीचा तासच नाहीं, तेव्हां कुणाकडेच मराठीचं पुस्तक मिळायचं नाहीं ! " दुसरा मुलगा म्हणाला.

" सर अभ्यास कशाला घेतां आज? अभ्यास आहेच कीं रोज ! " तिसरा मुलगा म्हणाला.

" मराठीच्या पुस्तकांतली तुमची न झालेली एखादी कविता घ्यायचं माझ्या मनांत आलं होतं ! " जांभेकर म्हणाला.

" नको, नको, सर ! त्यापेक्षां युद्धाची माहिती सांगा आम्हांला."

" युद्धाची कोणत्या प्रकारची माहिती ? " जांभेकरनें विचारलें.

" हें युद्ध कशासाठीं सुरू झालं ? इंग्लंडनं हिटलरच्याविरुद्ध बाजू कां घेतली ? याच्याविषयीं कांहींतरी माहिती सांगा सर ! " मघांचा मुलगा म्हणाला.

" होय सर ! सांगा ना सर ! " आणखी तीन चार आवाज आले.

' सांगा ' च्या या कांगाव्यामुळें जांभेकर अगदीं दिङ्मूढ होऊन गेला. आपलें सारें स्मृतिभांडार खरवडून या प्रश्नांचीं उत्तरें शोधण्याचा त्यानें प्रयत्न केला, पण जर्मनीनें पोलंडवर आक्रमण केलें, आणि त्यामुळें इंग्लंडनें

जर्मनीविरुद्ध युद्ध पुकारलें एवढ्या एका गोष्टीखेरीज अधिक कोणतीच माहिती त्याला सांपडेना. आणि सांपडेना म्हणजे आठवतच नव्हती असें नव्हे, तर मुळांतच तिच्या खेरीज अधिक माहिती त्याच्या संग्रहीं नव्हती. युरोपच्या राजकारणांत हरघडी दृष्टीपुढें येणारीं हिटलर, चेंबरलेन इत्यादि नांवें त्याला आठवत होतीं. पण फक्त तीं नांवेंच. युरोपमध्यें त्यांनीं काय केलें यासंबंधांत तो अगदीं कोरा होता.

समोर एक लहानसा चुणचुणीत मुलगा दिसला, त्याला त्यानें विचारलें, " हिटलरविषयीं तुला काय माहिती आहे ? "

आपल्याला आतां कांहींतरी ऐकायला मिळणार या अपेक्षेनें मुलें किंचित् स्तब्ध आणि एकाग्र झालीं.

ह्या चुणचुणीत मुलानें उत्तर दिलें, " शहाणे सर आम्हांला जर्मन शिकवतात, त्यांनीं हिटलरचं लेबेन्स्राऊमचं तत्त्व आणि ड्रांग नाख ओस्टेनचं धोरण याविषयीं माहिती सांगितली आहे."

जांभेकर हे शब्द आयुष्यांत प्रथमच ऐकत होता. त्यानें विचारलें, " म्हणजे काय ? "

" लेबेन्स्राऊम म्हणजे रहायला पुरेशी जागा. जर्मनींत लोकांना पुरेशी जागा नाहीं म्हणून हिटलरनं हें तत्त्व पुढं मांडलं आणि त्यासाटीं ड्रांग नाख ओस्टेन म्हणजे पूर्वेकडील प्रांतावर आक्रमण करून ते व्यापण्याचं धोरण आंखलं."

त्या मुलाचें हें बोलणें मुलांना समजलें होतें कीं नाहीं, या तात्त्विक गोष्टीविषयीं त्यांना औत्सुक्य होतें कीं नाहीं कुणास ठाऊक. जांभेकरला मात्र तें ऐकून स्वतःच्या अज्ञानाची स्थिति इतक्या विदारकपणें दिसून आली, कीं तो कुठल्यातरी अगदीं गूढ विषण्णतेंत मग्न होऊन समोर पाहत निश्चलपणें खुर्चींत बसून राहिला आणि मुलांचा गोंगाट हळुहळू वाढत चालला होता तरी तो जणुं चाललाच नव्हता इतक्या निर्विकारपणें सहन करीत राहिला.

पण थोड्याच वेळांत तो जागा झाला आणि शेजाऱ्यांशीं बोलत असलेल्या एका मुलाला गप्प राहण्याची सूचना करण्याच्या हेतूनें त्यानें त्या मुलाचें आपल्याकडे लक्ष वेधून घेतलें आणि विचारलें, " तुझें नांव काय ? "

त्यानें चटकन् उत्तर दिलें, " जांभेकर ! "

सर्व मुलें खद्खदलीं. जांभेकर अधिकच गांगरला.

तेवढयांत कुठून तरी शब्द आले, " सर, युद्धाविषयीं कांहींतरी माहिती सांगा ना ! "

" छे छे ! सहामाही परीक्षा आतां जवळ आलेली आहे. तुम्ही कांहीं-तरी अभ्यास करीत बसा."

जांभेकरनें हें म्हटलें खरें, पण आपल्या या म्हणण्यांत कांहींच अर्थ नाहीं हें त्याला स्वत:लाच समजत होतें. नवीनच सुरू झालेल्या युद्धाविषयीं मुलांच्या मनांत कुतूहल असणें अगदीं साहजिक होतें. पण त्याचबरोबर मुलें त्याला कोंडींत पकडण्यासाठीं युद्धाविषयीं माहिती विचारीत होतीं हेंहि तितकेंच खरें होतें. ती माहिती पुरवून त्याला कोंडीच्या बाहेर पडतां आलें असतें. युद्धाविषयीं अगदीं स्थूल मानानें गप्पा मारीत त्यानें वेळ काढण्याचा प्रयत्न केला असता तरी मुलें गप्प बसलीं असतीं. त्यांचें समाधान झालें असतें. तासहि संपून गेला असता. ही गोष्ट त्याला स्पष्टपणें दिसत होती, पण कांहीं उपयोग नव्हता. कोंडींतून बाहेर पडण्याचा मार्ग त्याला उपलब्ध नव्हता. तो सर्वस्वी अगतिक झाला.

कुठल्यातरी बाकावरून खळकन् कंपासपेटी कोसळली. एका कोपऱ्यांत दोनचार पैसे खणखणले आणि एका ठिकाणीं तर दोघां मुलांत चक्क मारामारी सुरू झाली.

जांभेकर आपल्या जागेवरून उठला आणि त्या ठिआणीं गेला. " काय चाललं आहे रे ? " दरडावणीच्या स्वरांत त्यानें विचारलें.

मारामारी करणाऱ्यांपैकीं एकानें उत्तर दिलें, " सर, मघांपासून हा मला चिडवतो आहे ! "

" चिडवतो आहे ! काय चिडवतो आहे ? "

" ढबू कांकडा चळ्ळम् चळ्ळम् ! "

" काय ? "

" ढबू कांकडा चळ्ळम् चळ्ळम् ! "

सर्व वर्ग एकमुखानें खदखदून अगदीं ढवळून निघाला.

" म्हणजे काय रे ? " जांभेकरनें प्रतिपक्ष्याला प्रश्न केला.

प्रतिपक्ष्यानें उत्तर दिलें, " गुबगुबीत नि लठ्ठ मुलांना असंच म्हणत असतों आम्हीं, सर ! "

जांभेकरला आपल्या मनाचा तोल सावरणें आतां कठीण होऊं लागलें. हें बोलणाऱ्याच्या पाठींत त्यानें दणका घातला.

सबंध वर्गाच्या चारी उंच भिंतींतून तो घुमला आणि त्याच क्षणीं सर्व वर्गानेंहि एकसमयावच्छेदेंकरून उच्चार केला, " घुम्म् ! "

चमकून जांभेकर वळला आणि सर्व वर्गाकडे त्यानें दृष्टि टाकली. प्रत्येकजण त्याच्याकडे पाहत होता. त्याची दृष्टि सर्वांच्या दृष्टीला भिडल्याबरोबर सर्व वर्गांत एकच हंशा पिकला. आणि हंशाची ती उकळी ओसरते आहे तोंच दूरच्या कोपऱ्यांतून तीक्ष्ण असा मांजराचा ' म्यांवकार ' निघाला.

हताशपणाची तिरिमिरि येऊन जांभेकरनें मुलांना शांत करण्याचा शेवटचा एक वेडगळ प्रयत्न केला. दोन बाकांच्या रांगेमधून चालतांना दोन्ही बाजूंच्या मुलांच्या पाठींत क्रमाक्रमानें एक एक दणका घालायला त्यानें सुरुवात केली. पोस्टांतल्या माणसानें पत्रांवरून लागोपाठ शिक्के मारीत राहावें तशी त्याची ती क्रिया भासली.

पण यानंतर परिस्थिति मात्र अगदींच चिघळली. कारण, गलगा, हंशा आणि विविध प्राण्यांचे आवाज अगदीं कळसाला पोंचले. मुलें आतां आपल्या आंवाक्याबाहेर गेलीं आहेत हें जांभेकरला पूर्णपणें कळून चुकलें. त्यानें मनगटावरील घड्याळाकडे दृष्टि टाकली. तास संपायला अद्याप वीस मिनिटांचा अवधि होता. म्हणजे हें दिव्य आतां आपल्याला वीस मिनिटें भोगावें लागणार आणि हें दिव्यहि अशा प्रकारचें, कीं त्यांतून आपलें रक्षण करणारा कोणीच भेटणार नाहीं. त्याच्या हातांपायांतली शक्ति नष्ट झाली. आपलें अंग त्यानें खुर्चींत टाकून दिलें आणि वर्गाच्या खिडकींतून बाहेर पाहायला सुरुवात केली. शाळेच्या आवारांत अशोकाचा एक उंच वृक्ष होता आणि तीन प्रहरच्या उतरत्या उन्हांत त्याचीं कुरळीं कुरळीं पानें मंदपणें हलून लकाकत होतीं.

पण काय चमत्कार! कशानें कुणास ठाऊक, मुलें एकदम गप्प झालीं. म्हणून चमकून मान वळवून जांभेकर बघतो तों सगळीं मुलें उभींहि राहिलीं. हाहि एक खोडसाळपणाचाच प्रकार आहे कीं काय ही शंका मनांत तरळून जात असतांनाच त्याची दृष्टि दाराकडे गेली.

शाळेचे प्रमुख वर्गांत शिरत होते.

सुटका झाल्याच्या समाधानाचा एक दीर्घ निःश्वास त्यानें टाकला. पण त्याच वेळीं आपल्या दुर्बलतेचीहि त्याला मनस्वी खंत वाटली.

" जांभेकर. मी घेतों उरलेला वेळ या वर्गावर! तुम्ही गेलांत तरी चालेल!" प्रमुख म्हणाले.

मोठ्या तत्परतेनें पण तेवढ्याच कष्टानें त्यानें वर्गाबाहेर पाऊल टाकलें आणि बैठकीच्या दिशेनें तो चालूं लागला.

वाटेंत त्याला शहाणे भेटले.

" जांभेकर, आतां गलगा चालू होता तो तुमच्याच वर्गांत काय?"

" हूं!" जांभेकरनें एकाक्षरी उत्तर दिलें.

" काय हवं होतं मुलांना?"

" युद्धाविषयीं माहिती!"

" मग कां नाहीं सांगितलीत?"

जांभेकरनें कांहींच उत्तर दिलें नाहीं.

" तुम्हांला एक सूत्र सांगून ठेवतों, जांभेकर! आजकालच्या मुलांना मास्तरांनीं सांभाळून घ्यावं लागतं! छडी पूर्वीच्या काळीं उपयोगी पडत असेल, पण आतां ते दिवस गेले, आणि पुन्हां येण्याची आशाहि (किंवा भीतीहि म्हणा हवी तर) नाहीं. आतांचीं मुलं अधिक शहाणीं असतात. त्यांना जगाविषयीं सामान्यपणानं जिज्ञासाहि अधिक असते."

जांभेकरनें 'हूं' केलें आणि विचारलें, " कुठं चाललां होतां तुम्ही?"

" वर! ग्रंथालयांत!"

" चला! मीहि येतों." जांभेकरनें म्हटलें आणि शहाण्यांच्याबरोबर जिन्याच्या पायऱ्या भराभरा चढण्यास सुरुवात केली.

१९४५

## निढळाच्या घामावर : : ८

पंढरपूर नगरपालिकेच्या इमारतींतून घनश्याम बाहेर पडला त्या वेळीं त्याचें हृदय केवढ्या अभिमानानें आणि समाधानानें भरून आलें! आपल्या कोटाच्या आंतल्या खिशांत त्यानें एकदां हात घातला आणि आंतले पैसे बाहेर काढले. छन्! छन्! छन्! खणखणीत तीन रुपये. एकदां हात ताठ धरून त्यानें ते पैसे जोखल्यासारखें करून पाहिलें. किती जड, अगदीं शिशाचे केल्यागत जड लागत होते ते!

शिशाचे नसतांनाहि ते असे जड लागावेत त्याला कारण होतें. ते पैसे घनश्यामनें स्वतःच्या श्रमावर, निढळाच्या घामावर मिळविले होते. जड लागणारे ते तीन रुपये घनश्यामनें मग परत आंतल्या खिशांत ठेवून दिले आणि हात बाहेर काढला. तो काढतांना त्याच्याचबरोबर आपल्या हृदयांत पुष्कळ दिवसांपासून सलत असलेलें शल्यहि जणुं त्यानें काढून टाकलें. त्या शल्याची आठवण त्याला मनस्वी तापदायक होती. लहान मुलांच्या मनांत कुणीहि, प्रत्यक्ष आईनें सुद्धां, केलेला अपमान, पाणउतारा पुष्कळ दिवस खुपत राहतो.

* * *

दोन वर्षांपूर्वींची गोष्ट होती ती.

घनश्यामनें आपल्या एका मित्राकडे असलेलें ' श्यामची आई ' हें पुस्तक वाचलें. त्याला तें अतिशय आवडलें. अतिशय म्हणजे इतकें, कीं त्यांतला सर्वांत चांगला वाटलेला भाग पुन्हा पुन्हा वाचण्याचा आनंद उपभोगायला मिळावा या इच्छेनें त्यानें तें विकत घ्यायचें ठरवलें. शाळेंतला मुलगा तो. त्याच्याजवळ पैसे कोठून असणार ? आपल्या आईकडे त्यानें पैसे मागितले, " आई, मला एक पुस्तक घ्यायचं आहे, पैसे देशील ? "

" कोणतं पुस्तक ? नांव काय त्याचं ? पैसे किती हवे आहेत ? " आईनें त्याला विचारलें.

" श्यामची आई ! दीड रुपया ! " घनश्याम म्हणाला.

" कुणाचं आहे तें ? "

" साने गुरुजींचं. "

" कोण आहेत हे साने गुरुजी ? तुझ्या शाळेंत आहेत का ? आणखी, तुझ्या अभ्यासाला नेमलं आहे का तें पुस्तक ? "

" नाहीं ! अभ्यासाला नाहीं नेमलं तें ! पण आई, मला तें फारच आवडलं आहे."

" आवडलं आहे म्हणतोस, म्हणजे, तूं तें वाचलेलं असलं पाहिजे."

" होय आई, पण मीं वाचल तें दुसऱ्याचं. मला स्वतःचं पुस्तक हवं आहे."

" श्याम, आपल्या घरांत कुणी मिळवतं आहे का ? विहिरींत नवीन पाणी न येतां तिचा नुसता उपसाच होत राह्यला तर ती कोरडी नाहीं का पडायची ? त्यांतून हें पुस्तक तुझ्या परीक्षेला नेमलेलं नाहीं."

" आई, पण मागं एकदां मी तुला विचारलं होतं, कीं आपलं चालतं कसं ? तर तूं म्हणाली होतीस, कीं वडिलांनीं आपल्याला खायला पुरेसं ठेवलेलं आहे."

" होय श्याम, पण तें खायला."

" आई, परंतु दीड रुपया म्हणजे फार आहे का ग ? "

" फार नाहीं. पण एकदां दिडानं सुरवात झाली, कीं त्याचे दीडशें व्हायला वेळ लागायचा नाहीं."

" आई, असं काय बोलतेस ? पुस्तक घेणं म्हणजे व्यसन का आहे ? "

" होय श्याम, तेंहि एक व्यसनच आहे. तुझ्या वडिलांनाहि हेंच व्यसन होतं. भारंभार पुस्तकं घेतलीं त्यांनीं. माणसाला काटकसरीनं खर्च करतां यायला हवा."

" आई, पण..."

" पण बीण कांहीं नको ! खरं सांग, या पुस्तकावांचून तुझें अगदीं अडणार आहे का ? "

" अडणार आहे असं नाहीं .."

" मग तें तूं घेऊं नकोस ! " आई म्हणाली.

" असं काय पण आई ! "

" मी सांगतें आहें तें तुझ्या हिताचंच आहे बरं, श्याम ! "

श्याम गप्प झाला. परंतु त्याच्या मनाला आईचें म्हणणें पटलें होतें म्हणून नव्हे, तर त्याच्या मनाला तीव्र जखम झाली होती म्हणून. वास्तविक पाहतां पुस्तक विकत घेण्याला नकार देण्यांतला आईचा हेतु घनश्यामला वायफळ खर्च करण्याची संवय लागूं नये हा होता. परंतु त्या नकाराचा परिणाम मात्र झाला निराळाच. घनश्यामचें मन कष्टी झालें आणि त्याच्या मनांत तें एक कायमचें शल्य खुपत राहिलें. आईच्या बोलण्यावरून तो गप्प झाला त्या वेळीं मनांतल्या मनांत तो म्हणालाहि, ' पैसे देणं न देणं तुमच्या हातांत आहे म्हणून तुम्ही हात आखडता घेतां. असल्या गोष्टी हव्या असल्या तर यापुढं आमचे आम्हीच पैसे मिळवून आणूं. नि मग मात्र त्या वेळीं या पैशाचं अमुक करूं कीं नको तें एका शब्दानं सुद्धां आम्ही तुम्हांला विचारणार नाहीं.'

मान खालीं घालून घनश्याम त्या वेळीं आपल्या आईसमोरून निघून गेला. पण त्याच्या मनांतला कडूपणा कित्येक दिवस निघून गेला नव्हता.

त्याला पैसे मिळविण्याची संधि मिळाली व आज त्याच्या हातांत ते प्रत्यक्ष पडले, तेव्हां त्याच्या मनांतलें तें शल्य निघून गेलें आणि त्यामुळें त्याला त्या पैशांची किंमत त्यांच्या प्रत्यक्ष मूल्यापेक्षां कितीतरी अधिक वाटली.

अभिमानानें घनश्यामचें मन भरून येऊन त्यानें आपल्या कोटाची डावी बाजू हलवली. आंतल्या खिशांतले तीन रुपये खळखळले. त्याला

तो नाद अतिशय कर्णमधुर लागला. स्वतःच्या श्रमाचे पैसे, निढळाच्या घामाचे पैसे आणि लोकांच्या मतांशीं विरोध करून मिळवलेले पैसे...... विरोध!

* * *

होय. हे पैसे मिळवण्याच्या आधीं त्याला आपल्या वडिलांचे मित्र भाऊसाहेब टांकसाळे यांची गांठ घ्यावी लागली होती आणि त्यांचा विरोध दूर करून त्यांची संमति मिळवावी लागली होती.

ही गांठ घेण्यासाठीं भाऊसाहेब टांकसाळे यांच्या पेढीवर जायला घनश्याम निघाला त्या वेळीं त्याचें मन मोठ्या उत्साहानें भरून आले होतें. आयुष्यांत तो प्रथमच स्वतःच्या श्रमांनीं पैसे मिळवणार होता. त्यासाठीं चैत्री वारीच्या दिवसांत त्यानें नाक्यावर काम करण्याचें ठरवलें होतें.

पंढरपूर येथें पांडुरंगाचें प्रसिद्ध देवालय आहे. महाराष्ट्रांत या क्षेत्राची महती फार असून वर्षांतील चैत्र, आषाढ, कार्तिक आणि माघ या महिन्यांतील शुद्ध एकादशीच्या वेळीं तेथें यात्रा भरतात. यात्रेच्या दिवसांत पंढरपूरची नगरपालिका यात्रेकरूंच्याकडून माणशीं ठराविक कर घेते. या वेळीं गांवांतल्या अनेक मध्यवर्ती ठिकाणीं नगरपालिका कचेऱ्या उघडते आणि तेथें हा कर-गांवांतून बाहेर जातेवेळीं भरावा लागतो. करभरणा केल्याच्या पावत्या मिळतात व त्या गांवाच्या सीमेवर स्वाधीन कराव्या लागतात. या दिवसांत गांवांतून बाहेर जाणाऱ्या प्रत्येक रस्त्यावर नगरपालिकेनें तात्पुरती नाकीं उभीं केलेलीं असतात. पावती दिल्यावांचून कुणाहि यात्रेकरूला गांवाबाहेर जायला मिळत नाहीं. सुमारें एक आठवड्याच्या यात्रेच्या काळांत प्रत्यक्ष गांवांतल्याच एखाद्या रहिवाश्यास परगांवीं जावयाचें असलें तर मात्र पालिकेच्या कचेरींत त्याला आपल्या स्थानिकतेचा दाखला विनामूल्य मिळतो. गांवांतून बाहेर पडतांना हा दाखला नाक्यावर दाखवावा लागतो.

गांवाच्या सीमेवर असलेल्या या नाक्यावर कर भरल्याच्या पावत्या नि

स्थानिकतेचे दाखले गोळा करण्याचें काम करण्याचें घनश्यामनें ठरवलें होतें. हें काम मिळण्यासाठीं पालिकेकडे अर्ज करतांना गांवांतील कुणातरी प्रतिष्ठित माणसाचें प्रशस्तिपत्र बरोबर द्यावें लागे. हें प्रशस्तिपत्र घेण्याकरतांच भाऊसाहेब टांकसाळे यांना भेटण्यासाठीं घनश्याम त्यांच्या पेढीवर निघाला होता.

आपला हेतु त्यानें भाऊसाहेबांना सांगतांच त्यांना मनस्वी आश्चर्य वाटलें. ते म्हणाले, " घनश्यामराव, तुम्ही नाक्यावर काम करणार ? "

" होय ! कां बरं ? "

" तुमच्यासारख्या लोकांनीं हीं कामं करायचीं नसतात."

" आमच्यासारख्या लोकांनीं म्हणजे कुणीं ? "

" तुमचे वडील कोण होते, तें लक्षांत आणा. ते सरकारी अधिकारी होते. गांवांत नि सरकारांत त्यांचं वजन होतं, दरारा होता. आज ते हयात नसले तरी त्यांचं नांव अद्याप लोकांच्या मनांतून पुसलेलं नाहीं. 'रावसाहेब सांगोलकरांचा मुलगा चैत्रीवारीच्या दिवसांत नाक्यावर काम करीत होता' हे शब्द कानांला कसे लागतात पहा. वडिलांची प्रतिष्ठा त्यांच्यामागं टिकवणं हें पुत्राचं कर्तव्य असतं."

घनश्यामनें विलक्षण आवाजांत उद्‌गार काढला, " प्रतिष्ठा ! "

चमकून भाऊसाहेबांनीं त्याला, विचारलें, " कां ? माझं म्हणणं रास्त नाहीं वाटत तुम्हांला ? "

घनश्यामनें उत्तर दिलें नाहीं.

" नाक्यावर काम करणं तुम्हांला कमीपणाचं वाटत नाहीं ? "

" नाहीं ! कां वाटावं ? माझ्या वर्गातलीं दोघं तिघं मुलं प्रत्येक वारीच्या दिवसांत नाक्यावर काम करतात."

" पण तीं तुमच्यासारखीं मोठ्या कुळांतलीं खात्रीनं नसतील ! "

घनश्यामनें मनाशीं खूप विचार केला. मोठ्या कुळांतलीं म्हणजे श्रीमंत कुळांतलीं असें समजलें तर भाऊसाहेबांचें म्हणणें खरें होतें. तरी पण श्रीमंत कुळें हींच मोठीं का समजलीं जावींत ही त्याची शंका कायमच राहत होती. त्यानें विचारलें, " परंतु काम केल्यानं कुळाला कमीपणा कां यावा ? "

भाऊसाहेब म्हणाले, " तुमच्या कुळांतल्या लोकांनीं जें काम करावं असा प्रघात आहे तेंच काम करणं तुमचं कर्तव्य ! तुम्ही नीट विचार करून पहा."

" माझं म्हणणं असं, कीं कोणतंहि काम प्रामाणिकपणानं केलं तर त्यानं कुळाला बट्टा लागणार नाहीं, नि लागूंहि नये."

" कोणतंहि ? " घनश्यामची विचारसरणी विलक्षण वाटून भाऊसाहेबांनीं विचारलें.

" कोणतंहि ! "घनश्याम स्पष्ट शब्दांत म्हणाला.

" झाडूवाल्याचं ? "

" होय, अगदीं झाडूवाल्याचं सुद्धां ! " घनश्याम आवेशानें म्हणाला.

" आश्चर्य आहे ! " भाऊसाहेबांनीं उद्गार काढला.

घनश्यामच्या चर्येवरून स्मिताची एक लकेर येऊन गेली. कारण, त्याला आदल्याच दिवशीं शाळेंत घडलेल्या एका गोष्टीची आठवण झाली होती. आणि त्यांतला प्रसंग या ठिकाणीं तंतोतंत जुळल्याचें पाहून त्याला तें हंसूं आलें होतें.

त्याच्या वर्गावर, त्यांचे नेहमींचे बर्वे मास्तर आजारी होते म्हणून, लागोपाठ तीन दिवस शाळेंतलेच एक निराळे शिक्षक त्याच्या बदली आले होते. त्या वेळांत त्यांनीं मुलांना ' बुकर टी. वॉशिंग्टन ' याच्याविषयीं पुष्कळ माहिती सांगितली होती. जातीनें साधा निग्रो असूनहि, सुरुवातीला हलकीं कामें करून देखील तो महत्पदाला चढला होता. हलकींसलकीं कामें करण्यांत लांछनास्पद असें कांहींच नसल्याचें सांगून, जगांत मोठेपणा आणि ऐश्वर्य प्राप्त करून घेतलेल्या विभूतींनीं लहानपणीं हलकींसलकीं कामें केलीं असल्याचे कित्येक दाखले त्यांनीं दिले होते. मग अमेरिकेंतील नवकोट-नारायण ' रॉकफेलर ' याच्याविषयींहि माहिती सांगितली होती. हलकीं-सलकीं कामें करण्याचें महत्त्व पटवून देण्याच्या हेतूनें तो आपल्या मुलाला स्वतःच्या श्रमानें पैसे मिळवून आणायला सांगत असे नि आपल्या पित्याची ती आज्ञा पार पाडण्यासाठीं तो मुलगा रोज सकाळीं सगळ्या मुलांच्या आधीं शाळेंत जाऊन तेथले केरवारे करी आणि अशा रीतीनें पैसे मिळवी. या साऱ्या हकिकतीहि त्या दिवशीं वर्गांत येऊन गेल्या होत्या.

या हकिकती सारीं मुलें मंत्रमुग्ध होऊन ऐकत स्तब्ध बसलीं होतीं. फक्त वर्गातल्या बाळ सताश्व नांवाच्या एका मुलानें शेवटीं उठून म्हटलें होतें, "सर, रॉकफेलरच्या मुलाच्या या वागण्याला माझा विरोध आहे. त्याला हलकीं कामंच करायचीं होतीं तर त्यानं स्वतःच्या घरांत, स्वतःच्या खोलींत दहा वेळां केर करून वीस वेळा तो काढला असता तरी चाललं असतं! तो ओल्या फडक्यानं पुसून काढला असता तरी चाललं असतं! परंतु शाळेतले केरवारे करण्याचं काम पत्करून त्यानं तेथल्या झाडूवाल्यांच्या पोटावर . "

पण तेवढयांत मास्तरांच्या उदात्त विचारांनीं भारलेल्या त्या वर्गातील इतर मुलांनीं "कांहींतरीच काय भलतं बोलतोस?" असें म्हणून, तो बुद्धिमान होता व त्यांचा आवडता होता तरी त्याला गप्प केलें होतें, आणि मास्तरांना आणखी माहिती सांगण्याची विनंति केली होती. इतर मुलांच्या प्रमाणेंच घनश्यामच्या मनावरहि या सगळ्या माहितीचा फार मोटा परिणाम झाला होता आणि त्याचेंच फळ म्हणजे त्यानें या खेपेच्या चैत्रीवारीच्या दिवसांत नाक्यावर लागून पैसे मिळवायचे असा निर्णय घेतला होता. अर्थातच कांहीं दिवसांपूर्वीं आपल्याजवळ स्वतः मिळवलेले पैसे नसल्यामुळें आईचे ऐकावे लागलेले कडू शब्द आणि निमूटपणें गिळावी लागलेली आशा, उत्कंठा व झालेली मानहानि या देखील त्या निर्णयाच्या बुडाशीं होत्याच.

भाऊसाहेब टांकसाळे यांनीं झाडूवाल्याच्या धंद्याचा उल्लेख केल्यावर घनश्यामनें स्मित केलें त्या वेळीं आपल्यासंबंधातहि नेमका तोच उल्लेख व्हावा या योगायोगाचेंच त्याला हंसू आलें होतें.

"तुम्हांला काय कमी आहे म्हणून तुम्ही या क्षुद्र गोष्टीच्या मागं लागला आहांत?" भाऊसाहेब विचारीत होते.

ते असें विचारीत होते याला अर्थातच कारण होतें. घनश्यामची आर्थिक परिस्थिति त्यांना ठाऊक होती. त्याच्या वडिलांनीं आपल्या पश्चात् जी रक्कम ठेवली होती, त्यापैकीं बराचसा भाग भाऊसाहेब टांकसाळे याजकडे व्याजानें गुंतवला होता. कर्ज म्हणून नव्हे, तर ठेव म्हणून. भाऊसाहेबांची मोठी पेढी होती, व्यापार होता, सावकारी होती, त्यांचा धंदा

चांगला चालला होता, किफायत चांगली होत होती, वेळचे वेळीं घनश्यामच्या आईकडे व्याज पोंचतें होत होतें.

" कमी असण्याचा प्रश्न नाहीं, भाऊसाहेब ! पण हीं कामं लोकांनीं हलकीं समजावींत हें मला पटत नाहीं." धनश्याम म्हणाला.

" तुमचं इतकं ठरलंच असलं तर प्रशस्तिपत्र द्यायला माझी कांहीं हरकत नाहीं. पण तुम्हीं पुन्हा विचार करावा असं मला वाटतं."

" पूर्ण विचाराअंतींच मीं ठरवलं आहे हें."

" मातुःश्रींची परवानगी घेतली आहे का तुम्ही ?"

" प्रथम विरोध होता आईचा. पण नको म्हणण्याचीं तिचीं कारणं वेगळीं होतीं. तिला देखील प्रतिष्ठेचा बाऊ वाटतोच, परंतु त्यापेक्षां नाक्यावरच्या दिवसांत माझ्या खाण्यापिण्याची आबाळ होईल हाच विचार तिच्या मनांत अधिक होता. तथापि तिचा दोन्ही प्रकारचा विरोध मीं सरतेशेवटीं नाहींसा केला."

" असं ? तो कसा काय ?"

" प्रतिष्ठेच्या कल्पनेतला फोलपणा मी तिला पटवून दिला. आणखी; प्रकृतीच्या काळजीसंबंधांत तिला सांगितलं, उद्यांच्या हिंदुस्थानच्या तरुण पिढीनं कणखर प्रकृति धारण करायला हवी. त्याखेरीज तरणोपाय नाहीं. तेव्हां त्यासाठीं कोणतेहि कष्ट सोसायची तयारी मुलांनीं लहानपणापासूनच ठेवायला पाहिजे. आमचे देवल मास्तर आम्हांला नेहमीं हेंच सांगतात."

टांकसाळे हंसले. त्यांनीं विचारलें, " तुमच्या मातुःश्रींना हें पटलं ?"

" कुणास ठाऊक ! पण तिनं परवानगी दिली यावरून तिला तें पटलं असावं असं मानायला हरकत नाहीं."

" ठीक ! मग मी तरी कशाला करूं हरकत ? देतों मी प्रशस्तिप्रत्र."

ठरलेल्या दिवशीं घनश्याम नगरपालिकेच्या कचेरींत गेला. सगळ्या अर्जांचा निकाल त्या दिवशीं लागायचा होता. मराठी शाळेंतील सगळे शिक्षक अर्ज करीत आणि इंग्रजी शाळेंतले थोडेबहुत शिक्षक अर्ज करीत. या मंडळींना पैसे अधिक मिळत पण कामहि अधिक जबाबदारीचें करावें लागे. त्यांचे अर्ज कधींच नाकारीत नसत, म्हणून निकाल ऐकण्यासाठीं त्यांना कचेरींत येण्याची जरूर नसे. त्या दिवशीं तेथें जे लोक जमत

त्यांमध्यें शाळांमधील घनश्यामासारख्या वरच्या वर्गातल्या मुलांचाच भरणा विशेष असे. ज्या दालनांत निकाल कळणार होता तेथें घनश्याम गेला. दालनाच्या एका अंगाला टेबलखुर्ची मांडली होती व तेथें खुर्चीवरील माणूस लिहून घेत होता. त्याच्याच शेजारीं उभा असलेला दुसरा एक मनुष्य टेबलावरच्या गठ्ठ्यांतले कागद उचलून घेई, अर्जदारांचीं नांवें क्रमाक्रमानें उच्चारी, नांव उच्चारल्याबरोबर जमलेल्या लोकांतून तें नांव धारण करणारी व्यक्ति उठे, तिजकडे टेबलाजवळचे लोक पाहात, क्षणभर हातांतल्या अर्जाकडे नि प्रशस्तिपत्राकडे दृष्टि टाकीत, विचारायचा असल्यास एखाददुसरा प्रश्न विचारीत आणि लागलीच होय कीं नाहीं तो निकाल सांगत.

घनश्यामचें नांव उच्चारलें गेलें. तो उभा राहिला. टेबलाजवळील व्यक्तींनीं त्याजकडे बघितलें, हातांतल्या कागदाकडे दृष्टि टाकली आणि विचारलें, " तुम्ही नाक्यावर काम करणार ? "

" करणार ! म्हणून तर अर्ज केला."

" ठीक. तुम्हांला प्रशस्तिपत्र कुणीं दिलं आहे ? "

" भाऊसाहेब टांकसाळेंनीं."

" ठीक."

सारा कारभार तांत्रिकच दिसत होता. पण घनश्यामला निकालाची उत्सुकता होती.

" तुम्हांला घेतलं आहे. रेल्वे भराव नाका नंबर दोन."

घनश्यामचें हृदय समाधानानें भरून आलें. ज्यासाठीं हा एवढा आटापिटा केला तें खरें ठरण्याची संधि आली. स्वतःच्या श्रमानीं पैसे मिळविण्याची आपली इच्छा आतां पुरी होणार.

रेल्वे भराव नाका नंबर दोन. भराव म्हणजे काय ? आणि हा नाका आहे कुणीकडे ? याच्याविषयीं त्याच्या मनांत कुतूहल उत्पन्न झालें. आणि आपण आतां जावें कीं काय याचा विचार करीत तो आजूबाजूला बघत होता, तेवढ्यांत त्याला तें नांव पुन्हा ऐकूं आलें. म्हणजे त्याच्या पाठीमागून ज्या दुसऱ्या विद्यार्थ्याचा कागद आला होता, त्यालाहि तोच नाका मिळाला होता. घनश्याम त्याच्याकडे पाहूं लागला. तेव्हां तोहि आपल्याकडेच पाहात

असल्याचें त्याला आढळून आलें. त्यानें त्याला खूण केली आणि ते दोघे भोंवतालीं जमलेल्या लोकांमधून वाट काढीत बाहेर आले.

घनश्यामनें त्याला आपलें नांव सांगितलें आणि त्याचें विचारलें. त्यानें उत्तर दिलें, " जगन्नाथ चाफळकर."

" शाळेंत शिकतां ? "

" होय. मराठी शाळा नंबर पांच. यत्ता सातवी."

" पूर्वीं कधीं तुम्ही नाक्यावर होतां ? "

" हो. ही माझी पांचवी खेप."

" हा रेल्वे भराव नाका नंबर दोन कुठं आहे तें ठाऊक आहे तुम्हांला ? "

" चौफळयावरून सरळ गांवाबाहेर गेलं, कीं वाटेंत रेल्वे लाईन लागते. तिथलं फाटक ओलांडून त्याच्या पलीकडे थोडसं चालून गेलं, कीं डाव्या हाताला मामलेदार कचेरी लागते. ती बघितली आहे ना ? "

घनश्यामनें आपण ती बघितली असल्याचें सांगितलें.

" तिथंच रस्त्याच्या उजव्या हाताला वळून सुमारें पांच सात मिनिटं चालून गेलं, कीं हा नाका लागतो. बैलगाड्या त्या बाजूनं जातात. तिथं नुसता चाकोरीचा रस्ता तयार झाला आहे. शिवाय थोडीबहुत माणसंहि त्या बाजूनं येतात जातात. तिथंच हा नाका यात्रेच्या दिवसांत उभा केलेला असतो."

" भराव म्हणजे काय ? "

" भराव म्हणजे भर. रेल्वे रस्ता त्या बाजूला भर घालून केलेला आहे त्यामुळं हें नांव पडलं असावं असं वाटतं. बरं, त्या नाक्यावर आपणच दोघे आहोंत. वेळ कशी वांटून घ्यायची ? "

" कशी म्हणाल तशी ! मी यंदाच आलों आहें."

" मग तुम्ही दिवसां नि मी रात्रीं अशी वांटणी करूं. अंधार पडायच्या वेळीं मी येत जाईन नि तुम्हाला मोकळं करीन. उजाडायच्या सुमाराला तुम्ही येत जा नि मला मोकळा करा. कसं ? "

" ठीक आहे. अद्याप अवकाश किती दिवस आहे ? "

" तीन."

या वेळपर्यंत ते पालिकेच्या इमारतीबाहेर आले होते. पालिकेच्या इमारतीला लागूनच शाळेची इमारत होती. तिच्या आवारांतल्या बागेमधील फुलझाडें डंवरून निघालीं होतीं. सूर्य मावळतीला लागला होता आणि दुपारभर भाजून निघालेल्या जमिनीवर आतां माळी पाणी शिंपत होता. त्यामुळें मातीचा विलक्षण मादक सुगंध सुटला होता.

घनश्याम म्हणाला, "चाफळकर, स्वतःच्या श्रमानं पैसे मिळवायचे असले म्हणजे काम करतांना माणसाच्या मनाला मोटं समाधान वाटत असेल नाहीं का!"

चाफळकर बराच वेळ गप्प होता. मग तो म्हणाला, "वाटतं. समाधान वाटतं, पण ..पण..."

"पण काय!"

"पण असं, कीं केलेल्या कामाच्या मानानं माणसाला रास्त पैसे मिळणार असले तरच काम करणाऱ्या माणसाला समाधान वाटतं."

"म्हणजे काय!"

"म्हणजे काय तें तुम्हांला नीटसं समजावून सांगतां यायचं नाहीं मला. पण तसं मला कां वाटतं तें मात्र सांगतां येईल. सोलापूरला माझा एक मामा गिरणींत कामाला आहे. तो आणि इतर सारे कामगार स्वतःच्या श्रमांनींच पैसे मिळवितात. पण त्यांचं नि मालकाचं पगाराबद्दल सारखं कांहीं तरी संप, झगडे नि काय काय कुणास ठाऊक, चालू असतं. कामाचा पुरेपूर मोबदला, मला वाटतं, मालक कधींच कामगारांना देत नसावेत. माझा मामा काय चिडून बोलतो मालकांच्याविषयीं!"

घनश्यामच्या मनांत जी एक मोठी आनंदाची ऊर्मि इतका वेळ भरून राहिलेली होती ती किंचित् ओसरली. त्यानें विचारलें, 'इथं आपल्याकडून काम पिदवून घेऊन पैसे कमी देतात असं होत नाहीं ना?" त्याच्या प्रश्नांत केवढी आशा होती!

"नाहीं नाहीं! तसं काहीं नाहीं! आपलं काम काय, नुसतं पास व पावत्या गोळा करण्याचं. त्यांतून या रेल्वे भराव नाक्याला तर रहदारी अगदींच बेताची असते."

घनश्यामला समाधान वाटलें.

* * *

घनश्याम रेल्वे नाका नंबर दोनवर जाऊं लागला.

तो नाका म्हणजे एक विचित्र ठिकाण होतें. मुरमाड मातीचा ढीग जमिनीवर टाकून त्याची शीग जरा सपाट करून घेतलेली. तिच्यावर लहान मुलें पत्त्यांचा बंगला करतांना दोन पत्ते एकमेकांना टेकून ठेवतात तसे दोन पत्रे जोडून उभे केलेले. जमिनीवर तरट, चार काचांच्या चौकटींत एक लहानसें टमरें ठेवून तयार केलेला एक तकलुपी कंदील आणि एक रिकामी काड्यापेटी एवढेंच सामान त्या ठिकाणीं होतें. त्या टमऱ्यांत फक्त एक रात्र पुरेल एवढेंच घासलेट मावे. रोज सकाळीं नऊ-दहाच्या दरम्यान घासलेट-वाला येई, ठरलेलें माप दिव्यांत ओती, रिकाम्या काड्यांपेटींत तीन काड्या ठेवी आणि निघून जाई. परंतु तसें पाहिलें तर गांवशिवेच्या आडरस्त्या-वरून उभीं केलेलीं सारींच नाकीं अशीं होतीं. तेव्हां या नाक्यालाच विचित्र म्हणण्यांत कांहीं अर्थ नव्हता.

दिवस उन्हाळ्याचे होते. उष्मा भयंकर होई. विशेषतः दुपारीं, दुपारींच काय पण सबंध दिवसभर, काम असें कांहींच नसल्यामुळें वेळ अगदीं जातां जात नसे. आजूबाजूचा सारा प्रदेश कमालीचा रुक्ष होता. दूरवर अगदीं क्षितिजापर्यंत दृष्टि टाकली तरी डोंगर किंवा टेकडी यांचा मागमूसहि नव्हता. नांगरलेल्या किंवा न नांगरलेल्या काळ्या जमिनीचा समुद्र सभोंवार पसरल्यागत वाटे. तुरळक कुठें बाभळीचीं झाडें होतीं. पण त्यांचे काळे रुक्ष बुंधे भोंवतालचें वातावरण अधिकच रुक्ष करीत. नाक्याच्या शेजारून बैलगाडीच्या रहदारीमुळें दोन चाकोऱ्या पडल्या होत्या, त्यांत फोफाटा खूप झाला होता आणि दुपारच्या वेळीं उन्हाची एखादी जोराची झळ त्यांच्यावरून येई तेव्हां बरोबर बराचसा धुरळा घेऊन येई व शरीराचा दाह करतां करतां डोळ्यांनाहि बेजार करून सोडी. या जीवनाला घनश्याम कंटाळून गेला. त्याला पैसे मिळवण्यासाठीं काम करण्याची इच्छा

होती, परंतु या ठिकाणीं काम असें कांहींच नव्हतें. आपण फुकटचे पैसे घेणार कीं काय ही शंका त्याच्या मनांत डांचू लागली.

त्यांतून ही शंका तीव्र होऊन त्याला खंत वाटावी असा एक प्रसंग लवकरच घडून आला. ज्या कामाकरतां आपल्याला नेमलें तें कामच आपल्याला धड ठाऊक नाहीं असें त्याला आढळून आलें.

एक बैलगाडी बाहेरून पंढरपुरांत येत होती. तिच्यांत एक म्हातारी आणि दोन तरुण बायका होत्या. गाडी एक तरुण मराठा हाकीत होता. हात वर करून घनश्यामनें गाडी अडवली.

"पास कुठं आहे?" त्यानें विचारलें.

"कसला पास?" गाडी हाकणाऱ्या तरुणानें विचारलें.

"कमेटीचा!"

"कमेटीचा कसला पास?"

"यात्रेची डोईपट्टी भरल्याचा!" कराच्या ऐवजीं मुद्दामच त्यानें डोईपट्टी हा साधा शब्द वापरला.

पण तो गाडी हाकणारा मराठा एकदां खदखदून हंसला आणि म्हणाला, "वा रे गब्रू! दादा, यात्रेची डोईपट्टी गांवामंदी यायच्या वख्ताला भरीत न्हाईत. गांवांतून भाईर जातांना भरत्यात. मानसं गांवाच्या भाईर जायचीं असलीं मंजी त्यांचा पास मागावा. नाक्यावर नवीन हायती काय तुमी?"

घनश्याम अचंबा करीत त्याच्याकडे पहात होता, तेवढ्यांत त्या तरुण मराठ्यानें गाडी पुढें हाकलली आणि उडालेल्या फोफाट्यांत क्षणार्धांत दिसेनाशी झाली.

'या प्राण्यानं आपल्याला बनवलं कीं काय?' हा संशय घनश्यामच्या मनांत घर करून राहिला. संध्याकाळीं चाफळकर आल्यानंतर आपल्या शंकेचें त्यानें निरसन करून घेतलें. त्या तरुण मराठ्याचें म्हणणें बरोबर असून चूक आपल्याकडेच असल्याचें घनश्यामला आढळून आलें. गांवांतून बाहेर जाणाऱ्याकडेच पास मागायचे असतात हें त्यानें आतां नीट ध्यानांत ठेवलें, पण मनांतल्या मनांत प्रसंगाबद्दल त्याला खंत वाटूं लागली.

आणि मग ती खंत अधिक वाढावी असा वेगळाच एक प्रसंग दुसऱ्याच दिवशीं घडून आला.

या खेपेला एक गाडी गांवांतून येत होती. दूर अंतरावरून घनश्यामला धुरळा दिसला त्यावरून त्यानें कुठली तरी बैलगाडी येत असावी हें ताडलें. गांवांतून ती येत आहे तेव्हां पास मागायला पाहिजे हें ध्यानांत घेऊन तो आपल्या पऱ्याखालून बाहेर आला. येणाऱ्या गाडींत पांचसहा माणसें असून सारे पुरुषच होते. त्यानें हात दाखवून गाडी थांबवली आणि तो जवळ गेला.

" पास कुठं आहे, काढा ! " त्यानें हटकलें.

" कसला पास ? "

" यात्रेची डोईपट्टी भरल्याचा."

" पर आमी यात्रेकरू न्हवं. इथलींच मानसं आमी दादा ! "

" मग कमेटीचा दाखला पाहिजे."

" कमेटीचा कसला दाखला ? "

" तुम्ही इथलेच आहांत हें लिहिलेला दाखला. त्याखेरीज आम्हांला कसं कळावं तुम्ही इथलेच म्हणून ? "

" पर आमी सांगतों ना ! "

" नुसतं सांगून नाहीं चालायचं. कागद पाहिजे तसा."

" पर आमाला कुठं भाईरगांवाला जायाचं न्हाई. आमच्या शेतावरती जानार नि उद्यां परत येनार आमी."

" कुठं आहे तुमचं शेत ? "

" भाबुळवाडीला. इथनं दोन कोसांवर भाबुळवाडी न्हाई का ? ततं ! "

" तें काहीं मला ठाऊक नाहीं. तुम्ही बाभुळवाडीला जा नाहीं तर सागवाडी, चंदनवाडीला जा ! पास दाखवल्याबिगर तुम्हांला जातां यायचं नाहीं."

" असं करू नका दादा ! आमी गरीब मानसं ! तुमचे कायदे आमास्नी कुटलं म्हायती ! "

" तुम्हांला परत जाऊन गांवांतून पास आणायला पाहिजे."

" उद्यां आमी आनूनशी तुस्मास्नी दावूं पास. मग चालंल का ? "

" पास उद्यां आणणार तर जायलाहि उद्यांच मिळेल ! आज नाहीं ! "

हें सगळें संभाषण गाडींत बसलेला एक म्हातारा व घनश्याम यांच्या-मध्यें चाललेलें होतें. याच्यावर तो म्हातारा कांहीं बोलणार होता. परंतु तेवढयांत गाडी हाकायला बसलेला जो एक तरुण माणूस होता तो त्याला अडवून म्हणाला, " अर बामणा, इकता येळ म्हातारा सांगतुया, आमी हतंच न्हातुं म्हून, तर खर न्हाई वाटत व्हय? काय करनार र तूं? बोल! काय करनार तूं? आमी जानार भाबुळवाडीला. आमच्याजवळ पास न्हाई न् काय बी न्हाई! काय तुला करायचं त्यें कर!"

एवढें म्हणून त्यानें गाडी भरधाव सोडली.

या अनपेक्षित बोलण्यानें थक्क होऊन, धुळीच्या लोटांत लुप्तप्राय झालेल्या त्या बलगाडाकड पाहत घनश्याम नुसता स्तब्ध उभा राहिला.

घनश्यामला तो दिवस वाईट गेला. आपल्या हातून कर्तव्य योग्य रीतीनें पार पडूं शकत नाहीं ही टोंचणी त्याच्या मनाला सारखी लागली होती. नगरपालिकेकडून आपण हरामीचे पैसे घेणार, हा विचार सारखा त्याचा मनस्ताप करीत होता.

संध्याकाळीं चाफळकर आल्यानंतर त्यानें त्याला सारा वृत्तांत आणि आपली मनोव्यथा सांगितली. चाफळकर हंसून म्हणाला, " त्यांत कांहीं वाईट वाटून घेण्याचं मुळींच कारण नाहीं सांगोलकर! नाहीं तरी तुम्हांला काय करतां येण्यासारखं होतं? तुम्ही पडलांत एकटे आणि जवळपास कुणीहि नाहीं. अशा प्रसंगीं कांहींच करायचं नसतं. माणसांकडे पाह्यचं नि सोडून द्यायचं! आणि तीं माणसं तशींच गेलीं यामुळं नगरपालिकेचं तुमच्या हातून नुकसान झालं, अस तर तुम्हांला मुळींच वाटायला नको!"

" म्हणजे?"

" कारण, तीं माणसं इथलाच असलीं पाहिजेत याविषयीं शंकाच नाहीं!"

" कशावरून?" चाफळकरच्या विश्वासाच्या आणि धिम्या विचार-सरणीचें आश्चर्य वाटून घनश्यामनें विचारलें.

" कारण एक तर यात्रेकरू सहज ओळखूं येतात. ते तुम्हांलाहि ओळखूं आले असते. दुसरं असं, कीं यात्रेकरूंच्या ठिकाणीं इतकी मगरुरी नसते. साधींभोळीं माणसं तीं. सुतासारखीं सरळ नि लोण्यासारखीं मऊ! आणि

तिसरी गोष्ट अशी, कीं यात्रेकरू परत जाण्याचा आजचा दिवस नव्हे. द्वादशी उजाडल्यानंतर ते गांवाबाहेर पडूं लागतात."

"तें कांहीं असलं, तरी या लोकांनीं नियमांचं उल्लंघन नाहीं का केलं?"

"केलं! पण त्याला तुम्ही तरी काय करणार नि मी तरी काय करणार! चालायचंच म्हणायचं नि गप्प राहायचं! सरळ सरळ व्यवहार आहे हा!"

घनश्यामला ही गोळी गिळतां येईना. तो कष्टी झाला आणि स्तब्ध राहिला. त्याच्या दुर्मुखलेल्या चर्येकडे पाहून चाफळकर म्हणाला, "तुम्हाला वाईट कशाचं वाटतं आहे तें मला कळत नाही! यांत, खरं म्हटलं, तर तुमचा कांहींच अपराध नाहीं. असलाच तर अधिकाऱ्यांचा आहे. अशा प्रसंगाची शक्यता ओळखून त्यांनींच आपल्याला पोलिसांचं संरक्षण मिळवून द्यायला पाहिजे."

या उत्तरानेंहि घनश्यामचें समाधान झालें नव्हतें. आपल्या श्रमाच्या पैशाला कसला तरी अनामिक कलंक लागणार असल्याचें त्याचें मन त्याला सांगूं लागलें होतें....

* * *

आज या साऱ्या आठवणी घनश्यामच्या मनांत साकळून आल्या. आणि मग थोड्याच वेळापूर्वी प्रत्यक्ष हातांत पडलेल्या त्या तीन रुपयांविषयीं घनश्यामला आतां फारशी मातब्बरी वाटेना. त्यानें ते आंतल्या खिशांतून काढून हातांत घेतले. त्यांच्याकडे पाहता त्याच्या मनांत अनेक संमिश्र भावनांची गर्दी उसळून गेली. मघाशीं नगरपालिकेच्या कचेरींतून बाहेर पडतांना त्याला ते शिशासारखे जड वाटत होते. त्याला आतां ते तितके वाटेनात.

चालत चालत लायब्ररीला वळसा घालून तो पुढें आला आणि उद्धवघाट उतरून चंद्रभागेच्या कांठच्या विस्तीर्ण वाळवंटांत आला.

वाळवंटांतील लहान लहान असंख्य देवळें आणि समाध्या एखाद्या अवखळ मुलानें खोलींत पिसकारलेल्या खेळण्यांप्रमाणें वाटत होत्या. त्यांमध्यें आभाळापर्यंत उंच गेलेलें पुंडलिकाच्या देवळाचें शिखर कुणाला तरी सुळावर चढविण्यासाठीं रोवून ठेवलेल्या अजस्र सुळासारखें दिसत होतें. नदीच्या क्षीण पात्राच्या पैलतीराला असलेला गुजरघाट रंग विटून गेल्यामुळें भेसूर दिसत होता. यजमानकृत्यें करून किंवा| बडवेगिरी करून ऐतखाऊ आयुष्य कंठणाऱ्या परपुष्ट जीवांचीं टोळकीं संध्याकाळच्या वेळीं फिरायला येऊन वाळवंटांत ठिकठिकाणीं कोंडाळी करून चकाट्या पिटत बसलीं होतीं आणि नगरप्रदक्षिणा करणारे भाविक लोक रुळलेल्या विशिष्ट पायवाटेनें नदीकडे जात होते ते मुंग्यांच्या तुटक्या रांगेप्रमाणें वाटत होते. या सगळ्या रुक्ष वातावरणांत आकाशांत असलेल्या एकाच ढगावर मावळलेल्या सूर्याचा मंद नारिंगी रंग रेंगाळत होता तोच तेवढा दृष्टीला सुखावह वाटत होता. पण तो सुद्धां बघतां बघतां नाहींसा झाला आणि तो ढग क्षणांत राखाडीच्या रंगाचा होऊन उदास दिसूं लागला.

घनश्याम संथपणानें पावलें टाकीत वाळवंटांतून चालूं लागला.

त्याला वाटेंत बाळ सखाराम भेटला. बाळ सखाराम हा त्याच्या वर्गांतला, नेकीनें वागणारा, चांगला अभ्यास करणारा, हुशार परंतु निष्कांचन कुटुंबांतला संकटांशीं झगडणारा विद्यार्थी त्याच्याविषयीं घनश्यामला आपुलकी वाटत असे. त्याला समोर बघितल्याबरोबर त्याच्या मनांत उत्साह भरून आला, अस्वस्थता नाहींशी झाली आणि आपण जे पैसे मिळवले त्यांत आपण जाणूनबुजून अन्याय, फसवेगिरी कांहीं केली नाहीं अशी त्याचें मन ग्वाही देऊं लागलें. संकटांशीं झगडणाऱ्या नेकीच्या व्यक्तीच्या सांन्निध्यांत खिन्न माणसाच्या मनामध्यें उत्साह, आशा निर्माण करण्याचें सामर्थ्य असतें.

बाळ सखारामनें त्याच्याकडे बघून स्मित केलें. त्या क्षणीं घनश्यामच्या मनांतला उत्साह दुणावला. आज आपल्याला निढळाच्या घामाचे तीन रुपये मिळाले आणि पुन्हा संधि मिळतांच आपण असेच पैसे मिळवणार असल्याचेंहि त्यानें त्याला सांगितलें.भाऊसाहेब टांकसाळे यांनीं केलेला विरोध

त्या विरोधावर आपण केलेली मात यांचाहि इतिहास त्यानें सांगितला. पण हें सांगतां सांगतां एकदम एक विलक्षण गोष्ट त्याच्या लक्षांत आली व त्यानें विचारलें, " बाळ, तूं इतका वेळ कांहींच कसं बोलला नाहींस ? "

बाळनें उत्तर दिलें नाहीं.

घनश्यामनें पुन्हां विचारलें, " कां ? गप्प कां झाला आहेस असा तूं ? "

बराच वेळ बाळ सताश्व कांहींच बोलला नाहीं. नंतर त्यानें घनश्यामला विचारलें, " मी कांहीं बोललों तर रागवायचा नाहींस ? "

" बाळ, तूं कांहींहि बोललास तरी त्यांत राग येण्यासारखं कांहीं असणार नाहीं. मला खात्री आहे."

बाळनें स्मित केलें आणि विचारलें, " घनश्याम नाक्यावर लागण्याची ही तुझी पहिलीच खेप ना ? "

घनश्यामनें हुंकार दिला.

" नाक्यावर लागण्याकरतां तूं अर्ज केलास तो कोणत्या कारणामुळं ? "

" कोणत्या कारणामुळं म्हणजे काय ? स्वतःच्या श्रमावर मला..."

" तें कळलं मला ! पण तुला पैसे मिळवायची जरूरी कां वाटली ? तुझी परिस्थिति आहे का तसं वाटण्यासारखी ? "

" भाऊसाहेब टांकसाळेसुद्धां हेंच विचारीत होते मला ! पण मी म्हणतों, इथ परिस्थितीचा प्रश्न येतोच कुठं ? मला पैसे मिळवावेतसे वाटले, मी प्रयत्न केला, मला संधि मिळाली आणि मला पैसेहि मिळाले. मीं कुणाशीं लांडीलबाडी केली नाहीं कीं कुणाला फसवलं नाहीं. यांत कांहीं चुकलं का माझं ? रॉकफेलरचा मुलगा...त्याची गोष्ट आपण ऐकली होती, आठवतें तुला ? "

" ती गोष्टहि आठवते आणि तिच्यांतल्या तत्त्वाला मीं विरोध केला होता हेंहि आठवतं ! त्या दिवशीं तुम्हीं मला गप्प केलंत...पण तें आत्तां नको ! दर वारीला नाक्यावर लागण्यासाठीं मी अर्ज करतों हें ठाऊक आहे तुला ? "

" नाहीं, आत्तांच कळतं आहे हें ! "

" आणि मी अर्ज करतों एवढंच नव्हे; तर तो पहिल्यांदा केल्यापासून आत्तांपर्यंत प्रत्येक वारीला कुठल्या ना कुठल्या तरी नाक्यावर मला काम

मिळत गेलं आहे. परंतु या खेपेलाच माझं दुर्दैव ओढवलं असं म्हणायला पाहिजे. कारण, मला काम मिळालं नाहीं."

" नाहीं ! का ?"

" कुणास ठाऊक ! पण मला माहीत असलेल्या सगळ्या लोकांच्या बाबतींत मीं चौकशी केली, त्यांत मला आढळून आलं, कीं या खेपेला नवीन असा तूंच एकटा आलास नि जुन्यापैकीं मीच एकटा गळून गेलों."

" अरेरे ! खरंच मोठा विलक्षण आहे हा योगायोग !"

" नुसतं योगायोगच विलक्षण आहे एवढ्यावरच ही गोष्ट निकालांत निघायची नाहीं."

" म्हणजे काय ?"

माझ्या घरची स्थिति वाईट आहे, तें ठाऊक आहे तुला ? शाळेंत मी आणि माझा भाऊ नादार आहोंत, पण त्याच्याबदला शाळेंतलं सहकारी वस्तुभांडाराचं काम आम्हीं मागून घेतलेलं आहे. मी वार लावून जेवतों, पण जिथं आम्ही जेवायला जातों तिथलं कांहीं ना कांहीं काम आम्ही करतों. तुला माझी दया यावी किंवा तूं माझी कींव करावीस म्हणून मीं हीं स्वतःचीं गृहछिद्रं उघडीं करीत नाहीं. पण तुला हें कळायला हवं आहे, कीं हीं सारीं कामं करतों, तीं पैसे मिळवायची मला लहर येते म्हणून नव्हे, तर पैसे मिळवणं मला आवश्यक असतं म्हणून."

" पैसे मिळवायची लहर !"

" लहर नाहींतर काय म्हणायचं ? रॉकफेलरच्या चिरंजीवांच्या पावलावर पाऊल टाकायचा तूं प्रयत्न केलास, पण त्यामुळं माझ्या तोंडचा घास तूं काढून घेतलास."

" असं काय म्हणतोस बाळ ! मला खरंच कांहींच ठाऊक नव्हतं. तुझं वाईट करावं असं कसं वाटेल मला ?"

" मला तें सगळं कबूल आहे. पण त्याचा परिणाम काय झाला तो पहा. आम्ही गरीब माणसं. लहानपणीं काय किंवा मोठेपणीं काय, मोठमोठ्या आणि वरच्या जागा, निदान हिंदुस्थान परतंत्र आहे तोंपर्यंत तरी आम्हांला कधींच मिळायच्या नाहींत. ती श्रीमंतांची मिरासदारी आणि

श्रीमंतांनीं त्या ठिकाणींच फक्त शिरावं ! हे पैसे तूं मिळवले नसतेस तर तुझं कांहीं अडणार होतं काय ? ”

घनश्यामची स्तब्धताच बाळच्या प्रश्नाचें उत्तर होती.

“ पण माझी गोष्ट तशी नाहीं. माझ्या घरचीं माणसं दारिद्र्यानं टेकीस आलेलीं आहेत. त्यांचा तो भार, अगदीं अल्पांशानं का होईना मला कमी करतां येण्यासारखा होता. ती माझी संधि गेली.”

घनश्यामनें झटकन् आपल्या आंतल्या खिशांत हात घातला आणि मघांचे ते तीन रुपये काढून बाळच्या खिशांत टाकायचा प्रयत्न केला. पण बाळनें त्याची हालचाल पाहून सगळें जाणलें आणि तो सरकन् मागें सरकला. त्याबरोबर घनश्यामच्या हातांतले पैसे खालीं वाळूंत पडले आणि त्यांचा बदकाक्षीण आवाज निघाला.

बाळ सप्ताश्व म्हणाला, “ घनश्याम, तुझं मन मला कळतं, परंतु लहानपणापासून माझ्या मनावर जे संस्कार झाले आहेत ते मला सांगतात कीं कुणाकडूनहि पैसे फुकट घेऊं नकोस. आजपर्यंत मीं तें व्रत...”

हें म्हणतां म्हणतां बाळ सप्ताश्व झपाझपा निघून गेला. घनश्याम त्याच्याकडे स्तिमित दृष्टीनें पाहूं लागला, नि जागच्या जागींच खिळल्यासारखा झाला.

तो दिसेनासा झाल्यावर खालीं वाकून त्यानें वाळूंतले ते तीन रुपये उचलले. आतां त्याला ते अगदीं पिसाप्रमाणें हलके लागले.

एखादी घागर भरलेली आहे अशा कल्पनेनें उचलायला जावें नि ती रिकामी असल्यामुळें अनपेक्षितपणें हाताला जोराचा हिसडा बसावा तशी घनश्यामची स्थिति झाली !

१९४५

## घर आणि शाळा : : १

माझ्यासमोरच्या खिडकींतून शाळेच्या आवारांतल्या अशोकाच्या वृक्षाचा शेंडा मला दिसत होता. त्याचीं कुरळीं कुरळीं आणि हिरवींगार पानें वाऱ्याच्या झोतासरशीं हसत होतीं. त्यांच्या शेजारीं नीम चमेलीचीं दोन उंच झाडेंहि होतीं. त्यांचीं लांब देठांचीं पांढरीं शुभ्र फुलें उलटीं लोंबत होतीं. प्रत्येक ढापीच्या टोकाशीं त्यांचा उलटा पुंज बनलेला होता त्यामुळें त्या झाडांना सुबक आणि सुगंधी झुंबरें टांगून ठेवल्यासारखें वाटत होतें. त्या सुगंधी झुबरांचा मंद सुवास खिडकीवाटे येऊन माझ्या खोलींत भरून राहिला होता.

मुलांच्या ज्ञानांत वारंवार भर पडत जावी या हेतूनें सामान्य माहिती कागदांवर लिहून ते कागद त्यांच्या सूचनाफलकावर लावण्याचा माझा नेहमींच क्रम असे. तसा सामान्य माहितीचा एक कागद मीं नुकताच लिहिला होता. जें सरकार हिंदी शाळांतल्या मुलांना प्रत्येक मुलामागें सरासरीनें दर वर्षाला फक्त आठ रुपये देतें तेंच सरकार इथल्या युरोपियन शाळांतून शिकणाऱ्या युरोपियन मुलांना प्रत्येक मुलामागें दर वर्षाला सरासरीनें ऐंशीं रुपये देतें ही माहिती मीं लिहिली होती. आणि मला राहवेना म्हणून त्याच्याखालीं मीं लिहिलें होतें मुलांसाठीं खूप खूप करावेंसें वाटतें, परंतु एवढया थोडया पैशांत काय आणि कितीसें करतां येणार! आपलें सरकार येईपर्यंत मिळतें तेवढयांत आपल्याला निर्वाह केला पाहिजे.

हें लिहितांना माझें मन फार कष्टी झालें होतें.

माझ्या मनाची ही खिन्नता अशोकाच्या त्या शेंडयाकडे आणि नीम-चमेलीच्या त्या सुगंधी झुंबरांकडे पाहून नाहींशी झाली आणि राष्ट्रीय सरकार जेव्हां केव्हां येईल तेव्हां आपल्याला तें अधिक पैसे खाचित देईल आणि मग त्या पैशांत आपल्याला कोणत्या गोष्टी करता येतील, त्यांतल्या कोणत्या आधीं करायच्या, कोणत्या नंतर करायच्या, याविषयींच्या योजना आंखण्याचा माझें मन चाळा करूं लागलें. त्याचबरोबर त्या झाडाकडे पाहतां पाहतां मला एका प्रसिद्ध शिक्षणशास्त्रज्ञाच्या वचनाची आठवण झाली. त्यानें म्हटलें आहे, कीं लहान मुलांना खिडकींतून दिसणाऱ्या झाडांच्या शेंडयांचा मोह पडतो म्हणून शाळेच्या आवारांत उंच झाडें असावींत. माझ्या मनांत आलें, लहान मुलांनाच कां, मोठ्या माणसांनाहि मोह पडतो.

एवढ्यांत शिपाई आंत आला आणि त्यानें एक चिठ्ठी मजजवळ आणून दिली. तिच्यावर लिहिलें होतें,

'म. श्री. गोवर्धन.'

शिपायाला मीं सांगितलें, "पाठवून दे त्यांना आंत."

सुमारें अकरा वर्षांच्या एका लहानशा दिसणाऱ्या मुलाला घेऊन एक प्रौढसा गृहस्थ आंत आला. मीं त्याला म्हणालों, "बसा ना आपण!" आणि नंतर, "बोला, आपलं कोणतं काम मला करतां येईल?"

तो गृहस्थ खुर्चीवर बसत म्हणाला, "हा माझा मुलगा रामदास. आपल्या शाळेंत इंग्रजी दुसरीच्या वर्गांत आहे."

"अस्सं, दुसरींत का? मग आत्तां तो वर्गामध्यें कां बरं...?"

"तेंच तर सांगतों आहें ना आपल्याला! मघाशीं काय झालं, मीं कामाला चाललों होतों, तों मला हा रस्त्यांत दिसला. म्हटलं, ही वेळ शाळेची नि हा असा रस्त्यांत कां भटकतो आहे? म्हणून मीं त्याला विचारलं, 'शाळेच्या वेळीं, इकडे रे काय करतोस?' तर एक नाहीं कीं दोन नाहीं. मनांत विचार आला, मला हा दिसायच्या आधीं मीच ह्याला दिसलें असतात हा कुठंतरी निसटला असता नि मग मला कांहीं कळलंहि नसतं? घरांतून रोज शाळेच्या वेळेस जेवण उरकून बाहेर पडतो, पण शाळेंत येतो कीं

नाहीं कुणास ठाऊक! तेव्हां एकंदरींत हें प्रकरण आहे तरी काय त्याचा तपास करावा असा विचार केला आणि हातचं काम जरा बाजूला ठेवून त्याला तसाच इकडे आणला."

मीं म्हटलें, "बरोबर केलंत आपण!" नंतर त्या मुलाला मीं विचारलें, "कोणत्या तुकडींत आहेस तूं रामदास?"

"दुसरी क."

"किती दिवस झाले शाळेंत येत नाहीं आहेस तूं?"

रामदास कांहींच बोलला नाहीं. तो गोरामोरा झाला. एका चिठ्ठीवर मीं लिहिलें, 'रामदास गोवर्धन गेले किती दिवस शाळेंत आलेला नाहीं?" आणि टेबलावरील घंटा वाजवून शिपाई आल्यावर त्याला सांगितलें. "ही चिठ्ठी दुसरी 'क' मध्यें घेऊन जा आणि लागलीच उत्तर आण."

शिपाई चिठ्ठीचें उत्तर घेऊन आला. तें वाचीत मीं म्हणालों, "रामदास सात दिवस शाळेंत आलेला दिसत नाहीं."

लागलीच त्याच्या वडिलांनीं त्याला विचारलें, "होय का रे?"

रामदास अतिशय कावराबावरा झाला आणि त्याला आतां रडूं कोसळणार अशीं लक्षणें दिसूं लागलीं. तशी त्याच्या वडिलांना मीं म्हटलें, "हें पहा, आपणांला काम असलं तर आपण जायला कांहीं हरकत नाहीं. या प्रकरणाची चौकशी करून मीं सगळी व्यवस्था करतों आणि काय केलं आहे किंवा करणार आहे तेंहि कळवतों आपल्याला."

रामदासच्या वडिलांनीं एखादा अप्रिय प्रसंग पाहण्याचें टळल्याबद्दल हायसें वाटल्याची समाधानी मुद्रा केली आणि ते म्हणाले, "बरं तर मग मी जातों."

त्यांना मी दारापर्यंत पोंचवायला गेलों. दाराशीं आल्यावर माझ्या अगदीं जवळ येऊन हलक्या आवाजांत ते म्हणाले,

"मुलाला मारणारबिरणार आहांत काय?"

मी हंसलों आणि नकारार्थी मान हलवली.

ते त्यावर म्हणाले, "शक्य तोंवर मारूं नका. एकुलता एक आहे. त्याच्या आईनं आणि मीं तळहातावरच्या फोडासारखा वाढवला आहे. सहसा रडवला नाहीं. तेव्हां कदाचित् हाय घेईल. तुमच्या अधिकाराच्या

आड मला यायचं नाहीं, पण समजावणीनं काम जमलं तर पहा, एवढंच सांगणं आहे. आम्हांला तें जमत नाहीं. एखाद वेळेला मनांत नसतांना एकाएकीं आम्ही भडकतों नि मग हातून होऊं नये तें होऊन जातं आणखी पस्तावा करण्याची पाळी येते. खरं म्हटलं तर या सगळ्या विचारानंच मी त्याला इथं आणला. तसं पाह्यला गेलं तर मुलगा हाडाचा गरीब आहे, पण कुणी सांगावं कुणाची बुद्धि कशी फिरते तें? एखाद वेळीं...तेव्हां..."

मी त्यांना आश्वासन आणि निरोप देऊन जागेवर आलों. रामदास उभाच होता. मीं टेबलावरच्या दिनदर्शकाकडे बघितलें. जूनची विसावी तारीख. शाळा सुरू होऊन पंधरा दिवस झाले होते. त्यांपैकीं सात दिवस रामदासनें शाळा चुकवली होती. मी त्याला विचारलें, " गोवर्धन, पहिला आठवडाभर तरी तूं शाळेंत नीट आला होतास?"

रामदासनें होकार दिला.

" अगदीं नियमितपणानं?"

" होय सर!"

" मग नंतर कां बरं येईनासा झालास?"

रामदासनें कांहींच उत्तर दिलें नाहीं. थोडा वेळ वाट पाहून मीं विचारलें, " कुणी कांहीं बोललं का तुला?"

" नाहीं सर!"

" कुणी मारलं, झोडलं का तुला?"

" नाहीं सर!"

" मग शाळेंत कशामुळं येऊं नयेसं वाटलं तुला?"

रामदास कांहींच बोलला नाहीं.

" कंटाळा आला होता का तुला शाळेंत येण्याचा?"

" नाहीं सर!"

" मला सांगतां येण्यासारखं नाहीं, असं कांहीं एखादं कारण आहे का?"

पुन्हा रामदास गप्प झाला. त्याच्या स्तब्धतेचा अर्थ अगदीं उघड होता. तेव्हां किल्ल्याला दुसऱ्या बाजूनें सुरुंग लावल्याखेरीज तें गूढ उकलणें शक्य नाहीं हें मला कळून चुकलें. मनाशीं मी कांहीं आडाखे बांधले आणि त्याला म्हणालों, " हें बघ रामदास, मला न सांगण्यासारखं तुझं कांहीं

कारण असलं तर नको सांगूस. मी त्याचा आग्रह धरीत नाहीं. आणि तुला त्याचं एवढं हें वाटत असलं तर पुन्हा कधीं त्या बाबतींत विचारणारीहि नाहीं, मग तर झालं? आपण असं ठरवूं, कीं आपण शाळेंत सात दिवस नाहीं आलों ही गोष्ट तूं विसरून जायचीस, मी देखील विसरून जाईन. मात्र मला एवढं वचन दे, कीं उद्यांपासून आपण नियमितपणानं शाळेंत येऊं. चालेल ? ''

एक क्षणभर रामदास स्तब्ध झाला, त्याची चर्याहि कशीशीच झाली आणि नंतर तो म्हणाला, " होय सर ! येईन उद्यांपासून शाळेला ! "

" विश्वास ठेवूं तुझ्या शब्दावर ? "

त्यानें होकारार्थी मान हलविली.

" चुकायचा नाहींस ना ? "

" नाहीं सर ! "

मीं हातार्शी असलेली फाडवही जवळ घेतली आणि लिहूं लागलों :

...आपला मुलगा चि. रामदास हा गेले सात दिवस शाळेंत येत नव्हता. ज्या कारणामुळें तो शाळेंत येत नव्हता त्या संबंधांत मीं चवकशी केली असून माझें समाधान झालें आहे. यापुढें रामदासनें नियमितपणानें शाळेंत यावयाचें कबूल केलें असून त्या बाबतींत आपणांस चिंता वाटण्याचें कांहीं कारण उरलेलें नाहीं...

खालीं माझी सही करून तो कागद मीं लिफाफ्यांत घातला आणि लिफाफा बंद न करतां रामदासच्या हातीं देत म्हटलें, " आतां तूं वर्गात जाऊन बैस आणि घरीं गेल्यानंतर हें पत्र वडिलांना दे."

त्यानें तें कबूल केलें आणि तो निघून गेला.

माझी अटकळ होती त्याप्रमाणें तीनच मिनिटांत तो परत आला आणि म्हणाला, " सर, वडिलांना तुम्हीं लिहिलेली चिठ्ठी मीं वाचली."

" बरं ! कांहीं बिघडलं नाहीं ! उघड्या लिफाफ्यांतूनच दिली होती मीं ती. तिच्यांत गुप्त असं कांहींच नव्हतं. तुला कांहीं वाटायला नको त्याचं ! तूं वर्गात जा. संध्याकाळीं मात्र ती वडिलांना द्यायला विसरूं नकोस हं ! जा ! "

रामदास क्षणभर घोटाळला, दारापर्यंत गेला आणि परत माझ्याजवळ

येऊन म्हणाला, " सर, मला कांहीं सांगायचं आहे तुम्हांला ! "

याचीच मी वाट पहात होतों. मी म्हणालों, " असं ? कांहीं हरकत नाहीं. सांग ना ! काय सांगायचं आहे तुला ? "

जरा वेळ त्याची चुळबुळ झाली आणि नंतर जखम फुटून तिच्यांतून भळभळा रक्त वहावें त्याप्रमाणें त्याच्या तोंडून भरभर उद्गार बाहेर पडूं लागले,

" सर, आपली वार्षिक परीक्षा संपली ना, त्याच्या आदल्या दिवशीं माझी निफाची डबी घरीं विसरली होती. मी फार घाबरून गेलों. आतां पेपर कसा लिहितां येणार आपल्याला, म्हणून घाबरलों. मी वर्गातल्या दुसऱ्या कुणाजवळ एखादं सुटं निफ आहे का म्हणून चौकशी केली, तशी आमच्या वर्गात भास्कर काबरे म्हणून एक मुलगा आहे ना, त्यानं मला एक नवीन निफ दिलं. त्या दिवशीं सुटं निफ किंवा टाक कुणाजवळ नव्हता, सर ! "

" अस्सं ! या गोष्टी केव्हांच्या ? एप्रिलमधल्याच ना ? "

" होय सर ! काबरेनं मला नवीन निफ दिलं, तेव्हां तो म्हणाला, ' हें निफ नवीन आहे, उद्यां मी हें परत नाहीं घेणार. मला दुसरं नवीन निफ तरी तूं दिलं पाहिजेस किंवा याची किंमत एक पैसा तरी दिला पाहिजेस.' सर, मीं त्या वेळीं कबूल केलं तशीं तो म्हणाला, ' उद्यां विसरायचा नाहींस ना पण ? विसरलास तर लक्षांत ठेव, परवांपासून दिवसाला एक पैसा याप्रमाणं व्याज द्यावं लागेल तुला ! '... "

मी आश्चर्यानें रामदास गोवर्धनकडे पाहूं लागलों.

तो सांगूं लागला, " सर, मीं तें कबूल केलं, कारण पेपर सुरू व्हायला फारच थोडा अवकाश होता. पण सर, दुसऱ्या दिवशीं मी पैसा आणायला विसरलों, अन् त्या दिवसापासून तर शाळाच बंद झाली. निकाल लागला त्याच्या आधींच मी गांवाला गेलों, त्यामुळं त्या दिवशींहि मला पैसा देतां आला नाहीं."

यानंतर तर एखाद्या दरोड्यांत नुकत्याच सांपडलेल्या माणसानें घाबऱ्या घाबऱ्या आणि घाईघाईनें त्या दरोड्याची हकिकत सांगावी त्याप्रमाणें रामदास बोलूं लागला, " पण सर, शाळा जेव्हां सुरू झाली तेव्हां काबरेनं

माझ्याकडे एक पैसा तर मागितलाच, पण परीक्षा संपल्यापासून निकाला-पर्यंत आठ दिवस नि सुट्टीचे बेचाळीस दिवस एवढयावरचं साडेबारा आणे व्याजहि तो मागूं लागला. तेव्हा तर मी फारच भ्यायलों. मला कुठून मिळणार सर, पावणेतेरा आणे ? पहिले चार पांच दिवस, उद्यां देईन, उद्यां देईन, असं सांगून मीं टाळाटाळ केली, पण नंतर एक दिवस तो म्हणाला, 'उद्यां नाहीं आणलेस पैसे तर सराटे मास्तरांना सांगेन ?' त्यामुळं तर मी फारच भ्यायलों. दुसऱ्या दिवशीं मीं त्याला आठ आणे दिले."

आश्चर्य आणि हंसूं दाबीत रामदासला मीं म्हटलें; "खरंच आठ आणे दिलेस त्याला तूं ?"

"होय सर, खोटं कशाला सांगूं ? पण सर आठ आणे दिले तेव्हां तो म्हणाला, 'बाकीचे कधीं देणार ?' मीं म्हटलं, 'देईन केव्हां तरी !' तेव्हां त्यानं माझं मनगट पकडलं आणि म्हणाला, 'मग त्या दिवसापर्यंतचं व्याज द्यावं लागेल तुला !'..."

एखाद्या धीर खचलेल्या माणसाप्रमाणें रामदासनें अगदीं शेवटीं अस्पष्ट उद्गार काढले, "त्यानंतर सर, मी शाळेंत आलोंच नाहीं !"

त्याला शांत व्हायला थोडी संधि देऊन नंतर मीं विचारलें, "या दिवसांत कुठं जात होतास तूं ?"

"नदीकांठीं अमृतेश्वराचं देऊळ आहे ना, तिथं."

"तिथं जाऊन करीत काय होतास ?"

"कांहीं नाहीं. नुसता दीपमाळेच्या कट्टयावर बसत होतों."

"आठ आणे कुठून आणलेस तूं ?"

रामदासनें मान खालीं घातली आणि तो स्तब्ध झाला.

"कुणी दिले का तुला ?"

खालच्या मानेनेंच त्यानें उत्तर दिलें, "नाहीं सर. आईच्या फडताळां-तून मीं ते घेतले."

"तिला विचारून ?"

रामदासची मान एखाद्या जड वजनाखालीं असल्याप्रमाणें संथपणानें हलली.

" आठ आणे तूं घेतल्याचं किंवा नाहींसे झाल्याचं तिला कळलं आहे कीं नाहीं ? "

रामदास गप्पच राहिला.

" सगळं मोकळ्या मनानं सांग तूं रामदास ! माझी भीति वाटते का तुला ? नाहीं ना ? आईची वाटते का ? "

रुद्ध कंठानें रामदास बोलूं लागला, " नाहीं सर ! पण जर तिला हें सारं कळलं, तर ती रागावेल आणि माझ्याशीं बोलायची नाहीं ती. आपले आठ आणे नाहींसे झाले हें तिच्या ध्यानांत आलं आहे. कारण, तिनं एकदां चौकशी केली. पण ते मीं घेतल्याचं तिला कळलेलं नाहीं. आपल्याच हातून ते कुठंतरी सांडले असं तिला वाटलं असलं पाहिजे."

हें म्हणतां म्हणतांच रामदासच्या डोळ्यांतून अश्रुप्रवाह सुरू झाला.

मी जागेवरून उठलों आणि रामदासच्या जवळ जाऊन त्याच्या पाठीवरून हात फिरवीत म्हणालों, " तूं मुळींच भिऊं नकोस रामदास ! तुझ्या आईला आणि वडिलांना पत्र लिहून सारी हकिकत कळवीन बरं मी ! तूं आठ आणे कोणत्या परिस्थितींत घेतलेस आणि शाळा कां चुकवलीस हें त्यांना कळलं तर ते रागवायचे नाहींत. आणि तेच काय, कुणीहि तुला दोष देणार नाहीं. कारण, तूं हें कांहीं दुष्ट बुद्धीनें केलेलं नाहींस. बरं, तूं आतां वर्गांत जाऊन बैस, त्या दुसऱ्या मुलाचं नांव काय काबरे म्हणालास ना ? त्याची सगळी व्यवस्था मी करतों. तूं मुळींच काळजी करूं नकोस."

रामदास गेल्यावर मीं काबरेला बोलावून घेतला.

भास्कर काबरे हा मुलगा गोरा, तरतरीत डोळ्यांचा आणि धष्टपुष्ट दिसत होता. मीं त्याला निफ, त्याची किंमत, आणि तिच्यावरचें व्याज याची सर्व हकिकत विचारली. आणि त्यानें सुद्धां साऱ्या गोष्टी कबूल केल्या, आणि कबूल केल्या म्हणजे अपराधी माणसानें आपला अपराध कबूल करावा त्याप्रमाणें नव्हे, तर कुणीहि साधी माहिती विचारली तर एखाद्यानें निःशंक मनानें ती पुरवावी त्याप्रमाणें सर्व प्रश्नांचीं त्यानें उत्तरें दिलीं. आपल्या वागणुकींत दोषास्पद असें कांहीं आहे याची त्याला कल्पनाच नसावी हें त्याच्या बोलण्यावरून दिसून आलें. तेव्हां तुझी ही वागणूक कशी अन्यायाचीं आणि दुष्टपणाची झाली तें त्याला समजावून देण्याचा मी

प्रयत्न करूं लागलों. मला पुष्कळच बोलावें लागलें. मी व्यवहारांतल्या उदाहरणांचा दाखला दिला. अंकगणितांतल्या उदाहरणांचा दाखला दिला, त्यामध्यें व्याजाचा दर सामान्यतः काय असतो तें त्यालाच विचारून त्याची स्वतःच्या दराशीं तुलना करण्यास सांगितलें. आपल्या व्याजाच्या पर्वतापुढें मारवाड्यांचे आणि पठाणांचे व्याजाचे दर म्हणजे कस्पटासमान ठरतील हेंहि त्याला पटवून देण्याचा प्रयत्न मीं केला. पण हें सारें त्याला मान्य होऊनहि त्यांत दुष्टपणा किंवा अन्याय आहे हें त्याला मान्य होईना. माझें बोलणें त्याच्यापुढें निष्फळ ठरलें. तो म्हणूं लागला, "सर, पण गोवर्धन व्याज द्यायला कबूल होता, त्यांत त्याची तक्रार कांहीं नव्हती. मग तें घ्यायला काय हरकत असावी! आणखी तुम्ही व्याजाच्या दराविषयीं म्हणालांत तें मी खोटं म्हणत नाहीं, पण एक पैसा व्याज हें मी नेहमींच घेत असतों. कुणी एक आणा, दोन आणे, आठ आणे घेतले तरी देखील एकच पैसा मी व्याज म्हणून घेतों. गोवर्धनला एकाच पैशाची जरूरी होती त्याला मी काय करणार!"

त्याचे हे उद्गार ऐकून माझ्या अंगावर शहारे आले.

शाळेच्या पवित्र वातावरणांत मुलांच्या मनावर चांगले संस्कार व्हावेत म्हणून धडपडणाऱ्या माझ्या मनाला या मुलाकडे पाहून मनस्वी यातना झाल्या.

आणि भोंवतालच्या स्वार्थी, अर्थलोलुप जगामध्यें बेटाप्रमाणें असणाऱ्या या शाळांच्या वातावरणांत दिवसांतला फारच थोडा वेळ घालवणाऱ्या या मुलांच्या मनांवर चिरंतन परिणाम करायला हें एकटें वातावरण किती दुर्बळ आहे या गोष्टीची तीव्र जाणीव त्याच क्षणीं माझ्या मनाला झाली. मला हें दुःख सहन होईना.

पण माझें मन आशा सोडीना. त्या मुलाच्या मनांत मित्रत्व आणि त्याचीं कर्तव्यें यांची जाणीव निर्माण केली पाहिजे. तुझें कृत्य दुसऱ्याच्या अडचणींचा गैरफायदा घेण्याचें होतें, अडचणींत सांपडलेल्या माणसाच्या दुबळ्या परिस्थितीचा फायदा घेऊन त्याला नाडणें किती हीन, त्यांतून आपला मित्र संकटांत असतां त्याला मदत करायचे सोडून तूं त्यालाच उलट पिळायचा प्रयत्न केलास, नव्हे, पिळूनहि काढलेंस, हा तर मोठाच दुष्टपणा, हें त्याला मी पटवून द्यायला लागलों.

पण त्याच्यापुढें माझी ही पोपटपंचीच ठरली.

तो म्हणे, "माझी अट त्याला पसंत नव्हती तर माझं निफ त्यानं घ्यायचं नव्हतं. माझ्या अटी त्यानं कबूल केल्या तेव्हां त्याला त्या पाळणं भाग आहे."

मग मी दुसरीकडून भेद करण्याचा प्रयत्न केला. गोवर्धननें त्याला आठ आणे दिले ते त्यानें कुठून आणि कसे आणले तें सगळें भास्करला सांगितलें आणि म्हटलें, "गोवर्धननें तुझे पैसे देण्याकरतां चोरी केली, त्या चोरीचा सगळा दोष तुझ्यावर येतो, त्या दोषांतून तुझी सुटका व्हायची नाहीं. तुला काय वाटतं ?"

पण भास्कर काबरेच्या मनांतल्या विचारसरणीचीं पाळेंमुळें माझ्या कल्पनेपेक्षां अधिक खोल गेलीं होतीं. तो म्हणाला, "सर, एखाद्या चोरानं उद्यां दुकानदाराकडून खायचे जिन्नस विकत घेतले तर त्या चोरीचा दोष दुकानदाराकडे जाईल का ?"

भास्करचा तो हेका व ती वृत्ति पाहून माझें मस्तक तापलें. पण मन आवरून मीं म्हटलें, "हें बघ काबरे, इतका वेळ मीं तुला सगळं सामोपचाराच्या भाषेत सांगितलं. पण तुला तें कांहींच पटत नाहींसं दिसतं. आतां तुला स्पष्टच सांगणं भाग आहे, कीं या शाळेंत तुला ही असली वागणूक नि व्यवहार चालू ठेवतां यायचे नाहींत, मी ते चालूं देणार नाहीं. तुझ्यामुळं वर्गातल्या मुलांवर अनिष्ट परिणाम होतो आहे. शाळेबाहेर तूं काय करतोस नि कसा वागतोस याच्यावर माझं नियंत्रण नसलं तरी शाळेंत असतांना माझ्या मुलांचं हित मला पाहिलं पाहिजे. तुला आपलं हें असलं वागणं ताबडतोब थांबवलं पाहिजे. आहे कबूल ?"

काबरे कांहींच बोलेना. मान वर करून विलक्षण मुद्रेनें माझ्याकडे तो पाहूं लागला.

"तुला कबूल दिसत नाहीं. मग तुझं नांव मला शाळेंतून काढून टाकावं लागेल !"

तरीहि तो बोलेना.

एक शेवटचा प्रयत्न म्हणून वडिलांच्या धाकामुळें तरी याला सुविचार

सुचतो का पहावा म्हणून मीं म्हटलें, "परंतु हें पाऊल टाकायच्या आधीं सारी हकीकत मला तुझ्या पालकांना कळवावी लागेल"

त्या क्षणीं भास्कर काबरेच्या मुद्रेंत फरक पडला.

"तुझे पालक कोण, तुझे वडीलच का?"

काबरेनें होकार दिला.

"तुझ्या वडिलांना या गोष्टी कळल्या तर त्यांना काय वाटेल कल्पना आहे तुला? कोणत्याहि पित्याला आपल्या मुलाची असली वागणूक आवडायची नाहीं."

काबरे नुसता बघतच होता माझ्याकडे. बाकी इतर हूं नाहीं कीं चूं नाहीं.

"कळवूं तुझ्या वडिलांना?"

रोम्यासारखी आपली निश्चल दृष्टि न ढळवतां तो स्तब्धच राहिला.

"काय रे काबरे! बोलत कां नाहींस तूं? कळवूं का?"

"सर, त्यांना सगळं ठाऊक आहे."

"ठाऊक आहे? कुणी सांगितलं?"

"कुणी दुसऱ्यांनीं कशाला सांगायला हवं? मींच सांगितलं!"

"तूं सांगितलंस? तूं सांगितलंस? त्यावर काय केलं त्यांनीं?"

इतका वेळ तीव्र असलेली काबरेची दृष्टि एकदम स्निग्ध झाली आणि तो म्हणाला, "त्यांनीं माझी पाठ थोपटली आणि ते म्हणाले, 'खरा सावकाराचा बच्चा आहेस!"

सभा चालू असतांना अचानक कुणीतरी मागून आपल्या केसांची बट खसकन् ओढावी, पण सभास्थानीं असल्यामुळें त्या कुणाचें तरी आपल्याला कांहीं करतां येऊं नये तशी माझी मनःस्थिति झाली. माझ्या हातांतला कांचेचा वजनगोळा धपकन् टेबलावर पडला, 'असलं कांहीं असेल हें आधींच कसं आपल्या ध्यानांत आलं नाहीं' असें मनाशीं म्हणत त्या गोळ्याच्या मध्यभागीं सुबकशीं नानारंगीं जीं फुलें बसवलीं होतीं, त्या फुलांकडे, कांचेंत अडकलेल्या त्या सुंदर फुलांकडे, मी वेड्यासारखा पाहत राहिलों.

१९४६

## हिंदी नौकादलांतील एक : : १०

बरीच धावपळ करून मीं बोरीबंदर गांठलें आणि डेक्कन क्वीन पकडली. पण डेक्कन क्वीनमध्यें आज गर्दी चांगलीच दिसत होती. जागेचा शोध करतां करतां एका कंपार्टमेंटपाशीं मी आलों, तों तिघां लोकांत कसला तरी जोराचा वादविवाद चालू होता. त्यांतला एकजण हिंदी होता, एक गोरा सोजिर होता आणि एक पांढऱ्या डगल्यांतला अँग्लो इंडियन रेल्वे अधिकारी होता. त्यांचा तंटा इंग्रजींत चालू होता.

तो रेल्वे अधिकारी त्या गोऱ्या सोजिराला समजावणीच्या स्वरांत सांगत होता, "असं पहा, ही जागा सैन्यांतल्या किंवा नौकादलांतल्या लोकांनीं राखून ठेवली असेल, नाहीं म्हणत नाहीं मी, पण तुम्हांला त्याच्याशीं काय करायचं आहे! त्यांतून हे गृहस्थ तुमच्या जागेवर बसत नाहीं आहेत! मग तुमची तक्रार कशासाठीं!"

त्या गोऱ्या सोजिराची चुळबूळ सुरू झाली.

रेल्वे अधिकाऱ्यानें आवाज जरा कडक करून आपलें बोलणें वज्रलेप केलें, "नाहीं! नाहीं! तुमच्या तक्रारीबाबत मला कांहीं करतां येणार नाहीं. तुम्ही यांना इथं बसूं दिलं पाहिजे!" असें म्हणून तो निघून गेला.

यावर त्या हिंदी माणसानें अगदीं आरामांत, जणुं त्या इंग्रज सोजिराचा पाणउतारा करण्यासाठीं, कात्रीचीं पातीं उघडावींत त्याप्रमाणें आपलें पाय

खूप पसरून अचाटपणें फाकले आणि मान मागें टाकून तो इतक्या बेदर-कारपणें रेलला, कीं मी अगदीं थक्क झालों. शासकाच्या पुढें शासितानें केलेली मगरुरी मला पूर्वीं पाहायला मिळाली होती, पण हा प्रकार कांहीं वेगळाच होता! मला एक प्रकारचें विचित्र पण विलक्षण सुखदायक समाधान वाटलें.

त्या हिंदी गृहस्थानें मग पाय एकदम जवळ आणून एकमेकांवर खाडकन् आपटले आणि पूर्वींच्याच बेदरकारपणें व शांतपणें आपल्या खिशांतून पेटी काढून तो सिगरेट पेटवण्याची तयारी करूं लागला.

तेवढ्यांत माझ्याकडे त्याचें लक्ष गेलें आणि मी उभा आहे हें दिसून येतांच तो म्हणाला, "या हो! तुम्हांला जागा का हवी आहे? इथं खूप आहे जागा! तुमचे आणखी मित्र येण्यासारखे असले तरी घेऊन या!"

माझ्या ओळखीचें कुणी जवळपास न दिसल्याचें सांगून त्याच्याजवळची जागा मीं घेतली आणि बसतां बसतां त्याचे आभार मानले.

त्यानें सिगरेटची पेटी माझ्यापुढें केली आणि म्हटलें, "घ्या घ्या! ओढतां ना तुम्ही?"

आम्ही सिगरेटी ओढूं लागलों.

मीं म्हटलें, "तुम्ही बोलतां आहां मराठी, तेव्हां महाराष्ट्रीय..."

"अर्थात्!" ठसक्यांत तो म्हणाला, "आणि तो सुद्धां नुसतं कुणीं स्मित केलं तरी कृपा झाल्यासारखं वाटून उठल्याबसल्या 'थँक यू' म्हणणारा इंग्रजाळलेला महाराष्ट्रीय नव्हे, तर अस्सल पुण्याचा! मराठ्यांच्या पुण्याचा!"

"भानगड कशाबद्दल चालली होती तुमची?"

"कसली भानगड न् कसलं काय! कुठला भिकारी बूटपुशा शिपुरडा! अन् माझ्यापुढं अक्कड दाखवितो! माझ्याशीं दादागिरी करतो! अन् कां? तर गोरा म्हणून!"

हें बोलतांना 'माझ्याशीं' या शब्दांतील ताठरपणा; ऐट आणि अहंकार मला जाणवल्यावांचून राहिला नाहीं. मीं विचारलें, "आपणांला अजून मीं ओळखलं नाहीं. परंतु आपला कुठल्या राजघराण्याशीं संबंध वगैरे..."

" काय बोलतां हें ? असल्या बोलण्याचा नि त्या मागच्या वृत्तीचा तर नेहमींच तिरस्कार वाटतो मला ! "

त्याच्या या फटकळपणामुळें मी सर्द झालों. मीं विचारलें, " काय ? पण झालं तरी काय ? "

" काय सांगूं ? सहन होत नाहीं. तोंडांतून एकदम कठोर शब्द जातात ! आणि ते रास्त असतात तेव्हां दिलगिरीहि वाटत नाहीं ! "

" पण काय झालं तें सांगाल तर खरं ! " मीं आग्रह धरला.

" काय सांगणार ? आतां बोललांत त्यांत ' तुम्ही 'चं एकदम ' आपण ' केलंत ! आणि कां ? तर मी तुम्हांला राजघराण्यांतला वाटलों म्हणून ! ही वृत्ति जाणार तरी केव्हां आपली ? "

एवढ्यांत गाडी एका स्टेशनांत शिरली. पत्र्यांवरून पुष्कळसे रणगाडे एकाच वेळीं जावेंत त्याप्रमाणें कर्कश कडकडाट झाला आणि मग थोड्याच वेळांत जरा शांतता झाली.

तो पुढें म्हणाला, " आधीं मी राजघराण्यांतला नाहीं. राजघराण्यांतले लोक मस्तवालाशीं मस्तवालपणा करायचे नाहींत. त्यांतून गोऱ्या मस्तवालाशीं तर नाहींच नाहीं ! त्यांचा माजोरीपणा चालायचा दुबळ्या बिचाऱ्या गरीब रयतेपुढं ! पण समजा, मी जरी राजघराण्यांतला असलों, नव्हे प्रत्यक्ष एखादा राजा किंवा महाराजा असलों, तरी माझ्या गांवचा ! तुमच्यावर अरेरावी करायचा मला काय अधिकार ? आणि तुम्हांलाहि आर्जवी भाषा करून लाचारी दाखवायची काय जरूरी ? "

" बरोबर आहे ' तुमचं ' म्हणणं ! " म्हणून मीं चूक पदरांत घेतली आणि दुरुस्तहि केली. नंतर मीं म्हटलें, " आजपर्यंत राजघराण्यांतल्या माणसांशीं माझा दुरूनसुद्धां संपर्क आला नाहीं. त्यामुळं त्यांच्याविषयीं मला कांहींच माहिती नाहीं. पण तुमच्या तोंडून बाहेर पडलेल्या ' माझ्याशीं ' या शब्दामधल्या आवाजामुळं माझी तशी कल्पना झाली. तथापि माझी चूक मला मान्य आहे ! "

त्यानें लागोपाठ दोन तीन झुरके घेऊन धुराचे लोट सोडले आणि स्वतःशींच उद्गार काढले, " माझ्याशीं ! माझ्याशीं ! माझ्याशीं ! "

नंतर रंगांत येऊन तो बोलूं लागला, " या लोकांना आपण कां म्हणून

डरावं ? ते गोरे आहेत म्हणून ? ते जेते आहेत म्हणून ? कीं ते शूर, वीर आहेत म्हणून ? गोरेपणाचा त्यांना दिमाख असला तर असूं दे ! आम्हांलाहि आमच्या काळ्या सांवळ्या रंगाचा अभिमान वाटतो. रंगावरून मोठेपणा जोखायचे दिवस आतां राहिले नाहींत. आणि ते जेते असले तरी त्यांचा तो जय आतां किती दिवस टिकणार तें काळच ठरवील. पण पूर्वीं कधीं काळीं मिळविलेल्या त्या जयाची सारी इमारत आज पार खिळखिळी झाली आहे, हें साऱ्या जगाला दिसतं आहे. आणखी यांच्या पराक्रमाविषयीं म्हणाल, तर त्याची उडी केवढी आहे तें आम्ही प्रत्यक्ष पाहिलं आहे. शत्रूशीं हे सामना देतात तेव्हां हे कुठं राहतात नि आम्हाला कुठं पाठवतात तें आम्ही चांगलं जाणतों. प्रत्यक्ष शत्रूशीं लढायचीच वेळ आली तर हे लोक कसे लढतात तें आम्हांला सिंगापूरला स्वच्छ दिसलं आहे. आपल्या हाताखालच्या लोकांच्या सुरक्षितपणाविषयीं हे किती आणि कसे जागरूक असतात तेंहि आम्ही सिंगापूरला पाहिलं आहे. आणि पळायचा प्रसंग आला तर हे कसा पळ काढतात तेंहि आम्हांला सिंगापूरलाच बघायला मिळालं आहे. लढायच्या वेळीं सरस आम्ही कीं ते, हें तर जागोजाग आमच्या दृष्टोत्पत्तीला येत गेलं. आणि हें सगळं दृष्टोत्पत्तीला आलं आहे म्हणूनच यांना मोठेपणा द्यायचा किती आणि यांना टाफरायचं कसं तें आम्हांला चांगलंच कळूं लागलं आहे ! ”

‘ माझ्याशीं ’ या त्याच्या शब्दांतला ठसका मला आतां चांगला समजला.

तो बोलत होता अस्सल इंग्रजी बोलींत. त्याच्या प्रत्येक शब्दागणिक आमच्या समोरच्या सोजिराचे डोळे विलक्षण होत होते. मला वाटलें, आतां यांची चांगलीच जूतेपैजार होणार !

पण त्याला त्या सोजिराच्या रागाची तमा वाटत नव्हती. जागा झालेल्या ज्वालामुखीच्या तप्त लाव्हा रसाची प्रतिती त्याच्या अक्षराअक्षरांतून येत होती.

तो म्हणत होता, “ पण या उन्मत्तांची धुंदी अद्याप उतरली नाहीं ? आणि मग कधीं कधीं भलतेच प्रसंग उद्‌भवतात. आम्हांला मग अशा वेळीं यांना ताळ्यावर आणावं लागतं ! ”

मीं त्याच्याकडे अशा दृष्टीनें पाहिलें, कीं जणुं तिचा आशय होता,

'बोला, बोला! तुम्हांला काय बोलायचं आहे तें बोला! उन्मत्तांच्या पारिपत्याची कथा ऐकून दलितांचे कान नेहमींच तृप्त होतात!'

तो सांगूं लागला...

* * *

"सिंगापूरच्या धांवपळींत ब्रिटिश रहिवाश्यांना सुखरूप ठिकाणीं पोंचविण्यासाठीं ज्या बोटी काम करीत होत्या त्यापैकीं एकीवर मी कामाला होतों. त्यानंतर व्यापारी जहाजांवर पहारा आणि संरक्षण करणाऱ्या लढाऊ बोटींच्या काफिल्यामधल्या एका बोटीवर मीं काम केलं. आमची बोट दक्षिण आफ्रिकेंतल्या एका बंदरांत त्यावेळीं होती. आम्ही परवानगी घेऊन सिनेमा आणि फुटबॉलचा सामना पाहायला बंदरामध्यें गेलों होतों परत येताना एका हॉटेलांत शिरलों. एका टेबलाशीं बसून 'छोकरा. छोकरा!' म्हणून हांका मारल्या. पण उत्तर आलं नाहीं. म्हणून वैतागून दुसऱ्या हॉटेलांत गेलों. तेथेंहि बराच वेळ कंठशोष केल्यानंतर वेटर आला आणि कुऱ्यांत म्हणाला, 'इथं काळ्या आदमींना आम्ही पदार्थ पुरवीत नसतों.' आम्ही मॅनेजरला बोलावणं पाठवलं. त्यानंहि माजोरीपणानंच उत्तर दिलं, 'हे हॉटेल गोऱ्या लोकांचं आहे! काळ्या लोकांना इथं जागा नाहीं.'

आम्ही ताडकन् उत्तर दिलं, 'आम्ही शाही नौकादलांतले आहोंत. आमची मागणी पुरी झालीच पाहिजे! तुम्हांला ती नाकारतां येणार नाहीं!'

"तो म्हणाला, 'तुम्हांला इथं कांहीं मिळणार नाहीं!'

"आम्ही म्हणालों, 'आम्ही भलाईनं बोलत आहोंत. तुम्ही वाकडे, पणा करीत आहांत. परिणाम चांगले व्हायचे नाहींत!'

"मॅनेजर म्हणाला, 'खूप बघितले आहेत तुमच्यासारखे! काय करायचं असेल तें करा!'

"'ठीक आहे!' असं म्हणून आम्ही उठलों आणि हाताला सांपडेल तें घेऊन काचा बरण्या, आरसे, फोडले. माणसं धांवलीं; त्यांच्या डोक्यांत

हाताला आल्या त्या वस्तू मारल्या, दिवे फोडून अंधार केला आणि मनसोक्त विध्वंस करून झाल्यावर शांतपणानं बाहेर पडलों.

" बाहेर पडलों त्या वेळेला आमचं मन अन्यायाचा प्रतिकार केल्यानंतर येणाऱ्या समाधानानं भरून आलं होतं. आम्हीं केला तो प्रतिकार चांगला होता कीं वाईट होता याबद्दल दुमत होईल. त्याचप्रमाणं त्या प्रतिकारामुळं आमच्या इच्छेनुसार आम्हांला खाद्यवस्तु मिळाल्या नव्हत्या असंहि कुणी म्हणूं शकेल. तथापि सर्वांना हें मान्य करावंच लागेल, कीं झालेला अपमान आम्हीं माना खालीं घालून चडफडत गिळून टाकला नव्हता. त्या परिस्थितींत आम्हांला तेवढीच गोष्ट पुरेशी वाटली आणि आजहि त्या गोष्टीबद्दल मला यत्किंचितहि खेद होत नाहीं. कारण, मला खात्री आहे, कीं अशा प्रकारचे प्रसंग पुष्कळ घडल्याखेरीज आपलं चुकतं आहे हें या लोकांना कळून यायचं नाहीं !...

" हॉटेलपासून दूर अंतरावर आल्यावर आम्हीं स्वतःकडे बघितलं तों बहुतेकांचे कपडे रक्तानं भरलेले होते. दोघांचाच पोशाख त्यांतल्या त्यांत स्वच्छ राहिला होता. त्यांना बोटीवर धाडून आम्हीं चांगले कपडे आणवले. नंतर ते कपडे घालून आम्ही सगळेजण बोटीवर गेलों.

" बंदरांत त्या दिवशीं हिंदी बोट एकच होती. त्यामुळं दुसऱ्या दिवशीं लष्करी पोलिसांनीं मॅनेजरची तक्रार कप्तानाकडे करून आम्हीं हॉटेलांत भोसकाभोसकी केल्याचा रिपोर्ट केला. कप्तानानं आम्हांला जाब विचारतांच आम्ही अर्थातच भोसकाभोसकीची गोष्ट खोटी असल्याचं सांगून हॉटेलच्या मॅनेजरनं आमचा, म्हणजे पर्यायानं 'शाही गणवेशा'चा, अपमान केल्याची हकिकत त्याला सांगितली. त्याचप्रमाणं मोडतोड, विध्वंस केल्याचं आम्हीं सर्व कबूल केलं. पण हें सर्व केलं, तें मॅनेजरनं आम्हांला 'तुम्हांला काय करायचं असेल तें करा' असं सांगितल्यावरच, हें पण कप्तानाच्या निदर्शनास आणून दिलं.

" एक लांबलचक व्याख्यान ऐकायला लावण्याखेरीज कोणतीच शिक्षा कप्तान आम्हांला करूं शकला नाहीं. मात्र त्या टापूंतलीं सर्व हॉटेलं सैनिकांना 'हद्दीबाहेर' असल्याची नोटीस दुसऱ्या दिवशीं बोटीच्या फलकावर लागली.

" पण आम्हांला त्याची काय पर्वा होती ! आमच्या अपमानाचा बदला आम्हीं जिथल्या तिथं घेतला होता. आम्ही नुसत्याच लाथा खाणारे लोक राहिलों नाहींत, हें आम्हीं सिद्ध केलं होतं..."

गाडी या वेळीं कुठल्या तरी क्षुल्लक स्टेशनामधून जात असली पाहिजे. कारण प्रारंभीं भोंगा वाजला, नंतर सांधे बदलल्याचा खडखडाट झाला, त्यानंतर भिरकावलेल्या दगडाप्रमाणें एक दोन मालगाडीचे डबे शेजारून भरकन् मागें गेले, पुन्हा एकदा सांधे बदलल्याचा खडखडाट झाला आणि मग स्थिरस्थावर होऊन गाडीची नेहमींची लय सुरू झाली.

तो पुन्हा म्हणाला, " पण या लोकांच्या प्रत्यक्ष मायदेशांत असलेले यांचे भाईबंद कधीं कधीं मोठे विलक्षण वागतात. हे लोक ऑफ्रिकेंत गेले किंवा हिंदुस्थानांत आले म्हणजे मात्र यांना वारा प्यायलेल्या खोंडासारखी मस्ती येते. त्यांतून आपले लोक यांच्याशीं वागतात ते असे, कीं यांना मस्तीची नशा भरमसाट चढून यांचं माथं भोवतालाच्या हवेंत लुप्तप्राय होतं..."

मीं म्हटलें " आत्तां तुम्ही बोललांत तेव्हां या लोकांच्या मायदेशांतल्या भाईबंदांचा उल्लेख केलात. त्यांचा अनुभव कुठं आला तुम्हांला ? यांच्या मायदेशाला तुम्हीं कधीं गेलां होतां काय ?"

" हो तर ! त्यांच्या व्यापारी जाहाजांचं रक्षण करणाऱ्या लढाऊ जहाजावरून गेलों होतों. तिथं देखील यांच्याइतकेच शिष्ट आणि मस्तवाल लोक आहेत. पण कित्येक चांगलेहि लोक कधीं कधीं भेटतात. त्यामुळं तर कधीं कधीं असा चमत्कारिक प्रसंग येतो, कीं त्यानंतर मन समाधानानं भरून आलं आहे कीं संतापानं भडकलं आहे तेंच कळेनासं होतं !"

" वा वा ! म्हणजे तुम्हांला खूपच विलक्षण अनुभव आले असले पाहिजेत !"

" विलक्षण तर खरेच ! पण त्यांतला एक इतका विलक्षण आहे, कीं मी तो कधींच विसरणार नाहीं !"

" मग सांगा, सांगा ! सांगितलंत तर मोठी बहार येणार आहे ! रोज दिवसांतले सहा साडेसहा तास निष्क्रियतेनं आगगाडींत घालवून आम्ही कलंदर अगदीं रंजीस आलेले असतों. जीव अगदीं कंटाळून जातो. तेवढीच मजा येईल !"

तो जरासा रुष्ट झाला आणि म्हणाला, "तुम्हांला मजा येईल, पण आम्हीं त्या अनुभवांतून गेलों, ते तुम्हांला सांगून मजा आणावी म्हणून नव्हे! ते सांगायला माझी आडकाठी नाहीं. पण नुसत्या मनोरंजनाच्या दृष्टीनं त्यांच्याकडे पाहूं नका!"

मी ओशाळल्यागत होऊन गेलों आणि मनावर आलेली लाज लपवण्यासाठीं खिडकीशीं गेलों. मग संपत आलेली सिगरेट बाहेर भिरकावून दिली. परत जागेवर येऊन बसल्यावर तो सांगूं लागला...

* * *

"आमची बोट त्या वेळीं स्कॉटलंडच्या किनाऱ्याला लागली होती.

"वरिष्ठ अधिकाऱ्याची परवानगी घेऊन भटकती करण्यासाठीं आम्हीं किनाऱ्यावरच्या गांवांत गेलों. आम्ही म्हणजे आम्ही तिघेजण होतों. आमच्यापैकीं एकजण बिहारी होता, दुसरा पंजाबी होता, आणि तिसरा मी, महाराष्ट्रीय. गांवांत गेल्यावर आम्ही खूप हंसलों, खिदळलों आणि भटकलोंहि. गांवांतलीं प्रेक्षणीय स्थळं बघितला आणि संध्याकाळीं भूक लागली तसे खाना घेण्यासाठीं चांगलं दिसलं म्हणून एका हॉटेलांत गेलों.

"निवांत असं कोपऱ्यांतलं एक टेबल आम्हीं पसंत केलं आणि तेथें जाऊन तिघेहि जण बसलों. खाद्यपत्रिका घेऊन वेटर येईल तेव्हां आपण कोणकोणत्या पदार्थांची ऑर्डर द्यायची याविषयीं आमचा आपसांत खल चालू होता. वेटर आला. त्याच्या हातांत खाद्यपत्रिका दिसली नाहीं, तेव्हां आम्हीं विचारलं, 'हें काय? मेनूकार्ड कुठें आहे?'

"तो म्हणाला, 'आम्ही तुम्हांला इथं कांहीं देऊं शकणार नाहीं!'

"दक्षिण आफ्रिकेंतला अनुभव इथंहि यावा याचं आश्चर्य वाटून चमकून आम्हीं तिघांनींहि एकदम विचारलं, 'कां?'

"'यापेक्षां अधिक कांहीं मी सांगूं शकत नाहीं!' तो म्हणाला.

"'मग आम्हींहि सांगतों, कीं कारण कळल्याखेरीज आम्ही इथून हलूं शकत नाहीं!' आमच्यापैकीं नतियानंद नांवाचा (त्याचं मूळ नांव संस्कृत 'नित्यानंद' असलं पाहिजे, पण नतियानंद हें त्याचं भ्रष्ट रूप मात्र रूढ झालं होतं,) पंजाबी होता. तो जरा भडकत्या स्वभावाचा होता, तो हें म्हणाला.

" वेटरनं उत्तर दिलं, ' आपल्याला इथं थांबायला आम्ही आडकाठी करीत नाहीं. पण हॉटेल बंद होईपर्यंत आपण थांबलांत तरी आपली सोय आम्हांला करतां यायची नाहीं ! '

" त्याच्या या बोलण्यांत मगरूरी नव्हती, पण स्पष्टपणा होता.

" मीं म्हटलं, ' मॅनेजरला जरा इकडे धाडतां का ? '

" ' जरूर ! '

" मॅनेजर आल्यावर मीं विचारलं, ' आपला वेटर असं असं म्हणतो आहे, हें खरं का ? '

" खरं आहे ! ' मॅनेजर म्हणाला.

" ' कारण ? '

" ' दुसरा एखादा प्रश्न विचारलांत तर बरं होईल ! '

" ' कारण कळल्याखेरीज आम्ही इथून हलणार नाहीं ! '

" जरासा अस्वस्थच झाल्यासारखा तो मॅनेजर दिसला. नंतर सौजन्यपूर्वक म्हणाला, ' मीं सांगतों, रागावूं नका ! पण माझ्या मित्रांनो, तुम्ही हिंदी आहांत, काळे आदमी आहांत, म्हणून आम्हांला तुमची सोय करतां यायची नाहीं. '

" आम्हां तिघांचींहि माथीं भडकलीं.

" नतियानंद चवताळून म्हणाला, ' आम्ही शाही नौकादलांतले आहोंत, ब्रिटिश प्रजाजन आहोंत ! कायद्यानं काळागोरा हा भेद तुम्हांला करतां यायचा नाहीं ! '

" ' ही गोष्ट मी नाकारीत नाहीं ! ' मॅनेजरनं कबूल केलं.

" आमच्यापैकीं जो बिहारी होता त्याचं नांव होतं बद्रिनारायण. स्वभावानं तो शांत होता. तो म्हणाला, ' असं पहा, कायद्याची भाषा सोडून न्यायाची भाषा आपण बोलूं या ! तुमच्या देशाच्या रक्षणासाठीं तळहातावर शिर घेऊन आम्हीं शत्रूंशीं सामना दिला आहे, तुमच्याकडे आम्ही भीक मागत नाहीं आहोंत. जें जें आम्ही खाऊं त्या त्याबद्दल तुमच्या दराप्रमाणें आम्ही पैसे देणार. मग तुमची हरकत कां ? ' काळ्या आदमीला इथं अन्न द्यायचं नाहीं, असा इथं नियम आहे काय ? '

" ' नियम नाहीं, पण संकेत आहे ! '

" ' मग तो संकेत तुम्हीं मोडायला पाहिजे ! '

" ' माझी इच्छा असली तरी मला तो मोडतां येणार नाहीं. कारण, मला धंदा चालवायचा आहे. तुम्हांला अन्न दिल्याची गोष्ट घडेल एकदांच, परंतु माझं गिऱ्हाईक मात्र कायमचं जाईल! सुरुवातीला हा संकेत मीं मोडला होता एकदां, पण तेव्हां दुकान बंद करायचं कीं काय इथपर्यंत पाळी आली होती. पुन्हां जम बसवायला मला फार प्रयत्न करावे लागले आहेत. व्यक्तिशः माझी कांहीं आडकाठी नाहीं. पण समाजावर जगणाऱ्या माझ्या-सारख्या माणसाला तें बंधन मोडून कसं चालेल ? '

" नतियानंदाला आतां राहवेना. क्षुब्ध होऊन तो म्हणाला, ' ही चर्चा आतां बस्स झाली ! तुमचं हें उत्तर अखेरचं ना ? '

" ' असे रागावतां काय ? माझ्या दृष्टीनं विचार करा. माझं म्हणणं पटायला कांहीं हरकत दिसत नाहीं ! '

" ' तुमच्या दृष्टीनं पहायला सांगतां, आमची दृष्टि तुम्हांला दिसत नाहीं ! !

" ' दिसते ! पण काय करणार ? '

" नतियानंद एकदम उठला. मॅनेजरनं त्याच्या खांद्यावर हात ठेवले आणि म्हटलं, ' मी तुम्हांला एक उपाय सांगतों. पटतो आहे का पाहा. तुम्हांला काय हवं तें मला सांगा. मी गड्याबरोबर तें बाहेर तुमच्याकडे पाठवतों. तें तुम्हां कुठंहि जाऊन खा ! '

" रागावून नतियानंद म्हणाला, ' आम्हांला असली भिक्षा नको ' आम्हांला हक्क म्हणून इथं खायला मिळालं पाहिजे ! '

" हतबुद्ध होऊन मॅनेजरनें खांदे उंचावले."

" नतियानंदानं विचारलं, ' हें तुमचं उत्तर शेवटचं ना ? '

" ' सांगायला खेद होतो; पण ' होय ! '...'

" ' कृपा करून पुन्हा एकदां बोला ! '

" ' सांगायला खेद होतो, पण ' होय ! ' . '

" ' याचे परिणाम चांगले होणार नाहींत ! ,

" ' अधिक काय सांगूं ? '

" ' ठीक आहे ! आम्ही जातों ! '

" मॅनेजरची पाठ वळतांच आम्हां तिघांचें हिंदुस्तानींत बोलणं सुरू

झालं. आम्हीं तिघांनीं आपापसांत कामं वाटून घेतलीं. आम्हीं तिघेहि एकदम उठलों. मी प्रत्येक टेबलावरच्या चादरी वरच्या सामानासकट ओढून तें खालीं पाडून फोडायला प्रारंभ केला. त्याच वेळीं बद्रिनारायणानं बाटल्या नि काचपात्रं खाली आपटून त्यांचा चक्काचूर करायला सुरुवात केली. आणि त्याच वेळीं नतियानंदानं स्वतःखालची खुर्ची उचलून तिच्या पायांनीं आरसे नि भिंतीतलीं कांचेचीं मोठीं तावदानं यांची विल्हेवाट लावण्याचं काम सुरू केलं. आमची ही धामधूम सुरू होतांच एका टेबला-पासच्या दोन बायका किंकाळ्या फोडीत बाहेर पळाल्या. दुसऱ्या एका टेबलाशीं एक गृहस्थ दारू पीत होता तो नतियानंदाच्या अंगावर धावला, तेव्हां त्याला नतियानंदानं हातांतल्या खुर्चीनं एवढ्या जोरांत ढकलून दिलं, कीं तो आमचीं धामधूम संपेपर्यंत पुन्हा उठलाच नाहीं. तेवढ्यांत दूरच्या टेबलापाशीं बसलेले तिघे गृहस्थ प्रतिकार करण्यासाठीं धावले. तशी मॅनेजरनं त्यांना अडवलं आणि सांगितलं, 'काय करतील तें करूं द्या त्यांना, जबाबदारी माझी!'

"एवढं म्हणून तो शांतपणानं आमची ही सारी क्रीडा पाहूं लागला. पुरेसा विध्वंस केल्यानंतर आमचा राग शांत झाला. आणि मग आम्ही दाराच्या दिशेनं धीरे धीरे पावलं टाकीत जाऊं लागलों.

"दारांतून दोन पोलीस आंत येत होते."

"बद्रिनारायणानं विचारलं, 'काय करायचं? धक्के मारून पसार व्हायचं काय?...'

"नतियानंद म्हणाला, 'नाहीं! अटक होऊं दे! आपल्याला कोर्टांत सारी कैफियत मांडून बोंबाबोंब उडवून देतां येईल?'

"आमच्या दिशेनं भराभरा पावलं टाकीत पोलिस येत होतेच.

"पण ते आम्हांला अटक करूं शकले नाहींत.

"कारण, त्यांना अडवून मॅनेजरनें सांगितलं, 'ही जागा खाजगी आहे, तुम्हांला मीं बोलावलं नाहीं. तुम्हांला इथं यायची जरूरी नाहीं.'

"'मग गडबड कसली चालली होती? अन् ही फोडाफोडीची आणि मोडतोडीची भानगड काय आहे?' पोलिसांनीं विचारलं.

"मॅनेजरनं थोडक्यांत हकिकत सांगितली. आम्ही ती ऐकत होतोंच.

त्यानं साऱ्या गोष्टी जशा घडल्या तशाच सांगितल्या. पण बोलतांना त्याच्या स्वरांतून आमच्याविषयीं सहानुभूति व्यक्त होत होती आणि यानंतर त्यानं शेवटीं जे उद्गार काढले त्यानं तर आम्ही सर्दच झालों! कारण तो म्हणाला, ' असल्या परिस्थितींत माझ्यावर हा प्रसंग आला असतां तरी मीं हेंच केलं असतं ! '

" पोलिसांनीं म्हटलं, ' तुम्ही तक्रार नोंदवा. यांना गुंडगिरीबद्दल चांगली शिक्षा ठोठावतां येईल ! '

" मॅनेजर म्हणाला, ' यांच्याविरुद्ध माझी तक्रार नाहीं ! '

" भारावलेल्या अंतःकरणानीं आम्ही बाहेर पडलों. आम्हांला सुख होत होतं कीं दुःख होत होतं, तें आम्हांला कळेना ! मलमाचा दाट लेप दिलेल्या शस्त्रानं जखम व्हावी आणि जखम होतां होतांच मलम लागत जावं तशी आमची स्थिति झाली होती. या प्रसंगाची चर्चा देखील आम्हांला करवेना. आम्ही स्तब्धपणानं पावलं टाकीत परत चाललों होतों.

" त्या रात्रीं खाना न घेतांच आम्ही उपाशीपोटीं बोटीवर परतलों..."

हें सगळें तो महाराष्ट्रीय तरुण इंग्रजींतच सांगत होता. त्या इंग्रज सोजिराच्या मुद्रेवर काय काय भाव उमटत होते ते आम्ही मोठ्या उत्कंठेनें पाहत होतों.

गाडी कर्जत स्टेशनांत शिरून थांबली. तो महाराष्ट्रीय तरुण म्हणाला,

" या युद्धामुळें अनेक तोटे झाले. तसेच अनेक फायदेहि झाले. त्या सर्वांमध्यें एक गोष्ट मात्र निश्चित, कीं आम्ही आतां पूर्वींचे राहिलों नाहींत. यापुढं या इंग्रजांची फुकट मगरुरी किंवा दादागिरी केवळ ते गोरे आहेत एवढ्याच कारणामुळं आमच्यापुढं चालायची नाहीं. यांना तर आम्ही चांगले ओळखूं लागलों आहोंतच, पण आतां आम्हांला स्वतःलाहि आमची योग्यता कळून आली आहे."

गाडीनें कर्जत सोडलें तशी त्यानें सिगरेटची डबी काढली. स्वतःसाठीं त्यानें एक घेतली, मलाहि एक दिली आणि समोर बसलेल्या त्या गोऱ्या सोजिरापुढें डबी करीत विचारलें, " सिगरेट घेणार काय ? "

त्यानें एकदां विचित्र हास्य केलें, सिगरेट घेतली आणि म्हटलें, " थँक यू !"

तिन्ही सिगरेटी पेटल्यावर धूर सोडतां सोडतां तो महाराष्ट्रीय तरुण

इंग्रज सोजिराला म्हणाला, " इतक्या सगळ्या प्रकारानंतर आतां एक विलक्षण बातमी तुम्हांला सांगतों ! ही जागा मला तुम्ही घेऊं देत नव्हतां, कारण, ती नौकादलांतल्या तिघांनीं म्हणे, राखून ठेवली होती. खरी गोष्ट अशी, कीं त्यांतला एकजण मीच ! बाकीच्या दोघांना येणं जमलं नाहीं म्हणून ते आले नाहींत."

तो गोरा सोजीर आ वासून त्याच्याकडे पाहूं लागला.

* * *

पुणें स्टेशनावर उतरल्यानंतर बाहेर पडतां पडतां त्या महाराष्ट्रीय तरुणाला मीं विचारलें, " तुम्ही कोण हें मला शेवटपर्यंत तुम्हीं सांगितलंच नाहीं ? "

" त्यांत काय अवघड आहे ? हिंदी नौकादलांतील एक ! "

" तसं नव्हे ! पण तुमचं नांव गांव वगैरे..."

" नांवांतच काय विशेष ? "

" तसं नाहीं ! पण कळलं असतं तर बरं झालं असतं ! "

" नांवाला कांहीं महत्त्व नाहीं ! आमच्यापैकीं कुणीहि तुम्हांला भेटला तरी त्याच्या ठिकाणीं तुम्हांला हाच फरक पडलेला दिसून येईल ! आणि माझी तुम्हांला आठवण राहणार असेल तर ती माझ्या नांवानं नको ! आजच्या हिंदी नौकादलांतील एक अशी राहणार असेल तरच राहूं दे ! "

एवढें म्हणून स्टेशनच्या आवारांतल्या पिवळ्या नारिंगी विचित्रप्रकाशाच्या झोतांत परमावधीच्या चैतन्यानें कांठोकांठ भरलेलीं पावलें टाकीत तो शिरला आणि लागलीच दिसेनासाहि झाला.

१९४७

# आंदोलन : : ११

आदल्या दिवशीं संध्याकाळीं गांवांतला सुप्रसिद्ध आणि लोकप्रिय कार्यकर्ता पोलिसांच्या हातीं सांपडला होता आणि त्याला त्यांनीं तात्काळ अटक केली होती. तेव्हां तिचे पडसाद दुसऱ्या दिवशीं गांवांत सगळीकडे उठणार ही सर्वांची अपेक्षा होतीच.

त्याप्रमाणें वागीश्वरी विद्यालयांतहि ते उठलेच. आधीं साऱ्या वर्गांत मुलेंच आलेलीं नव्हतीं. जीं कांहीं थोडींबहुत आलीं होतीं तीं देखील एकेका वर्गांत चार पांच, चार पांच अशींच. अशा परिस्थितींत अभ्यास तो काय नि कसला घेणार! शाळा सोडून द्यायचीहि सोय नव्हती. योग्य कारणा-वांचून सोडल्याबद्दल सरकारी शाळाखात्याचा झक्कू मागें सुरू झाला असता. शिक्षक वेळापत्रकाप्रमाणें वर्गांवर गेले, खुर्चींवर बसून कुठेंतरी पहात राहिले, आणि मुलें शिसें मोडलेल्या पेन्सिलीनें किंवा बोटानें कागदावर, डेस्कावर किंवा कुठें जागा सांपडली तेथें, न उमटणाऱ्या रेघोट्या काढीत व गिरवीत वेळ काढूं लागलीं. कांहीं वर्गांमधून तर कोपऱ्यांतल्या एखाद दुसऱ्या बाकावर बसून आपापसांत अगदीं हलक्या आवाजांत नुसती कुजबुज करीत मुलांचा वेळ जाऊं लागला.

सर्वांच्याच मनावर भकासपणा, सुन्नपणा, आलेला होता.

'आपलं कर्तव्य काय?' मधेंच एखाद वेळेला शस्त्राच्या धारेसारखा हा विचार बापूरावांचें काळीज चिरीत जाई. त्यानंतर मग उलटसुलट

विचार, धैर्य आणि भय यांचें द्वंद्व, न्याय आणि अन्याय यांची पारख, मस्तकांत कल्लोळ, कल्लोळ...आणि मग पुन्हा मनावर सुन्नपणा...

चळवळ बरेच दिवस थंडावली होती. ती आज पुन्हा उफाळून आली होती. ' लोक तुरुंगांत जातील, मार खातील, हालअपेष्टा भोगतील, पिळून, पिचून, खचून बाहेर येतील. त्यांच्यापैकीं कांहीं जणांचीं मनं खंबीर होतील तर कित्येक पार भेदरून जाऊन थंड होतील. पण आपलं काय? दिवस हळूहळू चाललेच आहेत. आजचा, उद्यांचा, परवांचा...आणि कित्येक जातील. आणि मग आयुष्यांतला अगदीं शेवटचा दिवस उजाडेल तेव्हां आपल्या डोळ्यांपुढं सगळ्या गत-जीविताचा पट उभा राहील. त्याचा क्षणमात्र आपण आढावा घेऊं. जीवन सार्थकीं लागलं असं आपल्याला वाटेल असं एक तरी कृत्य झालेलं आहे का आपल्या हातून? आपण स्वतःलाच विचारूं...आहे का झालं? व्यर्थ! व्यर्थ!...'

आपल्या मरणाच्या क्षणीं आपल्या मनाभोंवतीं कोणते विचार घोटाळत राहतील याचा विचार करतां करतां बापूरावांचें मन सरतेशेवटीं पुन्हा बधिर झालें...

वागीश्वरी विद्यालयाच्या कोपऱ्याशीं दोन रस्ते एकमेकांना छेदून गेल्यामुळें तेथें एक चौक तयार झाला होता. त्या चौकाशीं टेलिफोनच्या तारांचा खांब होता. कांहीं तरुणांनीं तो नुकताच पाडून टाकला होता आणि आतां त्याच्या तारांची ते विल्हेवाट लावीत होते. जवळच चौकाच्या मध्यभागीं विलायती टोप्यांची एक छोटीशी होळी करण्यांत आली होती आणि रस्त्यानें येणाऱ्याजाणाऱ्यांपैकीं ज्या कुणाच्या डोक्यावर हॅट असेल त्याच्या त्या हॅटची आहुति परकीय सरकारच्या राजवटीविरुद्ध उभारलेल्या त्या प्रतीकात्मक होमांत पडत होती. आरडाओरड, घोषणा चालूच होत्या.

गांवांत दंगलीचें वातावरण पसरलें असून दुसऱ्या एका शाळेच्या समोर गोळीबारहि झाला, ही बातमी तेवढ्यांत शाळेंत येऊन पोंचली. शाळेच्या कोपऱ्याशीं ही गडबड चाललीच होती. तेव्हां या दोन्ही गोष्टींचा विचार करून तसाच कांहीं प्रसंग यायच्या आधींच, मुलांच्या जीवितास धोका पोंचूं नये या कारणास्तव—सरकारी शाळाखात्यानें चौकशी करण्याचें मनांत आणलें

असतें, तर हें कारण उचित ठरलें असतें–शाळेंत हजर असलेल्या मोजक्या मुलांना तडक घरीं जाण्याची सूचना देऊन लागलीच शाळा बंद करायची असा निर्णय चालकांनीं घेतला.

थोड्याच वेळानंतर बापुराव सुळाखे घरीं पोंचले ते विलक्षण मनः-स्थितींतच. त्यांच्या मनाची जी घालमेल चालली होती तिचा त्यांनाहि नीट पत्ता लागेना.

माणसाचें मन काय विलक्षण आहे पहा! एका मानसशास्त्रज्ञानें म्हटलें आहे, कीं मानवी मनाच्या भावना म्हणजे जणुं दुथडी भरून वाहणारी नदी. आपण जे शब्द वापरतों ते त्या नदीच्या प्रचंड पात्रांतून आपल्या दुबळ्या हातांनीं धडपडत छोट्याशा पोहऱ्यांनीं शेंदून काढलेलें अगदीं थोडें पाणी. त्या मानानें मानवी भावनांच्या नदीचा ओघ केवढा मोठा! स्वतः बापूरावांना आपल्या मनांतल्या ओघाची नुसती जाणीव होत होती. त्याचा थाग लागत नव्हता. तो आवरतां तर येतच नव्हता, पण त्याचें आकलनहि होत नव्हतें. मग दुसऱ्यानें तो प्रयत्न केला तर तो कितीसा यशस्वी होणार?...

वागीश्वरी विद्यालयांत बापूराव सुळाखे गणित आणि शास्त्र विषयाचे शिक्षक होते. शिक्षकाची जातच आधीं हाडाची गरीब, सौम्य आणि सोज्ज्वळ. त्यांतून बापूरावांच्या मनांत न्यूनगंडानें ठाण मांडलेलें असे. अहंगंड वाटावा अशी त्यांची सांपत्तिक स्थिति तर नव्हतीच नव्हती, पण दुसऱ्याला कधीं वर्णन करून सांगतांना किंवा स्वतःशींच विचार करतांना जिचा अभिमान वाटावा अशी एकहि गोष्ट आजपर्यंतच्या त्यांच्या आयुष्यांत घडली नव्हती. त्यांनीं कधीं कुणाशीं कडाक्याचें भांडणहि केलें नव्हतें! मग त्यांत जय मिळवल्याच्या समाधानाची वार्ता कुठून असणार?

आत्मिक समाधान आणि अभिमान वाटण्यास कारण असणारी सर्वश्रेष्ठ गोष्ट बापूरावांच्या मतें कोणती असेल? तर ती देशासाठीं वाटणारी प्रीति, भक्ति आणि तिच्यापोटीं उद्भवणारा प्रसंगोपात्त त्याग. परंतु त्यांच्या मनांत देशाविषयीं प्रीति आणि भक्ति कितीहि तीव्र असली तरी ती त्यांच्या मनांतच राहिली होती. देशप्रीतीमुळें लोकांनीं दाखवलेल्या अतुल धैर्याचीं आणि त्यागाचीं वर्णनें वृत्तपत्रांतून किंवा इतरत्र वाचल्या-ऐकल्यामुळें

झालेल्या आनंदाव्यतिरिक्त त्यांच्या हातून प्रत्यक्ष त्यागाच्या रूपानें देशभक्ति किंवा देशसेवा कधींच झाली नव्हती. आणि यामुळेंच असल्या आनंदाच्या प्रत्येक क्षणीं त्याच्या मनांत उद्भवणाऱ्या खंतीच्या दुःखाची सूक्ष्म पण तीव्र कड त्या आनंदाला असे.

या साध्या गोष्टींचा परिणाम मात्र हा झाला होता, कीं मनाशींच सतत विचार करीत राहणाऱ्या माणसाप्रमाणें त्यांच्या मनाला एक प्रकारचा चमत्कारिक हळवेपणा आणि दुबळेपणा आला होता.

त्या दिवशीं संध्याकाळीं बापूराव आपल्या शिकवणीच्या मुलांना भूमिति शिकवीत होते. प्रमेय समजावून देऊन त्याची सामान्य प्रतिज्ञा त्यांनीं मुलांच्या करवीं घटवून घेतली ..

"दोन त्रिकोण एकाच पायावर उभे असून एकाच समांतररेषायुग्मांत बद्ध असतील तर ते समक्षेत्र असतात."

या प्रमेयाची सिद्धता आपल्या शिष्यांकडून ते आतां लिहवून घेणार तोंच त्यांना दारांतून हांक आली आणि तिच्यामागून लागलीच ती हांक मारणारी व्यक्तीहि त्यांच्यापुढें उभी राहिली.

चंद्रशेखर !

चंद्रशेखरला बघतांच बापूरावांच्या मनांत कोणता विचार आला असेल ? मोठा विलक्षण विचार होता तो. आणि तो विचार करण्याची पद्धति तर एखाद्या हरिदासी थाटाची होती.

बापूराव मनाशीं म्हणाले, 'हा चंद्रशेखर आणि मी दोघेहिजण एकाच शिक्षणाच्या पायावर उभे राहिलों. आणि आर्थिक परिस्थितीच्या एकाच समांतररेषायुग्मांत बद्ध झालों. परंतु आमचीं क्षेत्रं कुठं समान ठरलीं ? हा चंद्रशेखर कळकळीनं काम करणारा राजकीय कार्यकर्ता झाला आणि मी या क्षुद्र शाळेंतला एक शिक्षक झालों. माझ्या ठिकाणीं देशाविषयीं भक्ति, प्रीति आहे का ? कळकळ आहे का ?... मग मी त्याच्यासारखा कां नाहीं झालों ?...माझं मला देखील कांहीं कळत नाहीं !...

आणि मग पुन्हां मघांचें तें प्रमेय आठवून बापूराव मनाशीं म्हणाले, 'आपल्याकडे शाळेंतल्या शिक्षणाचा बाहेरच्या जगाशीं कांहीं संबंध असत नाहीं असं म्हणतात, त्याचा आणखी हा एक पडताळा !...'

आतां असला बालिश विचार करणाऱ्या या भोळ्या जीवाला काय म्हणणार!

या विचारामध्यें बापूरावांचा एक क्षणच गेला असेल. त्यांच्या विमनस्क चर्येकडे पाहत चंद्रशेखर त्यांना म्हणाला, "जरा अंगणांत येतोस? तुझ्याशीं थोडं बोलायचं आहे."

बापूरावांनीं लागलीच आपल्या मनांतले उदास विचार आवरले आणि प्रमेयाची सिद्धता मुलांना स्वतःच लिहायला सांगून ते चंद्रशेखरबरोबर अंगणांतल्या प्राजक्ताच्या झाडाखालीं आले.

एवढ्यांत आपण चंद्रशेखरला कुशलसुद्धां विचारलें नाहीं याची बापूरावांना आठवण झाली आणि ते म्हणाले, "खुशाल आहेस ना? प्रकृति तितकीशी बरी दिसत नाहीं!"

"प्रकृति ठीक आहे कीं! तिला काय झालं आहे? जरा धावाधाव करावी लागते, त्यामुळं जरा··तरी पण तुझी नुसती कल्पनाच आहे ती!"

बापूराव आतां रंगांत आले. त्यांनीं विचारलें, "पण हें पांखरूं मोकळं कसं? तुरुंगांतून नुकतंच सुटून आलं आहे कीं पळून निसटून?"

चंद्रशेखरनें हंसून उत्तर केलें, "छे छे! सुटूनहि नाहीं नि निसटूनहि नाहीं! या पांखराला धरायचे प्रयत्न तर खूपच चालू आहेत! आतांपर्यंत तरी मागं लागलेल्यांच्या हातावर तुरी देऊन निसटत आलों आहे खरा! निभेल तितक्या दिवस निभेल! नाहीं तर 'एक दिन जाना रे भाई' आहेच!"

"कुठून आला आहेस तूं? आत्ता कुणी मागं आहे कीं काय तुझ्या?" हें म्हणतां म्हणतां मघांची मनःस्थिति बदलून भीतीची एक लाट बापूरावांच्या हृदयांतून उसळली आणि चंद्रशेखरनें नकारार्थी मान हलवतांच ती ओसरूनहि गेली!

"रात्रीं जेवायला राहतोस का माझ्याकडे? तुझ्या वाऱ्यावरल्या संसारांत तुला धड जेवायलाहि मिळालं नसेल. माझ्याकडची मीठभाकरी खा!"

"जेवणाचं आपण नंतर बोलूं. माझं काम सांगतों आधीं."

"बोल! काय आज्ञा आहे?"

" महेंद्र सदावर्ते हें नांव ऐकलं आहेस तूं ? "

" वा वा ! नांवच काय, पण पोलिसांच्या हातावर तुरी देऊन निसटण्याच्या त्यांच्या कथाहि ऐकल्या आहेत. मुंबईला राहूनच या चळवळीच्या इकडच्या भागांतलीं सूत्रं चालवतात ना ते ? "

" इतके दिवस मुंबईला होते. पण त्यांना कांहीं दिवस मुंबई सोडावी लागणार आहे. त्यांनीं इथं यायचा विचार व्यक्त केला तेव्हां त्यांचं तात्पुरतं पहिलं आश्रयस्थान म्हणून माझ्या डोळ्यांसमोर तुझं नांव उभं राह्यलं. तूं शिक्षक आहेस. तुझा कुणाला संशय यायचा नाहीं..."

चंद्रशेखरनें हें म्हणतांच बापूराव त्याच्याकडे विलक्षण दृष्टीनें पाहूं लागले. त्यांचा अहंकार दुखावला गेला होता. मग त्यांच्या मनांत तीव्र न्यूनत्वाची पुन्हा एक लाट आली आणि त्यांची मुद्रा कशीशीच झाली.

त्यांच्या मनाची ही घालमेल चंद्रशेखरनें ओळखली. त्यांच्या पाठीवर हात ठेवून स्नेहपूर्ण स्वरांत तो म्हणाला, " बापू, तुला दुखवावं म्हणून मी बोललों नाहीं. तुझं नांव माझ्यासमोर आलं त्याचं फक्त कारण सांगितलं. तुझ्याविषयीं किंवा तुझ्या पेशाविषयीं माझ्या मनांत तिरस्काराची भावना कशी बरं असेल ? ती तशी असती तर तुझ्याकडे मी आलोंच नसतों. न्यायाच्या बाजूनं ज्याला लढायचं आहे त्याला सामान्यजनांविषयीं तिरस्कार बाळगून कसं बरं चालेल? त्याच्या लढ्याचा अंतिम हेतु तरी काय ? सामान्य जनाचं सुखच ना ? तुझ्या आश्रयाला मी महेंद्रांना सोंपवणार तें काय तुझ्याविषयीं मला तिरस्कार वाटतो म्हणून ? छे छे ! तूं काय हा भलताच गैरसमज करून घेतलास ! "

या बोलण्यानें बापूरावांच्या मनांतलें सारें किल्मिश नाहींसें झालें.

महेंद्र पोलिसांना चुकविण्यासाठीं इथं येणार. कारण ते जर अडकले तर आमचा श्वासच बंद केल्यासारखा होईल. आणि त्याबरोबरच आम्हीं काम चालू ठेवणारी मंडळी..."

" बरं, मग माझं काम या प्रकरणांत...म्हणजे माझ्या आश्रयाला महेंद्र..."

" एका रात्रीपुरतं त्यांना संरक्षण देण्याचं काम तूं आपल्यावर घ्यावंस ही माझी इच्छा, म्हणून मी आलों. ते कधीं येतील तें अद्याप नक्की नाहीं. पण येत्या तीन चार दिवसांत रात्रीं नवाच्या मेलनं किंवा कदाचित् पहाटेच्या

पहिल्या पॅसेंजरनं येतील. तुझ्याकडे काम एवढंच, कीं ते आले, कीं मी सांगून ठेवीन त्या ठिकाणीं वर्दी द्यायची. त्यांना तुझ्या घरून हलवण्याची व्यवस्था आम्ही बहुतेक दुसऱ्याच दिवशीं करूं."

या असल्या भानगडींत आजपर्यंत बापूरावांनीं कधीं म्हटल्या कधीं सुद्धां अगदीं पुसटदेखील भाग घेतला नव्हता. असल्या गोष्टींत धोका असणारच, तेव्हां ही गोष्ट आपल्याला यशस्वीपणानें पार पाडतां येईल कीं नाहीं हीहि शंका त्यांच्या मनाला ग्रासूं लागली. नवीनपणामुळें त्यांची छाती धडधडूं लागली. त्यांच्या गळ्यांतून ओढल्या आवाजांत शब्द आले, "त्यांना संरक्षण द्यायचं म्हणजे काय करायचं !"

चंद्रशेखर मुद्दामच बेदरकारपणानें म्हणाला, "त्यांना बाहेर घालवून द्यायचं नाहीं ! आणि त्यांना जेवायचं असेल तर जेवायला घालायचं. आणखी...आणखी दुसरं काय? ते आल्याची पोलिसांना वर्दी द्यायची नाहीं!"

हें म्हणून चंद्रशेखर एवढ्या मोठ्यानें हंसला, कीं बापूरावांना जवळपास कुठें तरी एखादी जुनी इमारत कोसळल्यासारखें वाटलें. त्या हंसण्याची प्रतिक्रिया होऊन बापूरावांच्याहि चर्येवर क्षीण हास्य चमकलें आणि नंतर कांहींशा बिचकल्या स्वरानें त्यांनीं चंद्रशेखरला प्रश्न केला, "शेखर, तुम्हां लोकांना पोलिसांची कधींच भीति वाटत नाहीं का रे? माझा पोलिसांशीं उभ्या आयुष्यांत कधीं संपर्क घडला नाहीं. अगदीं सायकलीला दिवा नसल्याबद्दल किंवा चुकीच्या बाजूनं ती चालवल्याबद्दल देखील कधीं संबंध आला नाहीं! मी हें विचारतों आहें याबद्दल तूं हंसशील मला, पण तुम्हांला या डगल्यांतल्या राक्षसांबद्दल कधींच भय वाटलं नाहीं का?"

चंद्रशेखरनें बापूरावांच्या भाबड्या चर्येकडे एकदां पाहून मघांच्यासारखेंच हास्य केलें आणि म्हटलें, "काय सांगूं तुला बापू! पोलिसांची ज्याला भीति कधींच वाटली नाहीं असा अद्याप तरी एकहि माणूस मला भेटला नाहीं. परंतु एक तर पहिल्यांदा भीति वाटली तरी पुढं पुढं मन घट्ट होत जातं, आणि दुसरं असं, कीं हातीं घेतलेल्या कामावर श्रद्धा आणि भक्ति असली, कीं कालांतरानं त्या भीतिचा जोरहि अगदीं क्षीण होत जातो."

बापूरावांना आपल्या कर्णरंध्रांतून अमृताचा रसच कोणी ओतीत आहे असा भास झाला. एका क्षणापूर्वींच पोलिसांना भिणारे पृथ्वीच्या पाठीवर

काय ते एकटे आपणच, या विचारानें त्यांचें मन एकदम उदास झालें होतें. त्यांत आतां पुन्हा उत्साह आला, आणि तो चंद्रशेखरच्या पुढच्या बोलण्यानें अधिकच वाढला, "स्वार्थासाठीं दुसऱ्यांना नाडून काळाबाजार करणारे शेठ, सावकार, व्यापारी हे सुद्धां केवळ मन निगरगट्ट असल्यामुळं पोलिस अधिकाऱ्यांना वाटेल तसं टाफरायला कमी करीत नाहींत, मग निःस्वार्थ-पणानं देशाचं काम करणाऱ्या माणसाच्या ठिकाणीं असलेल्या नैतिक धैर्या-पुढं त्यांची काय कथा ?"

चंद्रशेखर आणखीहि पुढें बोलत होता. तें सगळें बापूराव उत्कंठेनें पिऊन घेत होते. आणि त्याचबरोबर त्याच्या प्रत्येक शब्दागणिक त्यांच्या मनांतल्या तरल भावांच्या सूक्ष्म धाग्यांना पळि पडत होता.

चंद्रशेखरनें शेवटीं विचारलें, "मग तूं करशील ना हें काम ?"

बापूरावांनीं उत्तर दिलें, "मला विचार करायला थोडा अवधि दे... पण मला आधीं हें सांग, मीं नाहीं म्हटलं तर काय व्यवस्था करणार आहेस ?"

"दुसरीकडे सोय करावी लागेल मला. आणि विचार करायला अवधि हवा आहे म्हणतोस तर घे, माझी कांहीं हरकत नाहीं. पण उद्यां सकाळ-पर्यंत तरी उत्तर सांगतां येईल ना तुला ?"

बापूरावांनीं रुकार दिला.

"वहिनी कुठं गेल्या आहेत ?"

"मंडईत गेली आहे ती ! कशासाठीं विचारलंस ?"

"त्यांना यातलं किती सांगायचं नि काय सांगायचं, किंवा कांहींच सांगायचं नाहीं तें तुझं तूं ठरव. माझं मत विचारशील तर मात्र मी सांगेन, कीं या गोष्टी कळल्यामुळं त्यांचं वागणं गांगरल्या-घाबरल्यासारखं होणार असेल तर कांहींच न सांगतां नुसता एक पाहुणा आला आहे एवढ्यावरच वेळ निभावून ने."

"छे छे ! अरे, ती गांगरल्यासारखं तर नाहींच करायची, उलट मलाच क्वचित् प्रसंगीं तसं व्हायला लागलं तर ती माझा धीर खचूं द्यायची नाहीं. किंबहुना मीं विचाराला थोडा अवधि मागितला तो तेवढ्याचसाठीं. माझ्याकडून मीं होकार मनानं दिलाच आहे. पण मला

तिचाहि आधार हवाच हवा. कांहींच परिचय नसलेला पाहुणा घरीं येऊन राहणार आणि तिला कांहींच सांगायचं नाहीं; काय कल्पना होईल तिची?"

"तें आपलं तुझं तूं ठरव! माझं कांहीं म्हणणं नाहीं."

"उशीरांत उशीरां तुला केव्हां उत्तर हवं?"

"उद्यां सकाळपर्यंत. चालेल ना? कारण, दुसरी व्यवस्था करावी लागणार असेल तर ती करून मुंबईला परत कळवायला सवड हवी."

बापूराव म्हणाले, "बरोबर आहे."

चंद्रशेखर म्हणाला, "तुझ्या घराच्या बाबतींत सारी माहिती परवां मुंबईहून येतांना महेंद्रांना मी देऊन आलों आहें. कारण, तूं नाहीं म्हणणार नाहींस अशी मला जवळ जवळ खात्रीच होती. खरं म्हणजे महेंद्र जाणार होते खानदेशांत. परंतु..."

त्याला बापूरावांनीं एकदम अडवलें आणि म्हटलें, "शेखर, जरूरीपेक्षां अधिक माहिती मला तूं सांगूं नयेस हें चांगलं!"

चंद्रशेखर चकित होऊन त्यांच्याकडे पाहूं लागला. तो म्हणाला, "यांत गुप्त ठेवण्यासारखं, निदान तूं इतकं करायला तयार होतो आहेस तेव्हां..."

"त्याचं असं आहे शेखर, तूं फार पुढं गेलेला आहेस. माझा या गोष्टीला अद्याप बाहेरूनच स्पर्श होतो आहे. हें काम अंगावर घ्यायला माझ्या पत्नीचा रुकार मला मिळेल याबद्दल मला शंका नाहीं. महेंद्र एकच दिवस माझ्याकडे राहणार हें ठरल्यासारखं असलं, तरी वेळ आहे, प्रसंग आहे, एका दिवसांत त्यांना दुसरीकडे निसटायची संधि नाहीं मिळाली तर दोन दिवस, तीन दिवस किंवा कदाचित् एक आठवडाभर देखील त्यांना माझ्याकडे राहणं भाग पडेल. निदान रुकार देतांना स्वतःच्या मनाशीं ही गोष्ट मी गृहीत धरून चालणार आणि तशीच मनाचीहि तयारी करणार. आणि तयारी करणार म्हणजे रुकाराचे संभाव्य परिणामहि भोगायची तयारी करणार. अशा परिस्थितींत समज, मला पोलिसांनीं अटक केली, तर साहजिकच ते महेंद्रांविषयींची जास्तींत जास्त माहिती माझ्याकडून काढायचा प्रयत्न करतील. ती काढायसाठीं ते कदाचित् माझे हालहि करायला कमी करतीलसं वाटत नाहीं. आतांशा पोलिसांची गत तर 'आधींच तसलं नि त्यांत बैलावर बसलं' यासारखी! त्यांनीं मला झोंप घेऊं दिली नाहीं, किंवा

बर्फाच्या शिळेवर बसवून ठेवलं, किंवा मांडीवर पहार दाबून ती लाटण्या-सारखी पुढं मागं फिरवली, किंवा गळ्यापासून पायापर्यंत भोंगळ लुगी नेसायला लावली आणि आंत खारकुंडी सोडून लुंगीचं तोंड गच्च बांधून टाकलीं, तर...हसूं नकोस,...पोलिशी समज देण्याचा, ज्या गोष्टी आजवर सांगोवांगीं माझ्या कानांवर आल्या आहेत त्यांवरून मीं त्यांच्यावर मात करूं शकेनच याची मला स्वतःला ग्वाही देतां येत नाहीं. कांहीं माहितीच नसली तर फार फार काय, हालांच्याच ज्या काय व्यथा होतील तेवढ्या होतील. पण माहिती असून, टिकाव न धरतां आल्यामुळं मीं ती सांगून टाकली तर मात्र आपण देशद्रोह केला ही हळहळ त्या हालांच्याबरोबर मनाला सारखी भाजत राहील. ती माझ्या वांट्याला मळा यायला नको आहे. सारं ऐकण्याचं मला औत्सुक्य असलं तरी तो मोह मला टाळला पाहिजे.''

चंद्रशेखरनें बापूरावांचा हात दोन्ही हातांत घेऊन सौम्यपणानें दाबला.

वरच्या पारिजातकाच्या झाडावर बसलेली एक चिमणी उडून गेली. तिच्यामुळें ती बसलेल्या डहाळीचें एक वाळलेलें पान भिरभिरत खालीं आलें. बापूरावांनीं वर मान करून त्या पारिजातकाच्या झाडाकडे पाहिलें. त्यांच्या मनामध्यें कसल्या कसल्या भावनांचा, विचारांचा कल्लोळ उसळून त्यांचें मन ढवळून निघून आतां त्याला विलक्षण शांति येत होती. हा पारिजातकाचा वृक्ष सुगंधी, नाजुक आणि सुंदर फुलांनीं बहरत असला तरी तो ओबडधोबड, खरखरीत, आणि रुक्ष-शुष्क असल्यानें त्यांना इतके दिवस त्याच्याविषयीं फारशी आपुलकी किंवा वात्सल्य वाटत नसे. पण आतांच्या शांत प्रसन्नतेमुळें त्यांचें मन त्या वृक्षाविषयीं विलक्षण स्नेहार्द्र झालें.

याच प्रसन्नतेंतून उत्पन्न झालेल्या कृतज्ञतेनें त्यांनीं चंद्रशेखरला निरोप दिला. जेवणाचें त्यांचें निमंत्रण त्यानें आभारपूर्वक नाकारलें. रात्रीं आपल्याला कुठें कुठें नि किती वेळ जावें लागेल याची त्याला खात्री नव्हती; म्हणून जेवणाच्या बंधनांत न सांपडणेंच त्यानें पसंत केलें.

बापूरावांचे शिष्य त्यांची वाट पाहतच होते. त्यांनीं आपलें लिहिणें पुरें केलें होतें. तें तपासण्यासाठीं बापूराव वाचूं लागले.

'दोन त्रिकोण एकाच पायावर उभे असून एकाच समांतर रेषायुग्मांत बद्ध असतील तर ते समक्षेत्र असतात...'

* * *

पत्नीच्या सल्ल्यानें बापूरावांनीं होकारार्थी निर्णय घेतला आणि चंद्रशेखरला निरोप पोंचविण्यासाठीं ते सकाळीं आपल्या एका शिकवणीची रजा घेऊन निघाले होते.

डोंगराच्या माथ्यावरील शेवटची खिंड ओलांडून बाहेर पडल्याबरोबर समोरून तोंडावर एकदम थंड वारा यावा आणि त्याचबरोबर हिरव्यागार दरीचें दृश्य डोळ्यांना दिसून एक विलक्षण तृप्तीची भावना अनुभवास यावी, त्याप्रमाणें बापूरावांना निर्णय घेतल्यापासून वाटूं लागलें होतें. त्यांच्या जीवितामध्यें तीस आणि बत्तीस सालच्या दोन प्रचंड लाटा येऊन गेल्या होत्या. त्या वेळीं ते कॉलेजांत होते. त्यांच्या बरोबरच्या कित्येक विद्यार्थ्यांनीं त्या वेळीं चळवळींत भाग घेतला होता, कारावासाचीहि चव घेतली होती. पण बापूराव सुलाखे मात्र एखाद्यानें प्रवाहाच्या कांठाशीं उभें राहून वाहत्या पाण्याची शोभा पाहावी त्याप्रमाणें आंदोलनाचीं दृश्यें दुरून पाहत त्यांपासून अलिप्त राहिले होते. त्या वेळीं त्यांना कांहीं फारसें वाटलें नव्हतें. पण पुढें पुढें त्यांना आपल्या या अलिप्तपणाबद्दल खेद वाटला होता. आपल्याबरोबरच्या त्या विद्यार्थ्यांबद्दल त्यांना वैशम्य वाटलें होतें. होय! आज त्यांपैकीं कित्येकांनीं नोकऱ्या धरल्या होत्या, कित्येकांनीं सरकारांतहि प्रवेश मिळवला होता आणि कित्येकांनीं तर देशभक्तीचा आणि त्यागाचा त्या वेळचा सारा मामला सोडून देऊन जगाच्या व्यवहारांत 'आपणें आपला' या तत्त्वाच्या मागें लागन भल्याबुऱ्या मार्गांनीं आयुष्याची पुंजी करून ठेवली होती...आज त्यांचा हा असा अधःपात झालेला असला तरी त्या लोकांनीं आपल्या ऐन विशींतल्या त्या भावविवशतेच्या काळांत चांगलीं कृत्यें केलीं होतीं, तें नाकारतां येण्यासारखें नव्हतें. पण आपल्या आयुष्यांत आजपर्यंत तसें कांहींच घडलेलें नाहीं. आज आळशाच्या जवळ गंगा यावी तसें झालें असतांना आपण संधि घालवली नाहीं हें बरें झालें...

हे आणि असले विचार बापूरावांच्या मनांत चालू असतांच त्यांचीं पावलें पुढें पडत होतीं.

तेवढयांत त्यांना गांधींजींच्या 'छोडो हिंदुस्थान' या इंग्रजी पुस्तकाची आठवण झाली आणि ते एकदम थबकले.

आंदोलन सुरू व्हायच्या आधीं थोडेच दिवस त्यांनीं तें छोटें पुस्तक विकत घेतलें होतें. आणि वाचून झाल्यावर त्यांनीं तें आपल्या टेबलावरच्या छोट्या अलमारींत ठेवून दिलें होतें. त्यानंतर त्या पुस्तकावर बंदी आली होती, तरी पण त्यांनीं त्याचा नाश केला नव्हता. त्यांनीं विचार केला होता, आपल्यासारख्या माणसाकडे सरकारची वक्रदृष्टि वळण्याचा संभव नाहीं, तेव्हां आपल्याकडे तें पुस्तक असलें तरी भिण्याचें कारण काय ! आणि त्या पुस्तकाकडे दृष्टि गेली, कीं जरी त्यांच्या जिवाचा कधीं कधीं थरकांप उडे तरी त्यांनीं तें तसेंच दडपून आपल्याजवळ राहूं दिलें होतें. पण आतांची गोष्ट निराळी होती. सरकारच्या विरुद्ध जाणाऱ्या मार्गावर त्यांनीं पहिलें पाऊल टाकण्याचा बेत केला होता. आतां आपल्यावर सरकारी आक्रमण केव्हां होईल त्याचा नेम नाहीं. तें पुस्तक जाळून नष्ट करून टाकणें हाच मार्ग उचित.

हा विचार मनांत आल्याबरोबर बापूराव परत फिरले आणि तें पुस्तक तत्काळ जाळून टाकण्याचा त्यांनीं पक्का निश्चय केला.

घरीं परत येऊन त्यांनीं अलमारींतून तें पुस्तक काढलें, काड्यापेटी जवळ घेतली आणि त्याचें वरचेंच पान टरकावलें. त्यांनीं त्याला काडी लावली, पण आर्ट कागद होता तो, त्यामुळें लवकर पेटेना. त्यांनीं तीन चार काड्या ओढल्या, कागदाची जळती बाजू खालीं करून चेतवण्याचा प्रयत्न केला. त्याच्या वरच्या अंगाला त्यांनीं घातलेलें स्वतःचें नांव जळत जातांना शांत चित्तानें त्यांनीं बघितलें.

तेवढयांत कागद पुन्हां विझला.

त्या क्षणीं त्यांच्या मनानं उलट खाल्ली. 'मीं हें पुस्तक कां म्हणून जाळायचं ! सरकार मला अक्षित वाङ्मय जवळ बाळगलें याबद्दल शिक्षा करील या भितीनं ! ही भीति मनांत धरून आतां किती दिवस निभणार आहेत ! एक तर महेंद्रांना मीं आश्रय देण्याचा काळ इतका थोडा आहे, कीं

कुणाला कांहीं संशयहि यायचा नाहीं नि त्यामुळं माझ्या घराची झडती घ्यायसाठीं कुणी येण्याचा फारसा संभवहि नाहीं. पण समजा, तो आला, तरी महेंद्रांना आश्रय दिल्याच्या अपराधापुढं हें पुस्तक जवळ बाळगल्याचा अपराध अगदींच क्षुल्लक ठरणार आहे. तेव्हां त्या अपराधाबद्दल जी काय शिक्षा व्हायची असेल तिच्यामध्यें फारशी काय वाढ होणार? मग तेवढयासाठीं मनाचं समाधान मीं कां गमवावं?'

बापूरावांनीं काड्यापेटी दूर भिरकावून दिली, तें पुस्तक जागच्या जागीं अलमारींत ठेवून दिलें आणि ते पुन्हा बाहेर पडले.

त्यांच्या घरासमोरच रस्त्यावर कचऱ्याची पेटी होती. तिच्यांतला कचरा अगदीं ओसंडून चालला होता. आणि तशा त्या उधळलेल्या, विसकटलेल्या कचऱ्यांत एका भिकाऱ्याची कांहीं शोधाशोध चाललेली होती. त्याचे केंस विसकटलेले आणि पिंजारलेले होते. बापूरावांचा पायरव ऐकून त्या भिकाऱ्यानें आपलें तोंड वर केलें. अगदीं काळा काळा रोम होता तो. त्याचे डोळे तारवटलेले आणि लालबुंद होते. दाढी भलतीच वाढली होती. कमरेला लटकावलेल्या एका घाणेरड्या नि सुरकतलेल्या फडक्याशिवाय त्याच्या देहावर दुसरा कोणताच कपडा नव्हता.

बापूरावांच्याकडे त्यानें तोंड वळवलें आणि तें वेंगाडून म्हटलें, "खायला कांहीं शिळंपाकं आहे का मालक?"

"या दिवसांत शिळंपाकं कुठून उरणार बाबा!"

"बघा, बघा कुठं कांहीं असलं तर! नाहीं म्हणूं नका!"

त्याच्याशीं अधिक कांहीं न बोलतां बापूराव सुलाखे एक क्षणभर थांबले आणि त्यांनीं एकदां त्या भिकाऱ्याकडे टक लावून बघितलें. तशीं तो भिकारीहि त्यांच्याकडे तशाच दृष्टीनें पाहूं लागला. त्याचे डोळे धगधगत्या शेगडीच्या तळच्या झडपा उघड्या टाकल्याप्रमाणें दिसत होते.

त्याला कांहीं उत्तर न देतां बापूराव मग पुढें चालूं लागले.

पण पुढें गेल्यानंतर सहज एकदां त्यांनीं मागें दृष्टि टाकली, तों तो भिकारी आपल्याकडेच पाहत असल्याचें त्यांना आढळून आलें. त्यांनीं मागें वळून बघितल्याचें दृष्टीस पडतांच त्या भिकाऱ्यानें हात पुढें केले, मान वाकडी केली, तोंड वेंगाडलें आणि खायला मागितल्याची खूण केली.

बापूरावांच्या मनांत एकाएकीं एक कल्पना चमकून उठली. हा माणूस गुप्त पोलिस खात्यांतला तर नसेल ना ? त्याच क्षणीं त्यांच्या मनांत धस्स झालें व छाती धक् धक् उडूं लागली. त्यांचीं पावलें क्षणमात्र थबकलीं. पण नंतर छातींत बंदुकीची गोळी लागलेल्या माणसानें रक्तस्राव थांबण्यासाठीं छाती गच्च दाबून धरावी त्याप्रमाणें दाबून धरून लागलीच त्यांनीं ती शांत केली आणि मग धिमेपणानें पावलें टाकायला प्रारंभ केला.

थोडें अंतर चालून गेल्यावर रस्त्याच्या वळणापाशीं त्यांना नेहमींचें पानपट्टीचें दुकान दिसलें. त्या दुकानाशीं दोघे तरुण गृहस्थ पानपट्ट्या विकत घेत होते. त्यांच्या टोप्या फरच्या होत्या, उंच होत्या आणि वर निमुळत्या होत गेल्या होत्या, एकाची काळी तर दुसऱ्याची तपकिरी होती. दोघेहि काळ्या कुळकुळीत वर्णाचे होते. दोघांनींहि दाढीमिशा बोडून चेहरेपट्टी तुकतुकीत केली होती. त्यांच्यापैकीं एक जण सिगारेट ओढत होता, ती धरण्यांत, धूर फुंकतांना मानेला झटका देण्यांत आणि एकंदरींतच उभे राहण्याच्या त्याच्या पवित्र्यांत जो माजोरीपणा आणि उर्मटपणा भरलेला होता तो हिंदी पोलिस खात्याशिवाय दुसरीकडे कुठें सांपडणें शक्य नाहीं अशी कुणाचीहि कल्पना होण्यासारखी होती. बापूरावांचीहि तशीच झाली.

स्नान केल्यानंतर कुत्रा आपलें अंग एकदां झटकतो त्याप्रमाणें अंग झटकून एक क्षणमात्रहि आपल्या चालींत खड पडूं न देतां बापूराव मग पूर्वीच्याच गतीनें चालूं लागले...

चंद्रशेखरनें आदल्या दिवशीं सांगितलेल्या ठिकाणीं बापूराव गेले आणि त्यांनीं त्याची गांठ घेतली. तो दृष्टीस पडल्याक्षणीं, ब्रह्मसाक्षात्कार झालेल्या माणसानें उद्गार काढावेत त्याप्रमाणें त्यांनीं उद्‌गार काढले, "शेखर तुझ्या पाहुण्यांचं माझ्या घरीं हार्दिक स्वागत होईल !"

चंद्रशेखरनें त्यांचे दोन्ही हात हातांत घेऊन स्निग्धपणानें दाबले आणि म्हटलें, "या तुझ्या निर्णयाबद्दल मी तुझं अभिनंदन करतों. ये, बैस जरा. हें घर आपल्या मित्राचंच आहे !"

बापूराव बसल्यावर चंद्रशेखर म्हणाला, "मात्र, आत्तांच निरोप आला आहे, कीं तुझ्या पाहुण्यांनीं इथं येण्याचा विचार बदलला असून ते खान-

देशांत...पण नको! याहून जास्त माहिती तुला सांगत नाहीं!" चंद्रशेखर सौम्यपणानें हंसला आणि म्हणाला, "तुझा विरस झाला का?"

बापूराव गप्प होते तरी अधिकच स्तब्ध झाल्यासारखे भासले. जरा वेळानें ते म्हणाले, "विरस...विरस...काय सांगूं तुला? त्यांनीं जें कांहीं केलं तें कांहीं विचार न करतां केलं नसेल, आणि त्यांनीं इथं यायचं रहित केलं तें तर कांहीं खासच माझ्यामुळं नव्हे. तेव्हां तसं कांहीं...म्हटलं तर ...पण हें बघ, तें कांहीं असलं, तरी माझं आपलं हें लक्षांत असूं दे, कीं यापुढं तुझ्या या पाहुण्यांच्यासारखे दुसरे कुणी पाहुणे यायचे असले तरी माझ्या घरीं त्यांचं स्वागतच होईल! आणखी...क्वचित् प्रसंगीं तुला प्रत्यक्ष कांहीं साह्य लागलं तर यथाशक्ति म्हणजे काय तें ध्यानांत आलंच असेल तुझ्या!"

चंद्रशेखरला आंतून कुणाचीशी हांक ऐकूं आली तेव्हां "आलोंच हं!" करीत तो आंत गेला.

त्याच्या मित्राच्या खोलींत आजूबाजूला बापूराव सुलाखे दृष्टि टाकूं लागले. त्यांना समोर भिंतीवर वर्तमानपत्रांतलीं टिळक, गांधीजी आणि नेहरू यांचीं छायाचित्रें शेजारीं टोंचलेलीं दृष्टिस पडलीं. बराच वेळ यांच्याकडे एकाग्रतेनें बघितल्यावर आपोआपच त्यांच्या तोंडून अस्फुट शब्द बाहेर पडूं लागले, "माझ्या मित्रांनो, माझ्या हातून अद्याप तसं कांहींच झालेलं नाहीं. पण हें पाऊल टाकायचा बेत मी करतों आहे त्यांत आणि त्यानंतर तुमचा त्याग, तुमचं ध्येय आणि मनाचा कणखरपणा माझ्या मनांत सतत...सतत..."

हें म्हणतां म्हणतां त्यांच्या मनांत कसल्या तरी अनामिक भावनांच्या उर्मि हेलावून आल्या आणि नेत्रांतून अश्रुप्रवाह सुरू झाला.

आपल्याला होत असलेल्या शांतिसुखाचें माप त्यांना अजमावतां येईना. एकच एक खिडकी आणि तीहि बंद असल्यानें कोंदटलेल्या खोलींत ती खिडकी उघडल्यानंतर स्वच्छ हवा आणि प्रकाश खेळूं लागावा तसें आपल्या हृदयांत कुठें तरी होत असल्याचा त्यांना भास झाला...

१९४७

## एक संध्याकाळ : : १२

लिहायला त्या दिवशीं मी बसलों होतों खरा, पण माझें मन त्यांत लागत नव्हतें. भ्रांतचित्त झाल्यागत झालें होतें, कांहीं सुचत नव्हतें. लिहिलेला मजकूर मीं एकदां वाचून काढला, फारसा नव्हताच, तो मीं फाडून टाकला आणि खालीं येऊन अंगणांत बसून राहिलों. थंड वारा वाहूं लागला होता. पण संध्याकाळ झाली होती, त्यामुळें माझी अस्वस्थता अधिकच वाढली.

मी राहतों त्या घराच्या अंगणांत बकुळी, पेरू, कण्हेरी, पारिजात, सोनचांफा इत्यादि अनेक प्रकारचीं लहानमोठीं झाडेंझुडपें आहेत. त्यांच्या-खालीं बराच पाचोळा जमला होता, तो मीं हिरांच्या झाडूनें एकत्र केला आणि बाग स्वच्छ केली. उद्यां सकाळीं कचरा पेटींत सारा पाचोळा टाकून देऊं हा विचार. फुलझाडांना आधींच कुणींतरी पाणी दिलें होतें, तरी मीं आतां त्यांना तें दिलें. अंगणांतल्या नळाच्या पाण्याला चांगला जोर होता, तेव्हां तोटीवर तळहात दाबून पाण्याचा फवारा केला आणि त्याच्या पल्ल्यांत जेवढी जमीन येत होती तेवढी भिजवून सगळीकडे गारीगार करून टाकलें.

आतां अंधार पडला होता. मनाची अस्वस्थता यत्किंचित्‌हि कमी झाली नव्हती. मी आधींचा विचार बदलला. आंत जाऊन काड्यांची पेटी आणली

आणि पाचोळ्याचा तो ढीग पेटवून दिला. त्याचा थोडयाच वेळांत खूप मोठा जाळ झाला. त्या जाळाकडे पाहतांना माझ्या दुखऱ्या मनाला शेक मिळाल्यासारखें झालें. मनांतल्या मनांत त्या जाळाभोंवतीं फेर धरून मी उडया मारूं लागलों, नाचूं लागलों.

आणि हें करतां करतां मी कितीतरी वर्षें मागें गेलों...

कॉलेजमधल्या पहिल्या वर्षाची परीक्षा संपली आणि खडकवासल्याचें धरण फुटल्यागत आम्हां सर्वांच्या मनाची अवस्था झाली. आधीं, अभ्यासासाठीं आलोचन जागरणें करतांना, परीक्षा संपेल त्या दिवशीं कांहींतरी झकास कार्यक्रम करायचा असें आम्ही पेंगत पेंगत घोकत असूं. प्रत्येक जण वेगवेगळ्या कल्पना काढी. एकाच दिवशीं लागोपाठ सिनेमाचे तीन खेळ ...सिंहगडाची, नाहीं तर पुरंदरची सफर...पोट फुटेपर्यंत खादाडी... डोकें गरगरायला लागून कोलमडून पडेपर्यंत पत्त्यांची अखंड बैठक...झोंप, वाचन, गप्पा...या साऱ्या कल्पनांच्या गुणदोषांची चर्चा होऊन व कीस निघून त्या टाकाऊ ठरवल्या जात होत्या. आम्हां सात आठ जणांना एकाच वेळीं परमोच्च आनंद देऊन सारा शीणभाग दूर करील असें कांहींतरी हवें होतें. सगळ्यांचा अभ्यास चांगला होता. कांहीं पहिल्या श्रेणींत, तर कांहीं दुसऱ्या वर्गात मानानें पास होणार यांत संशय नव्हता. तेव्हां असा हा कार्यक्रम करायला सर्वांनाच हक्क प्राप्त होणार होता.

विद्यार्थिदशेंतील सुट्टयांपैकीं सर्वांत रम्य सुट्टी कोणती, असा प्रश्न कुणी केला तर कित्येक जण ज्यूनियर वर्षाचें नांव घेतील. परंतु मी तो मान प्रथम वर्षाच्या अखेरीस येणाऱ्या सुट्टीला देतों. ज्यूनियरच्या वर्षात अभ्यासाची सक्ती नसते, परीक्षांच्या बाबतींत स्वच्छंदपणा खपतो, परीक्षेला बसून पास नाहीं झालें तरी फिकीर करण्याचें कारण नसतें, हें खरें; पण म्हणूनच त्या वर्षअखेरीला जी सुट्टी येते ती घसघशीत असली तरी खायला उठते. कारण, पुढें ठाकलेल्या अखेरच्या वर्षाचे वेध लागलेले असतात त्यामुळें मनावर विषण्णता तर येतेच, पण अखेरचें वर्ष संपल्यानंतरच्या भविष्यकाळाची चाहूल आणि अनिश्चितपणाचा अंधार मनाला कासावीस

करतो आणि त्या साऱ्या मोठ्या सुट्टीचे वांगें होऊन जातें! निदान माझा आणि माझ्याबरोबरच्या पुष्फळांचा हा अनुभव आहे. प्रथम वर्षाच्या सुट्टींत या कांहींच गोष्टी नव्हत्या आणि शैशव ओलांडून गेलों होतों तरी शैशवांतल्या आनंदाला आम्हीं पारखे झालों नव्हतों.

आयुष्यांत एवढी मोठी सुट्टी आज प्रथमच हातीं येत होती. तेव्हां तिचा प्रारंभ तिला साजेसाच व्हायला पाहिजे, याबद्दल आम्हां सर्वांचा कटाक्ष होता. मग अचाटपणा करण्याच्या चढाओढींत एकाला जी कल्पना सुचली ती जितकी विलक्षण होती तितकीच, किंबहुना त्यामुळेंच, सर्वांना ती तत्काळ मान्य झाली.

त्या दिवशीं आम्ही दुपारीं मोकळे झालों आणि संध्याकाळीं तिन्ही-सांजेच्या सुमारास आमच्यांतला जो एकजण वसतिगृहांत राहत होता त्याच्या खोलीवर जमलों. आमच्या कार्यक्रमाला भरपूर रंग चढण्यासाठीं अंधाराची जरूरी होती. तो पडला तसे मग सारेजण कॉलेजच्या पाठीमागची टेकडी भराभर चढलों आणि त्याहून भराभर ती पलीकडून उतरलों. वारा मस्त होता. तो पिऊन आम्ही नुसते हुंदाडत होतों. मोठमोठ्यानें गप्पा चालू होत्याच. अंधार दाटूं लागला असल्यानें तुरळक राहिलेले लोक आतां परतूं लागले होते.

टेकडी संपली आणि मग लहानशी खिंड लागली. ती ओलांडली आणि एकामागून एक क्रमानें उंचावत जाणाऱ्या टेकाड्या सुरू झाल्या. इथेंच आमचा कार्यक्रम सुरू व्हायचा होता. आमची उत्कंठा आणि उत्साह शिगेला पोंचला.

थोडीशी मोकळी जागा पाहून सर्वांनीं एकमतानें ती मुक्रर केली आणि बरोबर आम्ही नवी कोरी करकरीत काड्याची पेटी आणली होती तिच्यांतली पहिली काडी ओढून त्या मोकळ्या जागेंत अलगद ठेवून दिली. दिवस उन्हाळ्याचे आणि भोंवतीं कडकडीत वाळलेलें गवत होतें. त्यामुळें, जास्वंदीचें एखादें राक्षसी फूल बघतां बघतां उमलत जावें तशी आम्हीं लावलेली ती आग पसरूं लागली. अंधारांत लाल, नारिंगी, पिवळ्या, शेंदऱ्या रंगांची दौलत उधळून डोळे दिपवून टाकणाऱ्या त्या आगीभोंवतीं आम्ही परमावधीच्या आनंदानें हुरळून जाऊन नाचूं, खिदळूं लागलों, ओरडूं

लागलों. ती आग चांगली पसरलीशी वाटली तेव्हां आणखी पलीकडे कांहीं अंतरावर जाऊन, अशीच थोडीशी मोकळी जागा पाहून पुन्हां याच प्रकाराची पुनरावृत्ति करीत आम्ही त्या दिवशीं निदान पांच सात ठिकाणीं तरी आगी लावल्या असतील. गुहामानवाला आगीचा शोध, म्हणजे स्वतः अग्नि निर्माण करण्याचा शोध लागल्यावर, त्यानें अशाच आगी लावण्याचा सपाटा चालवला असला पाहिजे.

आतांपर्यंत याच भागांतल्या टेकड्यांवर किंवा सिंहगडाच्या उतरणीवर लागलेले वणवे आम्हीं अनेक वेळां बघितले होते. ते कसे लागत त्याची आम्हांला नक्की अशी कांहींच माहिती नव्हती. तथापि, या आगी अधून-मधून दिसत तेव्हां आम्हांला वाटे, जमीन भाजण्याकरतां या कुणी लावीत असेल, किंवा रानांत घर्षणानें विस्तव उत्पन्न होऊन त्या लागत असतील. कांहीं असलें तरी दुरून त्या फारच सुंदर दिसत आणि त्यांची आम्हांला मोहिनी पडे. याच कारणांमुळें, आत्तांच्या आमच्या आगी दुरून कशा दिसत असतील तें पाहण्याचा आनंद हुकत होता याची रुखरुखहि आम्हांला त्यावेळीं वाटूं लागली.

कांहीं वेळानंतर आमचा उत्साहाचा आवेग ओसरला आणि आपला पराक्रम मागें वळून पाहत पाहत एकंदर कार्यक्रमानें तृप्त झालेल्या मनानें आम्ही परतलों. वाटेंत आधीं पेटवलेले जाळ जेथें विझलेले आढळले तेथें पुन्हा पेटत्या काड्या टाकून आम्ही ते प्रज्वलित केले. आमच्या मोठमोठ्यानें गप्पा चालल्या होत्या आणि ‘ काय बेफाम मजा आली, नाहीं का ? ’ हा त्यांचा सूर होता.

आतां एक उतार आला आणि त्यावरचा रस्ता अडचणीचा होता, म्हणून आम्ही एकामागून एक चालत होतों. तेवढ्यांत समोरून कुणीतरी आलेंसें धूसर प्रकाशांत दिसलें. त्याला वाट देण्यासाठीं बाजूला होऊन आम्ही उभे राहिलों आणि ते जवळ येतांच पाहतों, तों काय! रँग्लर महाजनी !— संध्याकाळचे फिरायला निघालेले !

आमच्या मोठमोठ्यानें चाललेल्या गप्पा त्यांनीं ऐकल्या असल्या पाहिजेत. त्यांनीं विचारलें, “ या आगी तुम्ही लावल्यात ? ”

" होय. आम्हींच !" मोकळया मनानें आम्हीं सांगितलें. 'बाबा, मला खोटें सांगवत नाहीं...' असें जॉर्ज वॉशिंग्टनसारखें बोलण्याचीहि त्यावेळीं आम्हांला जरूरी भासली नाहीं. कारण, आम्हीं अपराध असा कांहींच केला नव्हता.

" शहाण्यांनो ! तें गवत चारा म्हणून कुणीं विकत घेतलेलं आहे हें तुम्हांला ठाऊक नाहीं ? आपल्या टेकडीच्या पायथ्याशीं ती वडारी-कातकऱ्यांची वस्ती आहे त्यांतल्यांचं हें सारं गवत ! पैसे देऊन घेतलेलं !"

आम्ही वरमून एकदम गप्प झालों.

" ऐकलात का ? केवढा हलकल्लोळ माजला आहे पहा त्या वस्तींत ?"

कान देऊन आम्ही ऐकूं लागलों. खरोखरच दूरवर कसला तरी ऊर बडवून करावा तसा आक्रोश चालला होता. आमच्यांतला प्रत्येकजण चरकला, हळहळला. सर्वांच्या माना खालीं झाल्या. महाजनींनीं आम्हांला या वर्षीं त्रिकोणमिति शिकवली होती. तथापि आम्हांला ते व्यक्तिशः ओळखणें शक्य नव्हतें. पण या विचारानें एकालाहि निश्चितता वाटली नाहीं, जें कांहीं वाटलें होतें. तें ते न रागावतां बोलले होते याचेंच, आणि तेंच फार होतें. जणूं त्या आगीनें मघां आम्ही कलंकित झालों होतों, ते या धगीनें आतां शुद्ध होत होतों.

पण तेवढ्यांत त्यांनीं आमच्यापैकीं एकाला ओळखलें. बुद्धिमान्, प्रत्येक परीक्षेंत पहिला आलेला, प्रथितयश, त्यांतून त्याच्या वडिलांशीं त्यांची व्यक्तिशः ओळख... " अरे बापू ! हें काय ? तूं या टोळक्यांमधें ?"

तो म्हणाला, " सर, आम्हांला खरोखरीच कांहीं म्हणजे कांहींच कल्पना नव्हती. वाटलं, ही अगदीं निरुपद्रवी करमणूक...पण आतां काय त्याचं ?"

महाजनी कांहीं बोलले नाहींत. आगी विझविण्याचा प्रयत्न करण्यांत कांहीं अर्थच नव्हता. जवळ ना पाणी ना माती. आम्ही खालच्या मानेनें चालायला लागलों. फुग्याला टांचणी टोंचल्यागत आमची अवस्था झाली होती.

इतक्यांत मागून हांक आली :

" तिकडे कुठें जाताहांत ? आतां आणखी शहाणपणा करूं नका. तिकडून गेलांत तर ते लोक नुसते फाडून खातील तुम्हांला. वरून तरी जा,

किंवा अंगानं भारत सेवक समाजावरून! आणखी ती आगपेटी आधीं फेकून द्या!"

हें ऐकून आम्हांला जें काय झालें आहे तें आहे!

आतां टेकडीवरून जाण्याची कुणाच्या पायांत ताकदच नव्हती. आम्ही माना खालीं घालून आणि आपसांत एक अक्षरहि न बोलतां भारत सेवक समाजाच्या वाटेनें चालूं लागलों.

सुट्टीच्या त्या पहिल्या दिवशीं आमचीं वयें एकदम वाढलीं...

मधांशीं पेटवलेल्या त्या पाचोळ्याची आतां नुसती राख राहिली होती. वाऱ्याची झुळुक आली आणि तिचा वरचा थर उडाला. त्यांतूनच एक ठिणगीहि उडाली. वाऱ्याच्या झोतांत ती अधिकाधिक उजळ होत होत वाकडीतिकडी फिरत गेली आणि एकदम विझली. मी तिच्याकडे एकटक पाहत राहिलों.

माझ्या मनाला आतां विलक्षण शांति आली होती. पण ती पेटलेल्या पाचोळ्याकडे पाहून, कीं त्या पूर्वायुष्यांतल्या स्मृतींनें पुष्कळ थकल्यानंतर मानससरोवरांत स्नान केल्यासारखें वाटलें होतें म्हणून, कीं त्या शेवटच्या चमकत्या ठिणगीकडे पाहून, तें मला कळेना.

आंत आलों तेव्हां आई म्हणाली, "बाहेर जाणार आहेस का रे?"

"कां?"

"गेलास तर दोन केळी घेऊन ये. आज माझा उपास आहे."

मी झटपट बाहेर पडलों. थोडयाच अंतरावर केळीं मिळालीं तीं नेऊन आईच्या स्वाधीन केलीं.

मनांतल्या अस्वस्थतेचा आतां मागमूसहि राहिला नव्हता. मी वर गेलों आणि लिहूं लागलों.

१९५१

## बाबा राजहंस : १३

ही हकीकत परवांचीच आहे.

वेळ सूर्यास्ताचीच. कोसन् कोस विस्तीर्ण पसरलेला समुद्रकांठ आणि तोहि निर्जन. मी एकटाच होतों. एके ठिकाणीं बसून तीरावरची बारीक वाळू मुठींत घेऊन, मूठ न उघडतांच ती अलगद झुळुझुळू सोडण्याचा खेळ मी खेळायला लागलों. माझ्या हाताला स्वप्नांत असल्या-सारख्या गुदगुल्या होत होत्या. पण त्यामुळें अधिकच कासावीस झाल्या-सारखें होत होतें. निर्जन समुद्रकांठीं संध्याकाळच्या वेळीं माणसाला असेंच होत असतें.

थोडा वेळ थांबून मी घरीं परत निघालों. कांठच्या रस्त्यानें थोडा चालून गेलों असेन, तेवढ्यांत समोरून एक वृद्ध गृहस्थ मला येतांना दिसला. अंधुक प्रकाशांत त्याच्या विलक्षण पांढऱ्या मिशा प्रथम माझ्या डोळ्यांत भरल्या—भरघोस आणि नाकपुडयांखालीं सुरेख वळण घेतलेल्या, जणुं समुद्राची एखादी चिमुकली लाटच वाहत वाहत येऊन ओठांच्या वरच्या अंगाला आदळून फुटल्यासारखी...

तो गृहस्थ माझ्या शेजारून गेला आणि मी चमकलों. त्याच्या चर्येची ठेवण मला चांगली परिचयाची वाटली. पण कोण?... कोण?...

मला एकदम आठवण झाली तसा मी मागें फिरलों आणि झपाझपा पावलें टाकीत त्याला गांठून विचारलें, "आपलं नांव राजहंस काय?"

" नाहीं? गवाणकर! नारायण मंगेश गवाणकर."

" मग बोलणंच खुंटलं! पण आपल्या जवळच्या नात्यांत कुणी राजहंस नांवाचे होते का? बाबा राजहंस, पुण्यांतले!"

" आमच्या जवळच्या नात्यांतलं कुणीच पुण्यांत नाहीं. त्यांतून राजहंस तर नाहींच नाहीं. फार कशाला? राजहंस हें नांव देखील आमच्या ज्ञातींत नाहीं."

वाटेंत त्याला थांबवल्याबद्दल त्या गृहस्थाची मीं औपचारिक क्षमा मागितली. पण...पण...किती बाबा राजहंसांच्यासारखा दिसत होता तो!

बाबा राजहंस...

मी मग समुद्राकांठीं परत गेलों. बोलूनचालून हवा खायला बाहेर पडलेलों, घरीं लवकर परतायची घाईहि नव्हती. त्यांतून आतां समुद्रकांठीं मी परत आलों तो मुद्दामच.

बाबा राजहंस...

मी हें म्हणतों तें सर्वांनाच पटेल असें नाहीं. निदान तसें मला ठामपणानें सांगतां यायचें नाहीं. पण मला आपलें वाटतें, कीं स्मृतींना देखील चव असते. आणि असेंहि वाटतें कीं विशिष्ट स्थळीं व विशिष्ट काळीं त्यांच्या ठिकाणीं विलक्षण गोडी निर्माण होते. उदाहरणार्थ, कांहीं स्मृति धावत्या आगगाडींत बसलें असतांना आलेल्या गुंगींत मधुर लागतात, कांहीं डोंगर-माथ्यावर बसून समोरचें विहंगम दृश्य पाहतां पाहतां मनांत आल्या कीं अनिर्वचनीय आनंद होतो, तर कांहींना समुद्रकांठच्या संधिप्रकाशांत उजाळा दिला तर त्यांच्यामध्यें कमालीचें माधुर्य भासूं लागतें...

असे किती तरी प्रकार करतां येतील...

सूर्यास्त होऊन आतां बराच वेळ झाला होता. समोर पाण्यांत जमिनी-पासून अलग झालेला प्रचंड बेटवजा एक खडक होता. त्यावर दीपगृह होतें. त्यांतला दिवा आतां खंडितपणें अंधाराला लप्‌लप् चाटीत होता.

बाबा राजहंस...

बाबा राजहंसांच्याचसाठीं मी परत आलों होतों. पण त्यांच्याबरोबरच गतकाळांतल्या अनेक स्मृति माझ्या मनांत गोळा झाल्या. धान्याचे दाणे

टाकल्यावर कबुतरें गोळा व्हावीत तशा. रम्य, मधुर, कडू, क्षुद्र, पोरकट, हास्यास्पद...त्या आपोआपच मनांत आल्या आणि त्यांतल्या कांहीं लवकर तर कांहीं उशीरां आपोआपच झिरपून गेल्या. त्यांतल्या बाबा राजहंसांच्या स्मृतींशीं मात्र मी बराच वेळ रेंगाळलों...

हें सारें अगदीं परवांचेंच. पण बाबा राजहंस माझ्या आयुष्यांत येऊन गेले त्याला, मला वाटतें, फार नाहीं, सुमारें दहा वर्षें झालीं असतील.

मी त्या वेळीं नुकताच पदवीपरीक्षा उतरलों होतों आणि कांहीं उद्योग मिळवण्याची खटपट करीत होतों. ती इतकी करावी लागत होती, कीं मला चीड येत होती. पण ती खटपटहि वायां जात होती आाणि ती चीडहि कुणावर काढावी तें समजत नव्हतें.

तसें म्हटलें, तर मला चैन करायाला हवी होती आाणि तें जमत नव्हतें, अशांतला भाग नव्हता. पण मला आपला अभ्यास चालू ठेवायला मिळालें तर हवें होतें. मला संशोधनहि करायचें होतें. विद्यापीठाच्या परीक्षेंत चांगल्या प्रतीचें यश मिळालें होतें, त्याला साजेसें कांहीं तरी आपल्या हातून पुढील आयुष्यांत झालें पाहिजे ही माझ्या अंतरींची तडफड होती.

पण मी अभ्यासक वाङ्मयाचा. माझें संशोधनहि वाङ्मयीन. त्याच्यामुळें कुणा उद्योगपतीची तिजोरी अधिक जड होण्याचा संभव नव्हता किंवा कुणा कारखानदाराला कमी कामगारांकरवीं जास्त उत्पादन करून घेतां येण्यासारखें नव्हतें. वाङ्मयाच्या उपासकावर अर्थशास्त्राच्या फेऱ्यांत गरगरण्याची पाळी आली होती.

माझ्या कांहीं ओळखी होत्या, त्यांच्या साह्यानें मीं तीन चार शिकवण्या मिळवल्या होत्या. त्या करून जो वेळ मिळे तो नियमित मिळकतीचें साधन शोधण्यांत खर्च होई. भोंवतालच्या जगांत माझी दृष्टि वरखालीं फिरे आणि वर पाहिलें कीं त्वेषाचे व्यर्थ फूत्कार आणि खालीं पाहिलें, कीं क्षुद्र समाधानाचे उद्गार अशी कांहीं विलक्षणच अवस्था माझ्या मनाची झाली होती.

एका शाळेंत मला तात्पुरतें काम देखील मिळालें.

एके दिवशीं असे संध्याकाळच्या सुमारास जरा उशीरांच बाबा राजहंस

माझ्याकडे आले. माझी संस्कृतची शिकवणी चालू होती. ते म्हणाले, " तुमचं काम चालू द्या. मी थांबतों."

तथापि ' शिष्टागमने अनध्यायः ' या संकेताला अनुसरून मीं शिष्याला रजा दिली. गृहस्थ वृद्ध, साठीच्या आसपास वयोमान असावें त्यांचें.

बाबांनीं स्वतःची मला ओळख करून दिली. माझे कॉलेजांतले प्राध्यापक शिराळी यांनीं त्यांना माझ्याकडे पाठवलें होतें. थोडा वेळ अवांतर बोलणें झाल्यावर मीं त्यांना आगमनाचा हेतु विचारला. तेव्हां ते म्हणाले, " हेतु आहे, पण तो आत्तां सांगत नाहीं, आजहि सांगत नाहीं. नंतर सांगेन !'

असे ते कां म्हणत होते त्याचा मला कांहींच अंदाज येईना. मी बुचकळ्यांत पडलों.

बाबा पुढें म्हणाले, " तुमच्याविषयीं बहुतेक माहिती मला शिराळींनीं दिलीच आहे. तुम्हांला एकदां फक्त पाहून व भेटून जायचं, एवढंच मी ठरवलं होतं."

मी लागलीच सावध झालों आणि म्हटलें, " पण माझं लग्न झालेलं आहे ! "

शिवाय शंकेला जागा राहूं नये म्हणून लागलीच मी पत्नीला बसल्या जागेवरूनच मोठ्या आवाजांत चहा टाकायलाहि सांगितला.

बाबा राजहंस हंसले आणि म्हणाले, " होय. शिराळींनीं मला तें देखील सांगितलं आहे. माझं काम, पण, तसल्या प्रकारचं नाहींच."

मीं पुन्हा विचारलें, पण ते कांहीं सांगेनात. ते फक्त एवढेंच म्हणाले, " तुम्हांला तें पसंत पडण्यासारखं आहे. नक्कीच ! आणि तुम्ही तें चांगलं करूं शकाल याविषयीं मला खात्री वाटते."

मग मींहि त्यांना डिवचलें, " हें आपण केवळ माझ्याकडे पाहून ठरवलं ! "

" केवळ पाहून नाहीं. एक तर, तुमच्या विद्याभ्यासाची माहिती मला संपूर्ण मिळालेली आहे आणि दुसरं असं, कीं माणसाकडे पाहून आपल्याला पुष्कळ गोष्टींचा अंदाज येतो. तो मला हवा होता."

" मग तो आला ? "

" आला ! "

" आपलं मत प्रतिकूल झालं असतं तर ? "

" मीं उगीचच कांहीं तरी माहिती एखाद्या त्रयस्थानं विचारावी तशी विचारली असती आणि परत गेलों असतों."

मला आतां सुरसुरी आली होती. मीं विचारलें, " उदाहरणार्थ ? "

" उदाहरणार्थ, मीं तुम्हांला विचारलं असतं, ' या घरांत तुम्ही राहतां आहां, याचा मालक कसा काय आहे ? ' यावर तुम्ही प्रश्नाचा रोख न कळल्यामुळं बुचकळ्यांत पडलां असतां. मग मीं पुढं स्पष्टीकरण केलं असतं, ' माझ्या मनांतून मालकांशीं हें घर विकत घेण्यासंबंधीं बोलणीं करायचीं आहेत, म्हणून विचारतों. मालकाची पत कशी काय आहे ? या वाड्यावर कांहीं बोजा वगैरे... ? ' "

" पण मला यांपैकीं एका देखील प्रश्नाचं उत्तर देतां येणं शक्य झालं नसतं." मीं म्हटलें.

बाबा म्हणाले, " मला त्याची जरूरीहि पडली नसती ? "

चहा पितांना मीं पुन्हा एकदां प्रयत्न करून पाहिला. मीं म्हटलें, " कामाची रूपरेषा कळली म्हणजे मला निर्णय घ्यायला सोईचं पडेल."

" त्याचं कांहीं नाहीं हो ! वाङ्मयापैकीं आहे. सांगितलं ना, तुम्हांला आवडेल असंच आहे. आणखी, पैसे पण मिळतील थोडेबहुत."

मीं मग अधिक अधीरपणा दाखवला नाहीं.

तिसऱ्या दिवशीं बाबा राजहंस माझ्याकडे आले आणि त्यांनीं मला आपलें काम सांगितलें.

बाबांनीं कांहीं-म्हणजे पंधरा वीस-वह्या बरोबर आणल्या होत्या. त्यांमधून त्यांनीं भगवद्‌गीतेच्या सर्व श्लोकांचा मराठींत अनुवाद करून लिहून काढला होता. श्लोकांच्या अर्थामध्यें कांहीं दोष राहिले असले तर ते काढून टाकावेत, त्याचप्रमाणें सौष्ठवाच्या दृष्टीनें वाक्यांच्या रचनेंत किंवा शब्दयोजनेंत कांहीं बदल हवेसे वाटले तर तेहि करावेत हें काम बाबा माझ्यावर सोंपवीत होते. त्या बाबातींत मला ते पूर्ण मुभा देणार होते. माझ्या परिष्करणानंतर तो अनुवाद पुस्तकरूपानें प्रसिद्ध करण्याचा बाबांचा विचार होता. अर्थातच हें सारें त्यांच्या स्वतःच्या नांवावर. प्रस्तावनेंत मात्र माझे मनापासून आभार मानण्याचें ते मला आश्वासन देत होते.

मला तें काम आवडेल याविषयींचा बाबांचा अंदाज मात्र अगदींच चुकला होता. कारण, आवड वाटेल असें त्या कामांत काय होतें ? तथापि माझें मनोगत मीं व्यक्त केलें नाहीं. मात्र हें काम घेतलेंच तर केवळ शिराळींनीं बाबांना आपल्याकडे पाठवलें आहे म्हणून घ्यायचें—आणि तेंहि मनाजोगते पैसे मिळणार असले तरच आपण घ्यायचें, असा मीं मनाशीं पक्का विचार केला.

हस्तलिखिताच्या त्या वह्या मीं चाळून पाहिल्या. बाबांनीं मजकूर अतिशय काळजीपूर्वक लिहिला होता. प्रत्येक श्लोक नव्या पानावर, तोहि तांबड्या चमकदार शाईत लिहिलेला, नंतर एक रेघ सोडून निळ्या शाईत खालीं मराठींतला मजकूर होता. अक्षर मोठें ठसठशीत, वळणदार होतें; समासहि घसघशीत सोडलेला होता. शाळेंतल्या मुलांच्या कित्त्यांच्या वह्या असतात त्यांतल्यासारखें तें लिहिणें पाहून त्यासाठीं खर्ची पडलेले श्रम माझ्या मनांत आले. मी प्रथम थक्क झालों आणि नंतर लागलीच भयभीत झालों. हें सगळें इतक्या काळजीपूर्वक सोडाच, पण नुसत्या धावत्या अक्षरांत देखील पुन्हा लिहायचें म्हटलें तरी केवढें जिकिरीचें होईल या विचारानें माझी छाती दडपून गेली...

पण त्या भीतीचें निराकरण बाबांनीं थोड्याच वेळांत केलें. ते म्हणाले, "तुम्ही फक्त या हस्तलिखितांवरच दुरुस्त्या करून दिल्यात तरी पुरे. दिवसभर मोकळाच असतों मी. सारं लिहून काढीन. आहे काय त्यांत ! माझा वेळ पण चांगला जाईल."

रोज सुमारें एक तास काम केलें तर किती अवधि लागेल त्याचा हिशोब करून मीं मनाशीं आंकडा ठरवून ठेवला आणि बाबा राजहंस त्या विषयाचें 'सूत उवाच' केव्हां करतात त्याची वाट पाहूं लागलों. त्यांनीं जेव्हां तें केलें तेव्हां मी दोनशेंचा आंकडा सांगितला.

बाबांनीं एवढीसुद्धां घासाघीस न करतां रुकार दिला.

थोड्या वेळानंतर सगळ्या वह्या माझ्याकडे ठेवून बाबा जायला निघाले, तेव्हां मी म्हटलें, "काम करतों म्हणून मीं कबूल केलं आहे, तेव्हां आतां माघार घेण्याचा प्रश्नच नाहीं. पण मघांपासून पुन्हा पुन्हा मनांत येतं आहे. आपल्याला राग येणार नसेल तर—एक शंका विचारूं का ?"

" खुशाल विचारा ! "

" गीतारहस्यांत लोकमान्यांनीं गीतेचा अनुवाद केलेला आहे, आणि मला वाटतं, त्या अनुवादाचं वेगळं पुस्तकहि प्रसिद्ध झालेलं आहे. मग या आपल्या पुस्तकाची जरूरी काय ? लोकमान्यांच्या पुस्तकांतील कांहीं उणीव भरून येणार आहे ? मराठी साहित्यांत नवी भर पडणार आहे ? "

थोड्याच वेळापूर्वीं आमची चर्चा झाली होती. तींत आपल्या भावी पुस्तकाविषयीं किती तरी गोष्टी बाबांनीं सांगितल्या होत्या, सुबक छपाई, मोहोरेदार कागद, मजबूत बांधणी, मधून मधून घालायचीं आकर्षक चित्रें इत्यादिकांविषयीं आपल्या हौसेच्या कल्पना बाबा वर्णन करून सांगत होते, तेव्हां त्यांची चर्या नुसती फुलून निघाली होती आणि आत्तां हे प्रश्न विचारून त्यांच्या साऱ्या कल्पनांवर मीं डांबर फासलें होतें.

बाबांचीं चर्या एकदम उदास झाली. ' संध्याछाया हृदयाला भिववीत असतात म्हणून कीं काय कुणास ठाऊक, वृद्धांच्या चर्येंत स्वभावतःच खिन्नता असते. ती आतां अधिकच तीव्र दिसूं लागली. मी लागलीच विरघळलों आणि एका अश्राप जीवाला आपण उगीचच दुखवलें कीं काय या शंकेनें मी अस्वस्थहि झालों.

नाहीं म्हटलें तरी सभोंवतालीं रोज किती तरी ठिकाणीं चांगल्या वस्तूंची नासाडी होत असलेली मला दिसत होती, किती तरी ठिकाणीं मानवानें केलेले अपरंपार श्रम वायां जात होते आणि किती तरी ठिकाणीं श्रम व्यर्थ वेंचले जात होते, ते मी उघड्या डोळ्यांनीं पाहूं शकत होतों. मग इथें या माणसानें आळशीपणांत व झोंपेंत वेळ घालवायच्याऐवजीं केवळ स्वतःच्याच का होईना, मनाला आनंद, आणि कदाचित् शांतिदेखील, देणारे निष्पाप श्रम केले होते, तर त्याला बोल लावण्यांत काय स्वारस्य ?... इत्यादि विचार माझ्या मनाचें मंथन करूं लागले.

पण मग लागलीच माझ्या मनानें बैठक बदलली आणि माझ्या तोंडून शब्द बाहेर पडत गेले, " रागावूं नका, किंवा कष्टीहि होऊं नका. मी शिकवण्या करतों, पण पैसे मिळतात म्हणून करतों. त्यांनीं माझ्या ज्ञानाचा पल्लाहि वाढत नाहीं किंवा प्रज्ञेचा विकासहि होत नाहीं. ज्यांना केवळ अध्यापनाचंच कार्य जन्मभर करायचं असेल त्यांची गोष्ट वेगळी. पण

माझं मन तेवढ्यावर संतुष्ट नाहीं. आपलं हें काम मी करीन, तेंहि प्रामाणिकपणानं करीन. तथापि माझ्या दृष्टीनं शिकवणींत आणि त्यांत कांहीं फरक नाहीं. फार फार तर संस्कृत व मराठीचा 'मुखकोश' वाढेल माझा ! .. आतांशा काम करतांना माझ्या आकांक्षा, मागं सरकलेलीं ध्येयं, सारखीं माझ्या मनांत येत असतात आणि गुदमरल्यागत होतं. आत्तांहि तसंच झालं, तोंडून शब्द गेले. आपण विसरून जा."

बाबा राजहंस कांहीं बोलले नाहींत.

"मीं हें आत्तां बोललों त्याच्यामुळं हें काम मला देण्यासंबंधांत आपला विचार बदलत असला तरी तसं स्पष्ट सांगा. मीं वाईट वाटून घेणार नाहीं."

बाबा म्हणाले, "छे छे ! तसं कांहीं देखील मनांत नाहीं माझ्या. तुम्ही मोकळेपणान बोललांत त्याचा राग कसला मानायचा? त्यांतुन तुमचं बोलणं गैरवाजवी आहे असं नाहीं...पण तुम्हांला या चोपड्यांचा इतिहास सांगूं ?"

मीं म्हटलें, "सांगा."

"मीं दोन वर्षांखालीं पेन्शन घेतलं. इतके दिवस मान मोडून काम करायची संवय लागली होती, आतां वेळ खायला उठूं लागला. तेव्हां मीं हें काम सुरू केलं. आधींपासून माझी वृत्ति धार्मिक. गीतेविषयीं मला फार भक्ति आहे, ती या कामामुळं अधिकच वाढली. आणि मग पुढं पुढं मनांत विचार यायला लागले, आपल्याला ना मूल ना बाळ, एकटी बायकोच काय ती आपल्यामागं नांवं सांगणार आपलं. पैसेहि बरे जमले होते. वाटलं, ते तरी कुठपर्यंत बरोबर येणार आहेत? तेव्हां या केलेल्या उद्योगांतूनच एखादं पुस्तक कां प्रसिद्ध करूं नये? मूल नाहीं तर नसो, आपल्या कुळाचं नांव हें पुस्तकच चालू ठेवील. राजहंस हें नांव तरी लोकांच्या डोळ्यांसमोर राहील."

हें सारेंच मला अनपेक्षित होतें. मीं अगदीं थक्क होऊन गेलों,

जरा वेळानें बाबा म्हणाले, "आमच्या कुळाचं नांव मला जितकं मधुर वाटतं तितकाच मला त्याचा अभिमानहि वाटतो. इतकं चांगलं नांव लाभण्याचं भाग्य महाराष्ट्रांत फार थोड्यांच्या वांट्याला येतं."

आम्ही दोघेहि आतां मनमोकळेपणानें बोलूं लागलों होतों. औपचारिकतेचा अवघडपणा केव्हांच दूर झाला होता. मीं म्हटलें, "पण तुमच्या कुळाला महाराष्ट्रांत फार मोठी कीर्ति आधींच मिळून चुकली आहे." याचा अर्थ बाबांच्या लक्षांत आला, तेव्हां ते म्हणाले, "खरं आहे. पण ती रंगभूमीवर. वाङ्मयांत नव्हे. आणि रंगभूमीवर देखील मिळाली आहे ती अगदीं निराळ्या नांवावर. राजहंस हें नांव फार थोड्यांना माहीत असेल."

या विषयांतला त्यांचा तो आग्रह पाहून "होय, तेंहि खरंच!" करून मीं त्यांना मान्यता दिली.

थोड्या वेळानें बाबा राजहंस गेले. व्यक्तिशः त्यांच्याविषयीं माझ्या मनांत आपुलकी निर्माण झाली होती खरी, तथापि त्यांचें काम करायला माझ्या मनाला उत्साहच वाटेना. कर्तव्य म्हणून मीं तें सुरू केलें. तरी पण तें नियमितपणें होईना. एखाद्या दिवशीं तीन चार तास काम व्हावें आणि नंतर पांच सात दिवसांत एक श्लोक देखील होऊं नये असें होऊं लागलें. कीर्तींचा उतारा देऊन काळावर मात करण्याची बाबांची ती धडपड मी समजूं शकत होतों, पण माझा स्वार्थ म्हणा, कर्तव्यबुद्धि म्हणा, मध्येंच एकदम डोकें वर काढी आणि तिच्या टोंचणीनें मी बेचैन होई. त्या वह्यांच्या चळतीकडे केव्हांहि माझी दृष्टि गेली, कीं डोळ्यांपुढें निराळ्याच वह्या येऊं लागत. मराठी ऐतिहासिक कादंबरी आणि कादंबरीकार यांच्यावर मला परिश्रम करून प्रबंध लिहावयाचा होता, त्याचप्रमाणें महाराष्ट्रांतील मुद्रणकलेचा इतिहास आणि तिचा महाराष्ट्रावर झालेला वैचारिक परिणाम यावरहि लिहायचा होता, पण हीं सारीं कामें मागें पडत गेलीं होतीं. त्यांचीं आणि इतर कित्येक विषयांचीं हातून न झालेलीं हस्तलिखितें माझ्या मनश्चक्षूंपुढें तांडवनृत्य करूं लागत. अशा वेळीं मला स्वतःचाच राग येई आणि कशाला हें काम आपण अंगावर घेतलें असें होऊन जाई...

तरी पण हळुहळू का होईना, मी काम करीतच होतो. मधून मधून बाबा माझ्याकडे येऊन जात. आमची अनेक विषयांवर मोकळेपणानें चर्चा होई. कधीं कधीं माझ्या अंतरींच्या आकांक्षांविषयीं बोलणें निघे, तेव्हां ते सहानुभूतिहि व्यक्त करीत. कांहीं दिवसांनीं मीं पहिला अध्याय संपवला

तेव्हां त्याची वही ते घेऊन गेले. घरीं गेल्यावर लागलीच ते त्याची मुद्रण-प्रत तयार करायला सुरुवात करणार होते.

मीं दुसरा अध्याय सुरू केला.

एक दिवस माझ्या खोलीचा केर काढतांना पत्नीनें साऱ्या वह्या झटकल्या होत्या, तेव्हां त्यांचा क्रम विसकटला होता. दुसऱ्या अध्यायाची वही मला हवी होती, ती शोधतांना सर्वांत वर आलेली वही मीं उघडली. उघडलेल्या पानावरच पहिल्या ओळींतलीं लालभडक ठसठशीत अक्षरें मला दिसलीं–

'स्वे स्वे कर्मण्यभिरतः संसिद्धिं लभते नरः ।'

माथ्यांत एकामागून एक घणाचे घाव बसावेत तसें मला झालें. मी जोरजोरानें हंसूं लागलों. आणि हंसूं ओसरल्यावर माझें माथें भडकून उठलें. भराभर पानें उलटीत मीं पुढचे श्लोक वाचले. बाबा राजहंसांनीं त्यांचा केलेला अनुवादहि वाचला. पण डोक्यांत आशय एवढासुद्धां शिरला नाहीं. एखाद्या न थांबणाऱ्या आगगाडीच्या डब्यांप्रमाणें तें किल्मिष, ती नैष्कर्म्य सिद्धि, तो बुद्धियोग आणि तसेच इतर किती तरी जडजंबाली शब्द डोळ्यांपुढून नुसते सरकून गेले. मीं ती वही शेवटीं बाकीच्या वह्यांवर आदळली, त्या साऱ्या वह्या उचलल्या आणि बायकोच्या स्वाधीन केल्या.

तिनें चमकून विचारलें, "हें काय?"

"संसिद्धिलाभार्थ स्वकर्मामध्यें अभिरत होण्यासाठीं टाकलेलं पहिलं पाऊल!"

"मराठींतलंच बोलणं आहे का हें! काय म्हणायचं आहे तरी काय तुम्हांला?"

"या साऱ्या वह्या पाणी तापवायच्या चुलींत खुपस!"

"पाणी तापवायची चूल या वह्यांच्यासाठीं अडून बसलेली नाहीं! तुम्हांला झालं आहे तरी काय? बाबा राजहंसांच्या ना वह्या त्या? ते आले म्हणजे काय सांगाल त्यांना?"

"वाटेल तें सांगेन! नाहीं तर कांहींच सांगणार नाहीं!"

"अन् दोनशें रुपये?"

"दोनशें रुपये गेले...कुठं तरी!"

"दोनशें रुपये जाऊं देत कुठंहि, पण वह्या जाळणं वगैरे कांहीं एक

मी करायची नाहीं. उगीच काय मांडलं आहे! काम करायचं नसलं तर कुणी मानगुटीला बसलेलं नाहीं तुमच्या! पण त्या वह्या धडपणीं बाबांच्या हातीं पोंचत्या व्हायला पाहिजेत. सांगून ठेवतें!"

मीं वैतागून म्हटलें, "काय वाटेल तें कर! पण माझ्या डोळ्यांसमोर त्या आतां यापुढं नकोत!"

"ठीक आहे. ते आले म्हणजे मी करीन त्यांच्या स्वाधीन. कधीं येणार आहेत ते?"

या वेळपर्यंत मीहि भानावर आलों होतो. मीं म्हटलें, "परवां किंवा तेरवां ते येण्याचा संभव आहे. त्या वेळीं बाहेर निघून जाईन मी. त्यांना सांग, मला हें काम यापुढं करतां येणं शक्य नाहीं. हवं तर माझ्या वतीनं दिलगिरीहि प्रदर्शित कर. पण केवळ उपचार म्हणून. प्रत्यक्षांत मला कांहींच वाटत नाहीं...म्हणजे आनंद वाटतो आहे—मोकळं झाल्याचा!"

बायकोनें त्या वह्या व्यवस्थित पिशवींत घालून ठेवून दिल्या.

पण विलक्षण गोष्ट अशी, की बाबा राजहंस त्याच दिवशी संध्याकाळीं माझ्याकडे आले. बायको घरांत नव्हती, तेव्हां वह्या देण्याचें काम मलाच करावें लागणार होतें. बाबांचें मन न दुखवतां तें कसें पार पाडावें या चिंतेंत मी होतों, तेवढयांत बाबा म्हणाले. "आज साऱ्या वह्या परत न्यायला मी आलों आहे."

मी आश्चर्यानें थक्क होऊन त्यांच्याकडे आ वासून पाहूं लागलों.

"छे छे! तसं कांहीं नाहीं! तुमच्याविरूद्ध माझी कांहींहि तक्रार नाहीं. खरी गोष्ट अशी, कीं परवांच्या बुधवारीं माझ्या छातींत एकाएकीं कळ आली. धांवपळ सुरू होऊन डॉक्टरांना बोलावणं गेलं. त्यानीं बरं केलं आहे मला आणि आतां काळजीचं कारण नाहीं असं पण सांगितलं आहे. परंतु डॉक्टर लोकांची ही रीतच आहे. तें दुसरं कांहींच, निदान आजारी माणसाला तरी, सांगायचे नाहींत. आपण आपलं नाणं ओळखून ठेवावं हा उत्तम मार्ग. आतां सबंध पुस्तक तपासून होईपर्यंत मला धीर निघत नाहीं. आहे या स्वरूपांतच पुस्तक छापावं असं मीं ठरवलं आहे."

सारें कांहीं ऐकून मी स्तंभित होऊन गेलों

" अर्थातच मीं कबूल केलेले दोनशें रुपये तुम्हांला पाठवून देतों. उद्यां किंवा परवां."

काय बोलावें तें मला सुचेनासें झालें. मी त्यांना त्यांच्या वह्या दिल्या. परंतु सुंठीवांचून खोकला जाऊनसुद्धां माणसाच्या घशांतले खवखवणें कधीं कधीं थांबत नाहीं याचा पहिला अनुभव मला त्या दिवशीं आला.

दुसऱ्याच दिवशीं बाबांच्याकडून मला दोनशें रुपये आले, ते मीं परत केले. बरोबर एक चिठ्ठीहि लिहिली :

" आपलें काम पुरें झालें नाहीं म्हणून पैसे घ्यावेसें वाटत नाहींत. जेवढें व्हायला हवें होतें, त्याच्या मानानें, जें झालें आहे तें फारच थोडें आहे. इतकें, कीं त्याचा हिशेबसुद्धां करायची जरूरी नाहीं..."

शेवटीं मीं त्यांचे आभार मानले आणि ताजा कलम घालून त्यांना दीर्घायुष्य चिंतिलें...

ही चिठ्ठी लिहून मीं तूर्त तरी बाबा राजहंसांशीं संबंध संपवून टाकला होता.

पण तो संपायचा नव्हता.

कारण, यानंतर आठच दिवसांनीं हृदयक्रिया बंद पडून बाबांचें प्राणोत्क्रमण झालें. मला विषादहि वाटला आणि आश्चर्यहि वाटलें. पण याहूनहि अधिक आश्चर्याची एक विलक्षण गोष्ट घडली होती हें मला नंतर समजलें. शेवटल्या त्या दिवसांत बाबांनीं आपलें मृत्युपत्र बदललें होतें आणि त्यामध्यें पांच हजार रुपये माझ्या नांवानें बाजूला काढून, ते कुठें व कसे गुंतवावेत याचीहि व्यवस्था केलेली होती. त्यांतून मला महिना शंभर रुपये असें चार वर्षें आणि शेवटल्या हप्त्याच्या वेळीं उरलेले सारे पैसे व्याजासहित मिळावेत अशी त्यांनीं योजना केली होती...

हें सर्व मला कळलें तेव्हां माझें मन सुन्न झालें. कडूपणा कुठल्या कुठें विरून गेला. मग बाबांचें उतराई होण्याकरतां कां होईना, आपण त्यांच्या पुस्तकाची कांहीं तरी व्यवस्था करायला हवी या विचारानें त्यांच्या वह्यांचा मीं शोध केला.

पण त्या कुठेंच सांपडल्या नाहींत. फार काय, मृत्युपत्रांत किंवा इतर कुठेंहि त्या आपल्या हस्तलिखितांचा बाबांनीं कांहीं उल्लेखच केला नव्हता.

बाबा राजहंस...बाबा राजहंस ..भिववणाऱ्या संध्याछाया...

समुद्राला आतां भरती आली होती. त्याचा खंडित आवाज आणि तीरावरच्या झाडांतून वारा वाहत होता त्याचा सतत चाललेला घोष एकमेकांत मिसळून एक विलक्षण लयबद्ध संगीत निर्माण होत होतें. इतका वेळ या ठिकाणीं बसून बाबा राजहंसांच्या स्मृतीला उजळा दिल्यानें माझ्या मनाला एका अनामिक तृप्तीची भावना आली होती.

आतां पुढें काय सागूं ?

बाबांनीं मला निश्चित केल्यानें मीं स्वतःचा अभ्यास वेगानें चालू केला. त्यांत मला जें यश मिळालें त्यांतूनच, माझें कार्य मला चालू ठेवतां येईल असेंच उपजीविकेचें साधनहि मला मिळालें. आणि आतां तर माझें मार्ग-दर्शन घेऊन विद्यार्थी संशोधनाचें कार्य करीत असतात.

जे वाङ्मयाचे अभ्यासक असतील त्यांच्या दृष्टिपथांतून माझीं पुस्तकें येऊन गेलीं असतील. आणि त्यांच्या अर्पणपत्रिका त्यांनीं वाचल्या असतील. तर प्रत्येक मीं बाबांना अर्पण केलें आहे हें त्यांना आढळून आलें असेल...

सर्वभक्षक काळावर मात करण्यासाठीं बाबांनीं हेतुपुरस्सर केलेला तो प्रयत्न मला प्रथमपासूनच बालिश वाटला होता. असला प्रयत्न नेहमींच बालिश असतो. कोणतीहि कृति ही तिची जोपर्यंत जरूर असते तोपर्यंतच टिकत असते. पुढें ती हळुहळू नामशेष होते आणि नंतर तर तें नांवहि शिल्लक राहत नाहीं. तेव्हां, अशा इच्छा पुऱ्या होऊं शकल्याच तर त्या केवळ अंशतःच. मीं प्रबंध लिहिले, ते प्रसिद्धहि झाले, पण त्यांना काळावरची मात असें मीं कधीं मानलेंहि नाहीं आणि मानीतहि नाहीं. तथापि बाबांची इच्छा, अंशतः कां होईना, पुरी करण्याची संधि माझ्या प्रबंधांच्या निमित्तानें मला लाभली, ही गोष्ट मला समाधान मात्र देते....

किंबहुना, बाबा राजहंसांची ही स्मृति मीं सांगितली आहे हा देखील त्यांची ती इच्छा पुरी करण्याचा आणि त्यांचा अंशतः उतराई होण्याचाच एक उपाय असें मी मानतों.

१९५१

## एक दुपार : : १४

दरवर्षीं पावसाळा येतो, दरवर्षीं पुरानें नदी दुधडी भरून फुसांडत वाहत जाते, त्या पुरांत दरवर्षीं माणसें पुलावरून उड्या मारतात, दरवर्षी त्यांतलें कुणी ना कुणी तरी दगावतें. वृत्तपत्रांतून बातमी येते, अग्रलेख देखील येऊन जातात, परिचित आणि अपरिचित माणसें हळहळतात. म्हणतात, मृत्यूच्या अनेक निमित्तांपैकीं हेंहि एक ! या त्यांच्या म्हणण्यांतला अभिप्राय असतो, हा मुलगा मरण पावला यांत पुराचा कांहींच दोष नाहीं. आपली कुवत न ओळखतां किंवा कुणीतरी माहितगार बरोबर आहे कीं नाहीं तें न पाहतां, नुसती कुणीतरी मूर्खानें भर घातली म्हणून पुरांत घेतलेली उडी म्हणजे काळाच्या जबड्यांतलींच उडी !

आणि या म्हणण्यांत तथ्यांश पुष्कळच आहे. निदान मला तरी स्वतःच्या अनुभवावरून तसेंच वाटतें.

आतांशा कित्येक वर्षांत मीं नदीच्या पुरांत पुलावरून उडी टाकलेली नाहीं. आतां माझा त्या बाबतींतला सारा कंडू शमलेला आहे. पण जेव्हां केव्हां मीं त्या मारल्या आहेत, तेव्हां त्या इतक्या मोठ्या संख्येनें मारल्या आहेत, कीं त्यांच्यापायीं आजारी पडून विद्यार्थीदशेंतलें एक वर्ष देखील मीं वाया घालवलें आहे.

मी पोहायला शिकलों बनारसला. गंगेंत. मंगलागौरी घाटावर. साधु नांवाच्या एका नावाड्याच्या ताब्यांत मला सोपवलें होतें. त्यानें

मला शिकवलें. त्याची शिकवण्याची तऱ्हा रानटी आणि राक्षसी होती. मला पाण्याची भीति अतिशयच वाटायची. विशेषतः बनारसला गंगेचें पात्र असें आहे, कीं घाट संपल्याबरोबर एकदम भलतेंच खोल पाणी सुरू होतें. त्यामुळें तर फारच. पण त्या भीतीची दखल न घेतां साधु मला ओढीत न्यायचा. स्वतः उताणा तरंगत माझे दोन्ही हात धरून पात्रांत घेऊन जायचा, मग माझ्या हातांना एक झटका देऊन मला आपल्या डोक्यामागें भिरकावून द्यायचा, आणि त्याच वेळीं माझ्या पोटांखाली गपकन् डुबी घेऊन स्वतः नाहींसा व्हायचा. त्यानें हातपाय झाडायला जेवढें कांहीं शिकवलेलें होतें तेवढ्या भांडवलावर धांपा टाकीत, ठसकत ओरडत कसा-बसा मी कांठावर यायचों. अखेरीस दीड महिना काशीला राहून मी पंढरपूरला परत गेलों तेव्हां मला दहापांच पावलांइतकें अंतर कुत्र्यासारखे हातपाय झटकीत कसेंबसें ओलाडतां येऊं लागलें होतें. तरी पण पाण्याची धास्ती मात्र मुळींच गेली नव्हती, आणि म्हणून तेवढ्या त्या तुटपुंज्या विद्येचा उपयोग जवळ जवळ शून्यच मानीत होतों मी.

ही माझ्या लहानपणांतली हकिकत. पुढें चार पांच वर्षें मी पाण्याच्या वाटेला गेलों नाहीं. मग माझी मलाच लाज वाटायला लागली आणि चंद्रभागेंत एखादा माणूस कमरेइतक्या पाण्यांत संध्या करीत उभा असलेला दिसला, कीं त्याच्या पलीकडून झटकन् जाऊन यायचा उपक्रम मीं सुरू केला. रोजच्या प्रातःस्नानाच्या वेळीं अशा माणसांना तिथें कमतरता कधींच नसे. माझ्या मापानें त्या ठिकाणीं पाणी माझ्या गळ्याइतकें असे आणि तेवढ्या त्या अंतरांत सुद्धा गटांगळ्या खाण्याचा प्रसंग आलाच तर तो माणूस पुढें होऊन आपल्याला ओढील हा विश्वास वाटे. पण ही पाळी कधीं आली नाहीं. अखेरीस माझा सराव वाढला, पाण्याची भीति पण चेपली आणि मग गांवाबाहेरच्या विहिरींत मित्रांबरोबर जाऊन या स्वयं-विद्येच्या जोरावर दम वाढवायच्या मार्गे मी लागलों.

पुष्कळ दिवसापासून पुरांत पोहायची मला फार इच्छा होती. पंढरपूरला असतांना तें कधींच शक्य झालें नाहीं. तेथें पुरांत पोहण्याची प्रथा नाहीं. भीमा नदीचे पात्र पावसाळ्यांत भरमसाट रुंदावतें, गांव नदीच्या एकाच अंगाला वसलेलें आहे, आणि नदीवरून पावसाळ्यांत रहदारी चालूं शकेल

असा पूलहि नाहीं, या साऱ्या कारणांनीं, पुरांत पोहणें म्हणून ज्याला म्हणतात तें तेथें शक्य नसतें. पुण्याला आल्यावर मात्र मला त्याचा ध्यास लागला आणि पुरांत पोहण्याची पूर्वतयारी म्हणून पाण्यांत अखंडितपणानें किती वेळ पोहतां येतें हें आपण पाहायला पाहिजे असें माझ्या मनानें घेतलें संथ पाण्यांतल्या या पोहण्याचा अर्थातच पुरांत कांहीं उपयोग होण्यासारखा नव्हता. तथापि त्यानें माझा स्वतःवरचा विश्वास वाढणार होता, आणि ही कांहीं थोडाथोडकी गोष्ट नव्हती. किंबहुना तीच पुरांत पोहण्याचें सार आहे हें मी अनुभविकांकडून ऐकत होतों. तें मला पुढें स्वतःच्या अनुभवावरून पटलें.

टिळक तलावांत त्या दिवसांत एक शुभ्र दाढीचा वयस्कर गृहस्थ येई. सकाळीं तो पाण्यांत केव्हां उतरे तें कळत नसे आणि बाहेर तो केव्हां येई याचाहि पत्ता लागत नसे. आम्ही तलावावर जात असूं तेव्हां आमचा नुसताच धिंगाणा चाले, पण जेव्हां बघावें तेव्हां हा माणूस आपला तेथें असायचा. आम्ही पाण्यांत शिरत असूं तेव्हांहि हा पोहत असायचा आणि बाहेर पडत असूं तेव्हां पण पोहत असायचा. उड्या नाहींत, हातवारे नाहींत, पाणी उडविणें नाहीं, आरडाओरड नाहीं, फार काय, चुळासुद्धां तो टाकीत नसे. नुसत्या चौकोनी फेऱ्या चालू असत त्याच्या. मग एक दिवस मला सणक आली. मी त्या दिवशीं सकाळीं तलावावर खूप लवकर गेलों, त्याच्याबरोबर पाण्यांत शिरलों आणि तो बाहेर पडल्यावर ती चालू फेरी पुरी करून बाहेर आलों. मधल्या वेळांत कोण आलें, कोण गेलें, कुणीं कुणाला किती भिजविलें किंवा वेळ किती गेला त्याचें मला भान राहिलें नव्हतें. आज तें आठवत सुद्धां नाहीं. आठवतें आहे तें एवढेंच कीं बाहेर पडलों तेव्हां सूर्य माथ्यावर आला होता, तलावावरून मी तडक जेवायला गेलों आणि जेवलों. जेवलों तो अगदीं हादडून जेवलों, आणि मग लागलींच जी ताणून दिली ती इतका वेळ, कीं जागा झालों तेव्हां दिवेलागणी होऊन गेली होती !

त्याच वर्षीं मीं नदीच्या पुरांत प्रथम प्रवेश केला. त्या दिवशीं पाणी असायला हवें तितकें भरपूर नव्हतें, तरी पण चांगलें होतें, पुरेसें होतें.

उड्या मारणारे ज्याला 'मानदंड' मानतात तो पुलाखालचा 'नंदी' बुडालेला नव्हता. तरी पण त्याच्या अगदींच थोडा खालीं एक चौथरा आहे, त्या चौथऱ्यावरून मात्र पाणी वाहूं लागलें होतें. आमच्यांपैकीं आम्हीं तिघेजण पुरांत प्रथमच शिरणार होतों, तेव्हां सर्वानुमतें असें ठरलें कीं पुलावरून उड्या न मारतां पलीकडच्या तीराशीं पुलाजवळच जो घाट आहे त्यावरून सुटावें. पुरांत पोहणाऱ्यांचे कपडे पोंचायच्या ठिकाणीं आनंदानें सायकलीवरून घेऊन जाणारे पुण्यांत लकडीपुलावर नेहमींच भेटतात. तसे आम्हांलाहि भेटले आणि आम्ही पाण्यांत शिरलों.

तें अफाट पाणी पाहून मला प्रथम बावरल्यासारखें झालें पण क्षणभरच. कारण, माझा विश्वास जागच्या जागीं होता. आणि टिळक तलावांतल्या त्या शुभ्र दाढीवाल्याच्या पाठलागाची आठवण जागी होती. थोडयाच वेळांत कांहींतरी विशेष पराक्रम करीत असल्याची जाणीव मनांत उत्पन्न झाली आणि आम्ही वाऱ्यावर भिरभिरणाऱ्या पिसांसारखे तरंगत जाऊं लागलों. हात मारायची तर जरूरी नव्हतीच.

पाणी कमी वाटलें होतें तें वरून. तें सुद्धां उडया मारण्याच्या दृष्टीनें. नाहीं तर आतां तशी कोणतीच कमतरता वाटत नव्हती. कुठल्या तरी अवाढव्य कारखान्यांत दिसणाऱ्या अजस्र मालवाहू पट्टयासारखें नदीचें पात्र पुढें पुढें जोसांत सरकत होतें. त्याच्या वेगाची जाणीव अर्थातच आम्हाला होत नव्हती. कांठाकडे मधेंच केव्हांतरी दृष्टि टाकावी, तेव्हां झाडें सटासट मागें जात होतीं, त्यावरूनच काय तो वेग कळून येत होता. दुपारचा तीनचा सुमार होता, आकाशांत ढग होते, पण त्यांचा थर दाट नव्हता. नदीच्या रुंद पात्रांतल्या लाटांमुळें सभोंवार सूर्याचा फाकलेला प्रकाश इतका दाटून आला होता, कीं रंगभूमीवरच्या झोतांत बावरल्यासारखें वाटत होतें. पात्राच्या रुंदीनें, वेगानें आणि ह्या प्रकाशानें आमचीं हृदयें अगदीं थरारून गेलीं.

योजलेल्या ठिकाणीं पोंचण्याच्या वेळीं अंतर तोडायला त्रास होऊं नये, म्हणून आम्ही सुरुवातीपासूनच कणाकणानं पात्राच्या मध्यभागीं आलों होतों. आमच्या मनसोक्त गप्पा चालल्या होत्या. आमचें परस्परांतलें अंतर काडीइतकेंहि बदलत नव्हतें. एक जण म्हणाला देखील, "आधीं कल्पना

आली असती तर पत्त्यांचा डाव घेऊन आलों असतों. झकासपैकीं झब्बू खेळतां आला असता !"

इतक्यांत एक जण म्हणाला, "अरे, इथून ओंकारेश्वर, मला वाटतं, फार लांब आहे. त्यापेक्षा आपण असं बाजूला कांठाकडचे कां जाऊं या नको ?"

आमच्या अंगांत हजारों गिरेबाज कबुतरें घुमत होतीं. त्याला वेड्यांत काढून आम्हीं, म्हटलें, "इतकं 'हें' करून आपण उतरलों आहोंत आणि आतां अलीकडे कांठाला लागून पराभव पत्करायचा कीं काय ? छे छे ! ती वार्ताच नको !"

पण तो म्हणाला, "नको ! हा कांठच अधिक जवळ आहे. तिकडेच जाऊं या आपण !"

त्याला आम्हीं समजावलें; पण तो ऐकेना. तो कोण, कुणाच्या ओळखीनें आला, तें फार थोड्यांना ठाऊक होतें. मलाहि ठाऊक नव्हतें. किंबहुना अम्ही सारेच जण कसे एकत्र आलों होतों कुणास ठाऊक ! चांगले सात आठ जण होतों आम्ही, पण माझ्या माहितींचा फक्त एक जणच काय तो होता. पुरांतल्या पोहण्याचा भरपूर अनुभव घेतलेला कुणीच नव्हता. साऱ्यांची माहिती ऐकीव. आणि रस्त्यावर कांहींतरी उत्सुकतेनें पाहत जमा झालेल्या माणसांसारखा आमचा गट. पण हें सारें खरें असलें, तरी आत्तांच्या या विचित्र प्रसंगीं त्या व्यक्तीला डाफरतां येत नव्हतें, कीं असें म्हणतां येत नव्हतें, "धड पोहायला येत नव्हतं तर आलास कशाला ?" तशी ती वेळहि नव्हती.

कारण, बघतां बघतां त्याची अवस्था पार बदलून गेली. एका क्षणांत तो काळा ठिक्कर पडला. भीतीनें माणूस काळा ठिक्कर पडतो ही भाषा पुस्तकांतून व बोलण्यांतून मला परिचित होती. तिचें मला नेहमीं कोडें वाटत आलें होतें. मी मनाशीं म्हणें, हा केवळ भाषेचा फुलोरा असला पाहिजे. काळा ठिक्कर म्हणजे असेल तरी कसा ? कोळशासारखा ? डांबरासारखा ? शाईसारखा ? कीं काजळासारखा ? मला उत्तर सांपडत नसे. परंतु त्या दिवशीं मला प्रथम आणि एकदांच त्या शब्दांचें प्रत्यंतर पाहायला मिळालें. शरीराच्या कुठल्या तरी मांसल भागावर जोराचा प्रहार बसून

बरेचसें रक्त सांखळलें कीं तें जसें बाहेरून काळें निळें हिरवें दिसतें, तसें त्याचें सारें तोंड भयानक दिसूं लागलें.

आम्हां सार्‍यांच्या तोंडचें पाणी पळालें. तरी पण त्याला त्या क्षणीं धीर देऊन कांठाशीं सुखरूप पोंचवण्याचा प्रयत्न करण्याशिवाय दुसरा कोणताच विचार त्या वेळीं सुचण्यासारखा नव्हता. त्याची अवस्था ओळखली असल्याची जाणीव त्याला करून देणेंहि मूर्खपणाचें होतें हें ओळखून, "बरं, तूं म्हणतोस तसं करूं या. चल कांठाकडे!" म्हणत सर्वांनीं त्याच्याभोंवतीं कोंडाळें केलें. मग मोठमोठ्यानें गप्पा मारीत, जणुं कांहीं विशेष झालेंच नाहीं अशा अभिप्रायानें, त्याला अप्रत्यक्षपणानें आम्ही धीर देऊं लागलों. प्रत्येकाच्या ठिकाणीं आत्मरक्षणाच्या भावनेचा जो अंश होता त्यामुळें कोंडाळ्यांतले सारे जण त्याच्याभोंवतीं होते तरी प्रत्येकानें चार हात अंतर त्याच्यापासून ठेवूनच त्याला घेरलें होतें.

विलक्षण गोष्ट अशी, कीं तेवढ्यांतहि एक जण कोंडाळ्याच्या बाहेर चांगला दहा-बारा हात दूर राहून बरोबर येत होता, आणि ओरडत होता, "अरे, असा घाबरतोस काय? थोडी हालचाल करशील कीं नाहीं?" वास्तविक हा वयानें सर्वांत मोठा, शरीरानें सर्वांत अधिक धष्टपुष्ट, अगदीं बोकडासारखा, आणि (हें नंतर कळलें) तो खचलेला माणूस बरोबर घेतलाहि त्यानेंच. कांठाशीं सुरुवातीला पाण्यांत उतरण्याआधीं मामुली चौकशी झाली होती तेव्हां त्यानें, म्हणजे खचलेल्यानें, सांगितलें होतें, "मला बरं येतं!" तेव्हां हा बोकड हंसत म्हणाला होता, "बरं म्हणजे काय? चांगलं! चल तर खरा! असल्या गोष्टींत थोडंसं धाडस हें करायलाच पाहिजे. आणखी, आपण इतके जण तर आहोंत!" इतकें असूनहि आतां हा बोकड स्वतःला मृत्युंजय करूं पहात होता.

माझ्या मनांत त्या वेळीं आलें, सर्वच जणांना धोका वाटत असूनहि प्रत्येकाच्या हातून इथें योग्य तें सामूहिक वर्तन आपोआप घडत आहे, मग एवढाच हा असें कां वागत असावा? आमच्यापैकीं त्याचें एकट्याचेंच लग्न झालेलें आहे म्हणून का? म्हणजे कुटुंबवत्सल माणसें अशीं धोक्याच्या प्रसंगीं... पण कुटुंबवत्सल या शब्दापाशीं मी थबकलों. कारण, त्याचें बायकोवरचें प्रेम प्रसिद्ध होतें. तिला तो जाच करीत असतो, मारहाणहि

करीत असतो, फार काय, या मारहाणीवरून आगगाडींत सुद्धां पोलीस येण्यापर्यंत एकदां पाळी आली होती हें माझ्या कानीं आलें होतें, तें मला आठवलें आणि माझें आश्चर्य ओसरलें. फक्त इतके दिवस मला कोडें वाटे, अतिशय सभ्यपणा आणि शिष्टाचार संभाळणाऱ्या ह्या माणसाविषयीं लोक असें कसें बोलूं शकतात ? आतां तें कोडें राहिलें नव्हतें....

अर्थातच दुरून चाललेल्या त्याच्या बडबडीकडे कुणाचेंच लक्ष नव्हतें. सारें कोंडाळें हळूहळू तिरक्या गतीनें किनाऱ्याच्या जवळ जवळ सरकत होतें. सर्वांचीं मनें कशीं तट्ट ताणलीं होतीं. तरी पण सगळे जण कांहींतरी बोलत राहिले होते. अखेरीस किनारा दोन हातांवर आला तेव्हां आम्हांला हायसें वाटलें. पण तोंपर्यंत त्या काळवंडलेल्याची शक्ति पार खलास झाली होती. तथापि इतका वेळ वागवत आणलेलें ओझें दूर करण्यास आम्ही इतके उत्सुक झालों होतों, कीं त्याच्या अगदीं जवळ सरकून आग्हीं होतें नव्हतें तेवढें बळ एकत्र करून त्याला कांठावर ढकलला. मग थोडा वेळ पाण्यांतच आम्ही रेंगाळलों, आणि तो लडथडत किनाऱ्यावर चढलेला दिसला तसे आम्ही परत पाण्यांत शिरलों आणि मग निर्धास्त मनानें ठरलेल्या घाटावर लागलों.

थोड्याच वेळांत तो अंगावरच्या भिजलेल्या लंगोटानिशीं कुडकुडत रस्त्यानें चालत तेथें आला. त्याच्याकडे आमचें अधिक लक्ष गेलें तों त्याच्या मांडीवर वरपासून खालीं गुढग्यापर्यंत वस्ताऱ्याचें पातें कुणींतरी फिरवावें तशी तिरकस चीर गेलेली आणि ओल्या अंगामुळें तिच्या आजूबाजूला थोडथोडें रक्त भळभळलेलें !

"हें रे काय ?" दचकून आम्हीं त्याला विचारलें.

"जिथं तुम्ही मला लोटलंत तिथं पाण्याखालीं कांठावरची फुलबाग आहे. तिच्या कुंपणाची काटेरी तार ! पाण्यांतच लागली."

त्याच्या अविचाराचें हें प्रायश्चित्त अगदीं क्षुद्र असलें तरी त्याला परस्पर मिळालें होतें. त्यामुळें आम्हीं त्याला ज्या शिव्या मनसोक्त देऊन घ्यायचें ठरवलें होतें त्या आंतल्या आंत जिरल्या. त्याची जखम नुसतें आयोडिन लावलें कीं बिनधोक होण्यासारखी होती. कपडे आल्याबरोबर त्याचे त्याला

देऊन लागलीच उपचार करण्याला सांगून त्याला पाठवलें आणि प्रत्येक जण आपापल्या घरीं गेला....

दरवर्षीं पावसाळा येतो, दरवर्षीं पुरानें नदी दुथडी भरून फुसांडत वाहत जाते, त्या पुरांत दरवर्षीं माणसें पुलावरून उड्या मारतात, आणि दरवर्षीं कुणी ना कुणी तरी दगावतें.

वृत्तपत्रांतून ती बातमी येते तेव्हां मी पहिल्यांदा पुरांत शिरलों त्या दिवशींची ती दुपार मला आठवते. मला हळहळ वाटते. आणि मनांत येतें, पुरांत पोहण्यालाच जी सरसकट बंदी आज घातली आहे तीमुळें माणसाच्या साहसवृत्तीवर घाव बसतो आहे. केवळ मूर्खपणाशिवाय या अपघाताला दुसरें कारण नाहीं. कुठल्या तरी व्यायामशाळेनें पुरांत पोहण्याच्या पात्रतेचे दाखले देणें सुरू केलें आणि तो असल्याशिवाय पुरांत उतरायला अधिकाऱ्यांनीं बंदी घातली तर असले अपघात कितीतरी टळतील.

१९५२

# स्वाध्याय

(१) शाळेंत आलेल्या दोघां डॉक्टरांच्या मनोवृत्तींत कोणता फरक दिसून येतो?
(२) डॉक्टर केदारी यांना पैसे कां नेऊन दिले नाहींत?
(३) डोअरकीपरच्या मनाला समाधान कशाबद्दल वाटतें?
(४) डोअरकीपरनें आपल्याजवळचे दोन आणे त्या मुलाला कां दिले?
(५) हिऱ्याच्या बांगडयांचा उल्लेख केल्याबरोबर दिनकरपंतांचे डोळे कां भरून आले?
(६) झुमराव पाटलांच्या शिकार करण्याच्या पद्धतींतलें वैशिष्ठ्य सांगा.
(७) झुमराव पाटलांनीं दुसरा वाघ शोधण्याचा आग्रह कां धरला?
(८) शांतारामानें विद्याधरचा दोन दिवस पाठपुरावा करण्याचें कारण कोणतें?
(९) वर्गांतून बाहेर आल्यानंतर जांभेकर गुरुजी लायब्ररींत कशासाठीं गेले?
(१०) घनश्यामला प्रथम शिशासारखे जड लागणारे रुपये अखेरीस पिसाप्रमाणें हलके वाटूं लागले, याचें कारण काय?
(११) घर आणि शाळा या कथेच्या मथळ्याच्या समर्पकतेविषयीं विवेचन करा.
(१२) हिंदी नौकादलांतल्या महाराष्ट्रीय तरुणानें आपलें नांव कां सांगितलें नाहीं?
(१३) आंदोलन या कथेच्या आधारानें बापूराव सुलाखे यांचें स्वभावचित्र रेखाटा.
(१४) परीक्षा संपल्याचा आनंद मुलांनीं कसा साजरा केला? आणि त्याचा परिणाम काय झाला?
(१५) बाबा राजहंस यांचा पुस्तक प्रसिद्ध करण्यामागें हेतु कोणता होता?
(१६) बाबा राजहंसांच्या मृत्यूनंतर त्यांचीं हस्तलिखितें सांपडलीं नाहींत, याबाबत तुमचा तर्क काय आहे?
(१७) तुमच्या पोहण्याच्या पहिल्या अनुभवाचें वर्ण करा.

# आमचें प्रकाशन

| | | |
|---|---|---|
| क्रांति ( संक्षिप्त ) ( कादंबरी ) | साने गुरुजी | १—८—० |
| क्रांति ( संपूर्ण ) ( कादंबरी ) | ,, | ३—८—० |
| तीन मुलें (संक्षिप्त) ,, | ,, | १—४—० |
| स्त्री-जीवन—भाग १ व २ | ,, | ३—८—० |
| राष्ट्रधर्म | ,, | २—८—० |
| समाजधर्म | ,, | १—०—० |
| मुलांसाठीं फुलें | ,, | ०—४—० |
| श्रीमहागणपति | त्र्यं. ग. बापट | ०—६—० |
| साने गुरुजी ( चरित्र ) | ,, | ०-१२-० |
| श्रीरामकृष्ण परमहंस ,, | ,, | १—४—० |
| स्वामी विवेकानंद ,, | ,, | १—८—० |
| निबंध-संपदा | ,, | १—०—० |
| पुतळा आणि पारवा ( कथासंग्रह ) | ,, | १—४—० |
| मृगाजिन (साने गुरुजींच्या आठवणी) | ब. ग. कुलकर्णी | १—८—० |
| पहिली पायरी ( नाटक ) | ना. धों. ताम्हनकर | १—०—० |
| वत्सराज ( कादंबरी ) | वि. कृ. श्रोत्रिय | ०-१०-० |
| आगरकर ( चरित्र ) | पु. पां. गोखले | ०—६—० |
| गांधींजींची जीवननिष्ठा | भट्टाचार्य—जठार | २—८—० |
| छाया ( नाटिका ) | सौ. विमल काळे | ०-१०-० |
| माणुसकीचा धर्म | म. ना. अदवंत | १—८—० |
| पुष्करिणी ( कथा ) | शशिकांत पुनर्वसु | १—८—० |
| हरिवरदा ( खंड १ ला ) | कृष्ण दयार्णव | १०—०—० |

**प्रकाशक—दयार्णव रघुनाथ कोपर्डेकर**

**५२१ सदाशिव पेठ, पुणें २.**